

श्रीमद्दत्तगिरी गोसावी चरित्र

लेखक : प्रा. दि. ग. नाईक

श्री. ब्र. दत्तगिरी महाराज

जन्म : नंद शु. १३, शके १७७२

समाधी : अनंत १४, शके १८१२



समाधी : श्रीक्षेत्र नरसिंह वाडी



हस्ताक्षर

भोगवे निवती (खानोली) : सभामंडप व औदुंबर

मठाचा आंतील भाग



दत्तगिरींच्या मठाचा, श्री दत्ताची पालखी

श्रीदत्त मंदिर, श्रीपादवाडी–चंदगड

श्रीदत्त मंदिर, साळगांव

श्रीदत्त मंदिर, अंकोला

नागेंद्रगिरी मठ, केळूस

शंभुगिरी मठ,
तेंडोली

'सुस्थळ',
वेताळ बांबर्डे



श्रीपादवाडी देवस्थानांत मिळालेल्या प्रत्यक्ष काढलेल्या चिठ्ठ्या

[संदर्भ : पृष्ठ ६२]

खानोली गांवचा नकाशा.



केळूस
पाट
तेंडोली
अरबी समुद्र
दाभोली
वेंगुर्लें
मठ
कामरणी
भाटलें
सावंतवाडा
देऊळवाडा
महारवाडा
आंबेस वाडी

श्रीगणेशाय नमः

श्रीमद्दत्तगिरी गोसावी

चरित्र

श्रीमद्दत्तगिरी गोसावी, स्वामी, श्रीमठ खानोली (निवती),
तालुका वेंगुर्लें, जि. रत्नागिरी.

लेखक
प्रा. दि. ग. नाईक

खा नो ली ग्रा मो त्क र्ष स मा ज मुं ब ई

किंमत दोन रुपये

प्रथमावृत्ती : १९५९
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

© प्रा. दि. ग. नाईक

प्रकाशक :
वसंत बाळकृष्ण तोरस्कर
खजिनदार, खानोली ग्रामोत्कर्ष-समाज
२५, कु. दे. ब्राह्मण निवास
गिरगांव, मुंबई ४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

श्रीमद्दत्तगिरींच्या पुण्यप्रभावानें
घडलेलें त्यांचें हें कथा-पुष्प-पंचक
त्यांच्याच चरणीं समर्पण

प्रकाशकाचे दोन शब्द

खानोली ग्रामोत्कर्ष समाज (रजि.) मुंबई, ही संस्था, खानोली गांवाची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं १९५३ च्या मे महिन्यांत स्थापन झाली. समाजानें, गेल्या सहा वर्षांत गांवांत विधायक कार्याचा भक्कम पाया घातलेला आहे. गांवांतील लोकांना वैद्यकीय मदत मोफत मिळावी म्हणून, समाजानें गांवांत--भेंडियाम, वायंगणी व देऊळवाडा या ठिकाणीं तीन आरोग्यकेन्द्रें चालू केलेलीं आहेत. त्या केन्द्रांमध्यें दोन डॉक्टर व एक नर्स काम करीत असून एक मॅटर्निटी विभागहि सुरू करण्यांत आलेला आहे. तसेंच, दाभोली नदीवर सिमेंट कॉंक्रीटचा साकव बांधण्याचें कार्यहि समाजानें हातीं घेतलेलें आहे.

गांवाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीबरोबरच सांस्कृतिक उन्नतीसाठीं समाजानें गांवांतील सुप्रसिद्ध सुपुत्रांच्या जीवनकार्याचा त्रोटक आढावा लोकांच्या पुढें ठेवण्याचें कार्यहि केलेलें आहे. कै. श्रीधर आत्माराम ऊर्फ तात्यासाहेब नाईक (रिटायर्ड जज्ज) यांच्या जीवनाचा परिचय पुस्तकरूपानें करून देऊन समाजानें पहिलें पुष्प १९५५ मध्यें प्रसिद्ध केलें. त्याचें जनतेनें मनःपूर्वक स्वागत केलें. त्यानंतर खानोली गांवच्या दुसऱ्या एका सुपुत्राचा जीवनवृत्तांत आज आपल्यासमोर ठेवण्याची सुसंधी समाजाला मिळालेली आहे. निवती मठाधिपति श्री दत्तगिरी महाराज हे आपल्या गांवचें भूषण होते. त्यांचा शिष्यवर्ग महाराष्ट्रभर पसरलेला होता. त्यांच्या अद्‌भुत लीलांमुळें आबालवृद्धांची त्यांच्यावर दृढ निष्ठा तर होतीच पण राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनीं 'अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे" म्हणून ज्याविरुद्ध बंड पुकारलें— तो अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न श्री दत्तगिरी महाराजांनीं तत्कालीन परिस्थितींत हळुवारपणें हाताळून सर्व समाजांना समानतेनें वागविलें. म्हणूनच त्यांचा शिष्यवर्ग सर्व जातींजमातींमध्यें आढळून येतो. अशा प्रकारचें समाजसुधारणेचें महत्तम कार्य करणाऱ्या या साधुपुरुषाच्या जीवनांतील विविध गोष्टी प्रा. दि. ग. नाईक यांनीं आपल्या रसाळ, सुबोध व सुटसुटीत भाषेंत जनतेपुढें मांडलेल्या आहेत.

प्रा. दि. ग. नाईक हे समाजाच्या संस्थापकांपैकीं एक असून समाजाच्या कार्याचें बरेंचसें श्रेय त्यांना अहे. विशेषतः खानोली गांवांतील सुपुत्रांच्या परिचयपत्रिका लिहून व त्या समाजामार्फत प्रसिद्ध करून समाजाच्या कार्यामध्यें

एक नवीन प्रथा सुरू केली; त्याचें श्रेय श्री. नाईक यांनाच आहे. ती पद्धत किती यशस्वी झालेली आहे हें प्रस्तुत पुस्तिका वाचून सुज्ञ वाचक वर्गच ठरवील. श्री. दादासाहेब परुळेकरांच्या पुरस्कारामुळें हें दुसरें पुष्प प्रसिद्ध करण्याची संधी समाजाला लाभली त्याबद्दल समाज दादासाहेबांचा ऋणी आहे. तसेंच, जनतेनेंहि समाजाची ही सेवा रुजू करून घ्यावी अशी त्याला नम्र विनंती आहे.

वसंत बाळकृष्ण तोरस्कर
खजिनदार,
खानोली ग्रामोत्कर्ष समाज (रजि.), मुंबई

निवेदन

आजकाल सत्पुरुष अथवा संत ह्या नांवाचा उल्लेख झाला कीं साधारणतः कोणाच्याहि कपाळाला आंठ्या चढतात. त्यांत कोणाची फारशी चूक आहे असें नव्हे ! जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत आज ढोंगबाजी इतकी बोकाळली आहे कीं सज्जन कोण, दुर्जन कोण, खरा कोण, खोटा कोण हेंच समजणें कठीण होऊन बसलें आहे. आणि म्हणूनच प्रत्येक गोष्टीकडे आम्ही साशंक दृष्टीनें पाहतों. संत हा-सुद्धां त्याला अपवाद होऊं शकत नाहीं. असें जरी सामान्यतः असलें तरी खोलवर पाहाणारे विचारवंत समाजांत असतातच. तसें नसेल तर मानवी समाज टिकत नाहीं. अशा विचारवंतांना एक गोष्ट आजवर स्पष्ट दिसत आली आहे कीं, अधूनमधून समाजामध्यें असामान्य साधुवृत्तीचीं माणसें जन्माला येतात. तीं स्वतः निरिच्छ राहून मानवतेची सेवा करण्यांतच इतिकर्तव्यता मानतात. या महाभागांपैकीं कित्येक कधींकधीं समाजापासून दूर गिरिकंदरांत जाऊन मानवाच्या कल्याणासाठीं परमेश्वराचें अखंड चिंतन करण्यांत काळ घालवितात. त्यांच्या जीवनाचारांचा समाजावर दृश्य परिणाम होत नाहीं हें खरें. परंतु दुसरे अनेक समाजामध्येंच राहून आपल्या आचारविचारांनीं समाजावर इष्ट परिणाम करीत असतात. मुख्यतः अशा महात्म्यांच्याच प्रयत्नांमुळें समाजनौका जीवन-सागरांतील वादळांत अबाधित राहून मार्ग काढूं शकते. परंतु त्यांच्या ह्या सदुद्योगाची जाणीव बहुजनसमाजाला नेहमींच होते असें नाहीं. किंबहुना पुष्कळ संतजन त्यांच्या हयातींत चेष्टेचा विषय झालेले दिसतात. कांहींचा तर अनन्वित छळ झाल्याचींहि उदाहरणें आहेत. ‘चोरांची पूजा आणि सज्जनांचा छळ’ असा हा उफराट्या जगाचा जवळजवळ नियमच झाल्यासारखा दिसतो. हीच वस्तुस्थिति ‘डीन इंग’ या आंग्ल पंडितानें पुढील वाक्यांत स्पष्ट केली आहे. We build palaces for popular brigands and raise a tom b-stone for long-forgotten saints !

येथवरच्या विवेचनावरून एका गोष्टीचा निश्चित बोध होतो कीं, बहुतेक संतजनांचा त्यांच्या हयातींत तत्कालीन बहुजनसमाजावर फारसा प्रभाव पडत नाहीं. अथवा अगदीं जवळ असल्यामुळें त्यांच्या सत्प्रवृत्तींची व्हावी तशी जाणीव होत नाहीं. पुष्कळ वेळां जवळ असूनहि दिसत नाहीं असें होतें खरें. आतां

मुद्याचीच गोष्ट घ्या. सुमारें १०० वर्षांपूर्वीं रत्नागिरी जिल्ह्यांतील वेंगुर्लें तालुक्यांत खानोली गांवीं निवतीमठाचे स्वामी श्रीदत्तगिरी गोसावी यांचें वास्तव्य होतें. ते मोठे अधिकारी पुरुष असून बहुजनसमाजाच्या कल्याणकारी कामांत सदा निमग्न असत. परंतु तत्कालीन लोकांना दत्तगिरींच्या प्रयत्नांची जाणीव व्हावी तशी झाली नाहीं. कारण असामान्य योग्यतेच्या या पुरुषाचें सान्निध्य लाभूनहि गांव जवळजवळ कोरडाच राहिला. ऐहिक व पारमार्थिक सुखाचा राजमार्ग स्वामींच्या रूपानें दैववशात् चालत आला.

परंतु दैवदुर्विलासामुळें बहुजनसमाजाला तो दिसलाच नाहीं. आणि कदाचित् त्यामुळेंच एक प्रकारच्या वैतागानें दत्तगिरींनीं अवतारकार्य लवकरच म्हणजे वयाच्या ४० व्या वर्षीं संपवून समाधि घेतली असें जाणते म्हणतात. स्वामींचें वास्तव्य वेंगुर्लें, सावंतवाडी, गोमंतक, बेळगांव, कारवार वगैरे ठिकाणीं कमी-अधिक प्रमाणांत झालेलें होतें. ज्या ज्या ठिकाणीं स्वामी थोडा काळ कां होईना, वस्तीला होते, त्या त्या ठिकाणीं प्रसंगोपात्त त्यांच्याकडून घडलेल्या एखादद्दुसऱ्या चमत्कारानें त्यांची पुण्यस्मृति आजवर टिकून राहिली आहे. परंतु त्यांच्याबद्दल सुसंगत माहिती उपलब्ध नाहीं. 'मूकं करोति वाचालम् पंगुं लंघयते गिरिम्' अशा अलौकिक सामर्थ्याचा महापुरुष आमच्यामध्यें निर्माण होऊन गेला. त्याचा इतिहास तर राहोच, पण साधासुधा वृत्तांत देखील लिहिला गेला नाहीं. ही गोष्ट अर्थात् वर नमूद केलेल्या जगरहाटीला धरूनच आहे.

श्रीमत्दत्तगिरी महाराजांनीं समाधि घेतल्यास आज ६८ च्या वर वर्षें होऊन गेलीं आहेत. म्हणून त्यांच्याबद्दल भावनावश न होतां अस्ति नास्ति विचार करण्यास पुरेसा काळ लोटला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रीदत्तगिरीमहाराजांच्या वडील बंधूंचे नातू श्री. बाळकृष्ण जगन्नाथ सामंत यांनीं गेलीं पंचवीस तीस वर्षें अविरत मेहनत करून स्वामींबद्दल अनेक कागदपत्र, चित्रें इ. माहिती जमविली. ही माहिती संकलित करून स्वामींचें जीवनकार्य चरित्ररूपानें बहुजन समाजापुढें ठेवतां आल्यास उत्तम, अशा विचारानें बाळकृष्णपंतांनीं गेलीं कित्येक वर्षें प्रयत्न चालविले. कांहीं नामवंत लेखकांच्या गांठीभेटी घेतल्या. परंतु त्यांना संकल्पित कार्यांत ताबडतोब यश आलें नाहीं. आणि तें यावें तरी कसें? दत्तगिरीमहाराजांच्या कृपाप्रसादाशिवाय त्यांचें चरित्र लिहिण्याची कुणाला इच्छाच कशी होईल? अथवा तुकोबांच्याच भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'तुका म्हणे तेथें

होत नाहीं हो तातडी, प्राप्तकाळ घडी आल्याविण.' बाळकृष्णपंतांची चिकाटी दांडगी. त्यांनीं प्रयत्न चालू ठेवले आणि 'प्राप्तकाळघडी' आल्यामुळेंच बरेच दिवस हवेंत असलेल्या या कामाला मूर्तस्वरूप येण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं.

श्रीमद्दत्तगिरी महाराजांचें हें चरित्र, श्री. बाळकृष्ण सामंतांच्या गेल्या तीस वर्षांच्या मेहनतीचें दृश्य फळ आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांनीं जमविलेल्या माहितीला माझ्याकडून चरित्राचा आकार मिळूं शकला हेंच माझें परम भाग्य होय. खरें पाहतां इतर महात्म्यांप्रमाणेंच श्रीमद्दत्तगिरींचेंहि चरित्र अगाध आहे. त्यांतील जो थोडा भाग माझ्या अल्प मतीला आकलन झाला तो कागदावर उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रंथ लिहून झाला तरी तो प्रकाशित होण्यास अनेकांचें सहकार्य लागतें. तसें सहकार्य या कामांत लाभलें ही खरोखरच आनंदाची गोष्ट. श्रीयुत सखाराम सीताराम नाईक, इंजिनिअर, वांद्रें, यांनीं ग्रंथप्रकाशनाचे बाबतींत बहुमोल सूचना व साहाय्य केलें.

श्री. बाळकृष्णपंतांच्या विनंतीला मान देऊन शंभराच्यावर स्त्रीपुरुषांनीं श्रीमद्दत्तगिरींबद्दल तोंडी वा लेखी माहिती पुरविली व अशा प्रकारें लेखनाचें साहित्य तयार झालें. साहित्य पुरविणाऱ्या सर्वांचीं नांवें देणें केवळ अशक्य आहे. तथापि त्यांनीं चरित्राचा पाया रचण्याचें महत्कार्य केलेलें आहे. त्या सर्वांना शतशः धन्यवाद. श्रीयुत दादासाहेब परुळेकरांनीं पुढाकार घेऊन लेखनाच्या कामाला चालना दिली व वेळोवेळीं अचूक मार्गदर्शन केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. ज्यांच्या लेखी माहितीचा, आधार म्हणून उपयोग झाला त्या सर्वांचा नामोल्लेख केलेला आहे. खानोली ग्रामोत्कर्ष समाजानें ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल धन्यवाद. अनेकांच्या सक्रिय साहाय्यावांचून अशा तऱ्हेचीं कामें होत नाहींत. सर्व मदतगारांचा नामोल्लेख करून आभार मानणें केवळ अशक्य आहे. म्हणून शेवटीं ज्यांचें ज्यांचें या सत्कार्याला हस्तें वा परहस्तें साहाय्य झालें त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद देऊन निवेदन संपवितों.

अनंत चतुर्दशी
ता. १५–९–१९५९

दि. ग. नाईक

पु ष्प प हि लें

अज्ञातेनापि ग्रामेण माहात्म्यम् प्राप्यते क्वचित्।

खानोलीचा भाग्योदय

रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण टोंकास पुरातन काळापासून व्यापारासाठीं प्रसिद्ध असलेलें वेंगुर्लें शहर आहे. हें उत्तम बंदर असल्यामुळें सुमारें ४०० वर्षांपूर्वी डच व्यापाऱ्यांनीं आपली वखार या ठिकाणीं बांधली. ती आजहि सुस्थितींत आहे. या शहराच्या उत्तरेस तीन मैलांवर पूर्व–पश्चिम पांच मैल लांब व दक्षिणोत्तर चार मैल रुंद अशा समुद्रकिनाऱ्याला लागून असलेल्या भूभागाला खानोली गांव म्हणतात. निसर्गसंपत्तीच्या बाबतींत कोंकण किनाऱ्यावरील इतर गांवांप्रमाणें खानोलीही समृद्ध आहे. दक्षिण सीमेला पूर्व–पश्चिम दाभोलीची खाडी वाहते. उत्तरेला पूर्व–पश्चिम फळये फोंडा खाडी आहे. पश्चिमेला अरबी समुद्र आणि पूर्वेला कमीअधिक प्रमाणांत डोंगरांच्या रांगा अशी ही स्वाभाविक रचना आहे. उत्तर दक्षिण सीमेवरील दोन खाड्यांच्या व्यतिरिक्त इतरहि अनेक लहानमोठे व्हाळ डोंगरांत उगम पावून समुद्राकडे धावतात. १०० वर्षांपूर्वीं हा बहुतेक भाग अरण्यमयच होता. व्हाळांच्या दोन्ही अंगांला मोठमोठ्या घळणी (घळी) असून त्यांत फार दरड वाढलेली असे. डोंगरमाथ्यावर व उतरणीवर ठिकठिकाणीं सूर्यप्रकाशाचाहि आंत प्रवेश होत नसे अशा करवंदीच्या जुनाट व गर्द झाळी (जाळ्या) होत्या. पश्चिम किनारा—चार मैलांचा शुभ्र वाळूचा पट्टा—हा काजीच्या वांकड्यातिकड्या पण घनदाट झाळींनीं व्यापलेला होता. त्या झाळींत

ठिकठिकाणीं नाग, फुरशीं वगैरे सरपटणारे प्राणी मोठ्या प्रमाणावर वस्ती करून होते. त्यांतच तेथें भर दिवसां भुतें नाचतात असा प्रवाद असल्यामुळें कोणी एकटादुकटा त्या बाजूस फिरकण्याससुद्धां धजत नसे !

सुमारें आठशें वर्षांपूर्वी खानोलीच्या भूमीवर भाग्यसूर्याचीं किरणें पडण्यास सुरुवात झाली. कुडाळ देशकर गौड ब्राह्मण ज्ञातींतील वत्सगोत्री प्रभू आडनांवाच्या लोकांनीं ह्या अरण्यमय व निर्मनुष्य भागाचा ताबा घेतला. नाहीं म्हणायला गांवाच्या ईशान्य टोंकाला वेतुरें गांवाच्या हद्दीवर चार डोंगरांनीं संरक्षित व मध्यें गोड्या पाण्याचा वहाळ असलेला एक जमिनीचा सौथळ तुकडा होता. याच भागांत एक पुरातन जैन देवस्थान होतें. त्याच्या आश्रयानें राहणारीं मराठा समाजाचीं चारदोन घरटीं कशीबशी स्वतःची गुजराण करीत होतीं. प्रभूंनीं प्रथम हें देवस्थान ताब्यांत घेतलें. त्यांतील जैनांच्या दिगंबरमूर्ति त्यांनीं उपटून देवळाच्या बाहेर ठेविल्या व श्रीसिद्धेश्वर रवळनाथादि बारा हिंदू देवतांची वेगवेगळ्या देवळांत स्थापना करून त्या देवस्थानचे स्वतः व्यवस्थापक व मानकरी म्हणजे गांवकरी झाले. इतकें झाल्यावर सगळा खानोली गांव साहजिकच प्रभूंचें वतन बनलें. लगेच त्यांनीं गांव वसविण्यास सुरुवात केली. डोंगराच्या उतरणीवरील रान तोडून घरासाठीं व लागवडीसाठीं कुणगे बांधले. सौथळ जागा सांपडण्यासारखी नव्हती. जी थोडीबहुत सपाट जमीन होती ती डोंगरमाथ्यावर; पण शुद्ध कातळ (काप). त्याच्यावर करडाची काडीसुद्धां रुजत नसे. अर्थात् घरें बांधायला जागा उत्तम होती. परंतु पाण्याच्या सान्निध्याशिवाय घरें कशाशीं खाणार ?

अशा रीतीनें इतक्या वर्षांपूर्वीपासून गांव वसण्यास सुरुवात झाली. तरी कालपरवांपर्यंत खानोलीचीं रानें जवळजवळ शाबूत होतीं. त्यांतून वाघ, लांडगे, तरस, रानडुक्कर, कोल्हे, बाउल (रानमांजर), भेकर, साळिंदर, ससे इत्यादि श्वापदांचें वास्तव्य होतें. नाग, फुरशीं आदिकरून सरपटणारे प्राणी तर अनंत होते. वानरांची पैदास फार मोठ्या प्रमाणावर होत असे व आजही त्यांत फारशी घट झालेली नाहीं. जनावरांना वस्तीलायक अनेक ढोली (गुहा) ठिकठिकाणीं होत्या. अजूनहि कांहीं आहेत. संन्याशांना वास्तव्य करण्यास निवान्त अशा चारदोन ढोलीही होत्या. निवती मठाजवळ असलेल्या अशाच एका गुहेंत आपले चरित्रनायक श्रीमद्दत्तगिरी महाराज ध्यानस्थ बसत असत. कुतूहलाचा

विषय म्हणून ओघाओघानें उल्लेख करण्यासारखी दुसरी एक गुहा पश्चिम किनाऱ्यावर आहे. या ठिकाणीं डोंगराचा एक सुळका थेट समुद्रांत घुसलेला आहे. याला कोंडुऱ्याचा डोंगर म्हणतात. डोंगराचा कडा तुटका, उंच व गर्द झाडीनें आच्छादित असून त्याच्या पायथ्याशीं उंच माणसाला ताठ उभें राहतां येईल इतक्या उंचीची व त्याच्या जवळजवळ दीडपट रुंदीची ही गुहा आहे. परंतु ही गुहा नसून तें एका भुयाराचें तोंड आहे. या भुयाराचा उगम कोठें आहे हें अद्यापि एक गूढच आहे. तथापि हें भुयार शिवकालीन आहे असें समजतात. पावसाळयास सुरुवात होण्याच्या अगोदर ४-८ दिवस समुद्राच्या तुफानी लाटा या भुयाराच्या तोंडावर प्रचंड वेगानें आदळतात. त्यांचा तोफेसारखा होणारा आवाज आसमंतांत फार दूरवर ऐकूं येतो. हा आवाज उठूं लागला कीं, "कोंडुरो गराजता-पावुस इलो !" (कोंडुऱ्याची गर्जना सुरू झाली. पाऊसकाळ अगदीं नजीक आला.) असे सूचक शब्द अनुभवी माणसांच्या तोंडीं ऐकूं येतात व पाऊसकाळाच्या बेगमीसाठीं लोकांची धांवपळ सुरू होते. कोंडुऱ्याच्या भुयाराला ऐतिहासिक महत्त्व असो वा नसो, वर्षाकाळाचें आगमन सुचविणारी अचूक खूण म्हणून त्याची ख्याति आजतागायत अबाधित आहे.

खानोलीच्या अरण्यसंपत्तीचा व सृष्टिरचनेचा जों जों जास्त विचार करावा तों तों मनाची खात्री पटूं लागते कीं खानोली व आसपासचा भूप्रदेश खरोखर श्वापदांच्या संचाराला आणि मुनिजनांच्या निवासालाच साजेसा होता. आणि योगायोगानें घडलेंहि तसेंच. खानोली मठापासून अवघ्या तीन मैलांवर पूर्वसीमेलगत दाभोली गांवीं कुडाळ देशकर गौड ब्राह्मणांच्या शंकराचार्यांचा मठ आहे. तसेंच, उत्तरेस तीन मैलांवर तेंडुली गांवीं बागलांची राई येथें चिदानंद स्वामींचा मठ आहे. असे हे तीन संन्यासी मठ जवळजवळ सहा मैलांच्या टापूंत आहेत. प्रभूंची खानोलीची वसाहत मुख्यतः तीन वाड्यांत झाली. देवस्थानचा भाग असलेली आंबेसवाडी, मठाचें अधिष्ठान लाभलेली निवतीवाडी व समुद्रकिनाऱ्याला लागून असलेली वायंगणी वाडी. प्रभु हे खानोलीचे गांवकरी, वतनदार खरे. परंतु त्यांची सांपत्तिक स्थिति यथातथाच होती. शेतजमीन फारशी नव्हतीच. गुरेंढोरें पाळणें हा मुख्य धंदा. आंबा, काजू, फणस व इतर रानफळें तसेंच शाकभाज्या, यांचा निर्वाहासाठीं उपयोग करावा लागे. त्या काळीं आजच्यासारख्या गरजा नव्हत्या. जाडेभरडें अन्न, अन् लाज

झांकण्यापुरतें वस्त्र. पण तें तरी मिळण्याची शाश्वती कुठें होती ? आणि अशी ही कंगाल स्थिति होती म्हणून वंशवृद्धि थोडीच थांबणार! निवती वाडींतील प्रभूंच्या पांचांचे पंचवीस तेव्हांच झाले! वतनाचा तुकडा होता तेवढाच राहिला. त्याची वाढ कशी होणार ? अर्थात् अनेक पुरुष नशीब काढण्यासाठीं देशांतरास गेले. त्यांपैकीं कांहीं थोडे संपत्ति व ज्ञान संपादन करून परतहि आले.

सुमारें साडेपांचशें वर्षांपूर्वीं निवतीच्या प्रभूंपैकीं एक मुलगा अगदीं बाल्यवयांतच परागंदा झाला. तो बहुधा काशी क्षेत्रीं गेला असावा अशी भावना होती. तें कसेंहि असो. हा मुलगा जिकडे गेला तिकडेच तो वाढला व ज्ञान-संपन्नहि झाला. भारतामध्यें त्या काळीं गोसाव्यांचे गिरी, पुरी, भारती, सरस्वती आदिकरून अनेक पंथ होते. जागोजाग मठ स्थापन करून लोकजागृति करण्याचें कार्य हे गोसावी करीत असत. त्या गोसाव्यांच्या पंथांपैकीं गिरीपंथाची दीक्षा या मुलाला मिळाली. त्याचें संप्रदायी नांव हरिचरणगिरी असें झालें. हरिचरणगिरींचे गुरु कोण, त्यांना दीक्षा कशी मिळाली वगैरे गोष्टींबद्दल जिज्ञासा वाटणें स्वाभाविक आहे. परंतु या बाबतींत विश्वसनीय माहितीच्या अभावीं निराशा पत्करण्या-शिवाय गत्यंतर नाहीं. अशा तऱ्हेनें अगदीं लहान वयांत घराला पारखा झालेला मुलगा वयाच्या पन्नाशीच्या सुमाराला परमयोगसंपन्न हरिचरणगिरी बनून मायभूमीला परत आला. त्यांच्या अंगावरील खाणाखुणांवरून व त्यांनीं निवेदन केलेल्या माहितीवरून त्यांची ओळख वृद्ध मंडळींना तत्काळ पटली. त्यांनीं मोठ्या प्रेमानें आणि हर्षातिरेकानें हरिचरणगिरींचें स्वागत केलें. असलें हें निधान आपल्या कुळांत जन्माला घातल्याबद्दल भरल्या डोळयांनीं दयाघन प्रभूला धन्यवाद दिले. पण हरिचरणगिरी निवतीला परत कां आले ? परमेश्वरप्राप्तीचें साधन त्यांना अवगत झालें होतें. अंतिम सुखाचा ठेवा त्यांना सांपडला होता. मग निवतीच्या कांट्याकुट्यांत आणि दगडधोंड्यांत ते परत कां आले ?

हरिचरणगिरी परत मायभूमीला आले, कारण ते एक महान् संत होते. ह्या ठिकाणीं संतश्रेष्ठ तुकोबांबद्दलच्या एका कथेची आठवण होते. तुकोबांच्या भक्तीनें देव प्रसन्न होतसाते म्हणाले, 'बुवा, आतां आणखी कष्ट कशाला ? स्वर्गांत चला करा —' तुकोबा उत्तर करतात, 'देवा, माझ्या ह्या अडाणी रंजलेल्या गांजलेल्या बांधवांसकट मला जर नेत असशील तर मी स्वर्गांत येण्यास तयार आहें.' ही बोलूनचालून कथाच आहे. ती खरी कीं खोटी हा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. तींत

संतांचें मर्म किंवा अंतरंग प्रतिबिंबित झालेलें आहे. तुकोबांना एकट्यांना मुक्ति नको होती. त्यांना समाजाचा उद्धार पाहिजे होता. खऱ्या संताची कसोटी इथेंच आहे. म्हणूनच संत समाजाकडून होणारा छळ सहन करूनहि समाजामध्येंच राहतात. त्याच्या उलट कांहीं स्वतःचा एकट्याचा उद्धार व्हावा म्हणून समाजापासून दूर दूर गिरिकंदरांत जाऊन राहातात. अशा महाभागांचा उद्धार होतच असेल असेंहि समजण्यास जागा नाहीं. समर्थ म्हणतात, 'वेडे संसार सोडोन गेले, तरी ते कष्टकष्टेच मेले, दोहींकडे अंतरले, इहलोक परत्रीं ॥' अशा ह्या समाजापासून दूर जाणाऱ्या व्यक्तींबद्दल फारशी खंत बाळगण्याचें कारण नाहीं. हरिचरणगिरी एक थोर संत होते. समाजांतील स्वकर्तव्याच्या जाणीवेमुळेंच ते परत आले असले पाहिजेत. ते ब्रह्मचारी विरक्त होते. परंतु त्यांनीं मातापितरांच्या उदरीं जन्म घेतला होता. निवतीच्या व्हाळांत लहान असतांना ते डुबकले होते. तेथील दगडांनीं त्यांचें अंग ठेंचाळलें होतें. करवंदीचे चारदोन कांटे त्यांच्या अनवाणी पायांत मोडले होते. आणि म्हणूनच पन्नाशी उलटून गेली असूनहि स्वामींनीं घराची वाट धरली. मोक्षाचें साधन प्राप्त झालें तरी पितृऋणांतून आणि समाजऋणांतून ते मुक्त झाले नव्हते. पूर्वजांचे पांग कर्तबगार वंशजांनीं फेडावयाचे नाहींत तर मग कोणी ? आणि तसें नसेल तर पुत्रप्राप्तीसाठीं आटापीटा तरी कोण करील ? अज्ञानांत बुडणाऱ्या आणि दारिद्र्यांत होरपळणाऱ्या स्वजनांना पाहून स्वामींचें अंतःकरण कळवळलें. म्हणूनच स्वामी एक थोर संत होते. स्वतःचें अंतिम कल्याण त्यांनीं साध्य केलें होतेंच. परंतु 'बुडती हे जन न पहावे डोळां, म्हणोनी कळवळा येतो मज.' अशी त्यांच्या मनाची अवस्था होती.

हरिचरणगिरींनीं लोकशिक्षणासाठीं निवतींत आश्रम बांधला. त्यांनीं बांधलेला हा आश्रम म्हणजेच निवतीचा गिरिमठ होय. मठासाठीं निवडलेलें ठिकाण 'मळी' फारच रमणीय स्थळ होतें. इकडील ठिकाणें म्हणजे डोंगराच्या उतरणीवर बांधलेले कुणगे. अशाच एका कुणग्यांत मठ बांधला. वरच्या भागाला थेट डोंगरमाथ्यापर्यंत आंबा, काजू, कवठ, रतांबा, खैर, साग इ. झाडांची दाटी. त्यांच्या साहाय्यानें वाढणाऱ्या व त्यांचे शेंडे अंतराळांत एकमेकांना बांधणाऱ्या रानवेली. आवतीभोंवतीं व खालीं थेट व्हाळापर्यंत माडांपोफळींचीं आगरें. निवतीचा सर्वच भाग असा हा मोठा रमणीय व चित्तवृत्ति प्रसन्न करणारा आहे.

संतांच्या केवळ दर्शनमात्रेंच दुःख नाहींसें होऊन मन शांत होतें म्हणतात (जगमां संतसखी शृं न थाय, जे ना दर्शनेज दुख जाय!). निवतीच्या दर्शनानेंसुद्धां हीच गोष्ट साध्य होत असे. विकारांनीं पेटलेला माणूस कर्मधर्मसंयोगानें निवतींत आला तर त्याचे विकार तत्काळ निवून तो पूर्ण शुद्धीवर येत असे. हरिचरणगिरींच्या सहवासानें निवती एक पूण्यभूमि बनली. शेवटच्या श्रीमद्दत्तगिरी महाराजांच्या सहवासानें तर निवतीच्या वैभवावर कळस चढला. दत्तगिरीमहाराजांचे एक भक्त कवि कै. श्रीकृष्ण कान्होबा झारापकर म्हणतात, 'श्रीमत् दत्तगिरींच्या सहवासें पुण्यभूमि ती निवती ॥ गोश्वत्थव्याघ्रादि, बोधें मानव तसे किती निवती ॥ १ ॥'

हरिचरणगिरींनीं जवळजवळ ५०० वर्षांपूर्वी निवतीच्या गिरिमठाची स्थापना केली. गिरीसंप्रदायी गोसाव्यांना अशा तऱ्हेनें लोकसेवा करण्याची पद्धत नवीन नव्हती. स्वामींनीं तीच पद्धत पुढें चालू ठेवली. मठामध्यें पंतोजी नेमून गरजूंना प्राथमिक शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली. स्वतःच्या सदाचारानें क्वचित् प्रसंगीं चमत्कारांनीं लोकांचीं मनें वळवून धर्माचरणाकडे लावलीं. त्यांच्या सहवासांत नित्य एक वाघ येऊन बसत असे. कधींकधीं तर हा वाघ, गुरें रानांत चारून परत वळवून आणीत असे. स्वामींना धुमीसाठीं लागणारीं लाकडें हा वाघच पुरवीत असे असें सांगतात. स्वामींच्या सहवासानें निवतींतील प्रभूंची भरभराट झाली. गांवांत व राजदरबारीं त्यांचा मान वाढला. गांवची फौजदारी (पाटीलकी) त्यांच्याच शाखेकडे आली. स्वामी फार दूरदर्शी होते. मठाची परंपरा टिकण्यांत निवतकरांचें कल्याण आहे ही गोष्ट त्यांनीं अचूक जाणली. आणि म्हणून 'आमच्यापैकीं एक मुलगा आम्ही वेळोवेळीं मठाचा अधिकारी होण्यासाठीं देऊं' अशी कबुली त्यांनीं निवतकरांकडून घेतली. पन्नाशीच्या नंतर स्वामी निवतींत आले व त्यानंतर जवळजवळ ४० वर्षे त्यांनीं अनन्यभावानें मायभूमीची सेवा केली. मठपरंपरा नीट चालण्यासाठीं त्यांनीं राजदरबारांतून जमिनींच्या उत्पन्नाच्या सनदी मिळविल्या. त्याप्रमाणें 'बाणभाटले' व 'मळी' हीं दोन ठिकाणें मठाच्या स्वास्थ्यासाठीं विजापूरच्या आदिलशहाकडून इनाम म्हणून मिळविलीं. स्वामींनीं त्या ठिकाणांत माडापोफळींची लागवड केली. निवतकरांना कामसू व कर्तव्यतत्पर बनवून ऊर्जितावस्थेस आणलें. निवतकरांनीं परशराम नांवाचा त्यांच्यांतील एक मुलगा गिरी होण्यासाठीं स्वामींचे स्वाधीन केला. त्याला स्वामींनीं गिरीपंथाची दिक्षा दिली व त्यांचे पश्चात् परशरामगिरी

मठाच्या गादीचे अधिकारी झाले. हरिचरणगिरींनीं वयाचे नव्वदाव्या वर्षी मठामध्येंच जिवंत समाधि घेतली. ते प्रथम निवतींत आले त्यावेळीं त्यांचेबरोबर एक वाणी जातीचा शिष्य होता. हा नित्य स्वामींबरोबर राहून त्यांच्या कार्यांत मदत करीत असे. ह्यानेंही स्वामींप्रमाणेंच जिवंत समाधि घेतली. मठासमोरील पिंपळ वृक्षाखालीं या वाणीशिष्याची समाधि आहे. हरिचरणगिरींच्या वाणी शिष्याप्रमाणेंच त्यांच्या बाबाचीहि समाधि मठाचे वरचे अंगास डोंगराच्या उतरणीवर आहे.

निवतींतील हरिचरणगिरींच्या[1] मठाइतका पुरातन मठ द. कोंकणांत दुसरा नाहीं. अव्याहत ५०० वर्षे या मठाची परंपरा चालू आहे. अशी चिरंतन संस्था स्थापन करणाऱ्या पुरुषाची कर्तबगारी असामान्यच म्हटली पाहिजे. आमच्या संस्था आळंब्याप्रमाणें दिसतात न दिसतात तोंच मावळतात. आणि एखादी गोष्ट करायला घेतलीच तर कोंकणांत म्हणतात त्याप्रमाणें, 'गणपती करूंक गेलो आणि केलडां जालां' (विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्।) तशी गत होते. पूर्वसुकृतामुळें हरिचरणगिरींसारख्या महात्म्याचा निवतींत जन्म झाला. परंतु केवळ जन्म झाल्यामुळें सर्व कांहीं घडतें असें नव्हे ! आपली जन्मदात्री अडाणी, अभागी, दरिद्री म्हणून तिला दूर लोटणारे भाग्यशाली पुत्रही आहेत ! असोत बिचारे ! स्वामींची गोष्ट निराळी, ते निवतीचे सत्पुत्र होते. त्यांनीं मायभूमीलाच कर्मभूमीहि बनविलें आणि स्वपराक्रमानें ऐहिक व पारमार्थिक सुखाचा राजरस्ता त्यांनीं खानोलीच्या वेशीला आणून भिडविला. स्वबांधवांच्या पिढ्यान्‌पिढ्यांना त्या मार्गानें जाऊन स्वतःचा उद्धार करतां यावा म्हणून हा सर्व खटोटोप हरिचरणगिरींनीं केला.

हरिचरणगिरींच्या पश्चात् निवतकरांच्या वंशांतील मुलगे गिरी बनून मठाच्या गादीवर बसले. कर्तबगारीच्या बाबतींत ते सामान्य होते आणि तें स्वाभाविकच आहे. अलौकिक सामर्थ्याचे पुरुष कांहीं वारंवार निर्माण होत नसतात. परंतु गिरीपरंपरा व्यवस्थित चालू राहिली. हरिचरणगिरींच्या नंतर जवळजवळ २५० वर्षांनीं सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत द. कोंकणांत श्री. चिदानंदस्वामी गोसावी या दुसऱ्या एका महापुरुषाचा उदय झाला. त्यांचें मूळ नांव रुद्राजी बाळकृष्ण

---

१. धोंडू यशवंत गोसावी बागलकर, बागलांची राई. ता. २९-१२-३२.

प्रभु मतकरी आजगांवकर. रुद्राजीचा जन्म इ. स. १६३० मध्यें आजगांव येथें झाला. ९ वर्षांचा असतांनाच वडील निवर्तले. निराधार झालेली रुद्राची माउली त्याला घेऊन माहेरीं वेतुऱ्यास गेली. रुद्राजी एक खेडवळ पोर होता. तो आजोळचीं गुरें राखूं लागला. एक दिवशीं खडसेलच्या भयानक रानांत गुरें चारीत असतां कर्मधर्मसंयोगानें उत्तरयात्रेस निघालेले पूर्णानंद स्वामी एका जिवंत वाघासह त्याच रानांत आले. रुद्राजी त्यांना अनन्यभावानें शरण गेला. स्वामींनीं रुद्राजीला अनुग्रह देऊन त्याचें नांव चिदानंद असें ठेवलें. चिदानंदांनीं गुरूंच्या सहवासांत अनेक वर्षें राहून विद्यार्जन केलें. नंतर भारतांतील तीर्थक्षेत्रें पाहून व एक महायोगी बनून चिदानंद गुरूसह पुन्हां दक्षिणेंत मायभूमीला आले. कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीच्या शंकराचार्यांचा मठ (निवतीमठानंतर जवळजवळ १०० वर्षांनीं स्थापन झालेला) कुडाळनजीक सोनवडे या गांवीं होता. त्या मठाचें आधिपत्य इ. स. १६७० चे सुमारास श्री. पूर्णानंदस्वामींनीं स्वीकारलें व त्या मठाची गादी निवती मठापासून तीन मैल अंतरावर दाभोली गांवीं प्रस्तुतच्या अतिनिसर्गरम्य स्थळीं आणली. या स्थापनेचीं सर्व कामें गुरूंच्या आज्ञेवरून श्रीचिदानंदांनीं केलीं. त्यांनीं या ठिकाणीं एक वैदिक पाठशाळाहि सुरू केली.

चिदानंदस्वामी दाभोलीमठाच्या दक्षिणेसाठीं फिरत असतां एके दिवशीं खानोलीच्या उत्तर सीमेस असणाऱ्या केळुस गांवीं एका प्रतिष्ठित गृहस्थाच्या घरीं गेले. घराच्या मालकाला समंधाची पीडा असून त्यामुळें तो स्वामींच्या आगमनाचे वेळीं बेशुद्ध झाला होता. आप्तेष्टांनीं स्वामींना रडतरडत कर्मकथा निवेदन केली. स्वामींना दया आली. त्यांनीं कमंडलूंतील पाणी शिंपडून मालकाला शुद्धीवर आणलें. गृहस्थ मोठा सज्जन होता. त्यानें अगदीं गळ घातल्यामुळें पीडा कायमची नष्ट होण्यासाठीं स्वामींनीं एकान्त ठिकाणीं अनुष्ठान करण्याचें कबूल केलें. या कामासाठीं योग्य अशी किर्र रानाची एक टेकडी गृहस्थानें विकत घेऊन स्वामींना दिली. या रानराईत बागुलांची (वाघांची) वस्ती होती. म्हणून हिला बागलांची राई म्हणत. अशा रीतीनें चिदानंद स्वामींनीं बागलांच्या राईला स्वतःचा आश्रम स्थापला. हा निवतीमठापासून ३ मैल अंतरावर आहे. यावेळीं चिदानंदस्वामींचें वय ४० चे वर होतें. त्यानंतर गुरुआज्ञेप्रमाणें स्वामींनीं लग्न करून प्रपंच केला. त्यांना सहा मुलगे झाले. वृद्धपणीं त्यांनीं पुन्हां संन्यास

घेतला व आपण स्थापन केलेल्या आश्रमांतच (मठांत) जिवंत समाधि घेतली. चिदानंद स्वामी एक उत्तम कवि व भाष्यकार होते. त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले. दुर्दैवानें ते अग्नीच्या भक्ष्स्थानीं पडले. फक्त एकच लहानसा ग्रंथ[1] उपलब्ध आहे. निवतीमठाच्या गादीवर यावेळीं श्री संतोषगिरी होते. श्रीचिदानंदांच्या व्यक्तिमत्वाचा सुगंध सगळीकडे दरवळत होता व त्यांतून निवतीमठापासून अवघ्या ३ मैलांवर दोन ठिकाणीं त्यांनीं तपोभूमींची स्थापना केली होती. अशा महात्म्याच्या निकट सहवासानं पुनीत होण्याची संधी सहसा कोण गमावील? संतोषगिरींनीं श्रीचिदानंदांच्या चरणीं आपली सेवा अर्पण केली. त्यांची योग्यता जाणून त्यांना आपले गुरु केलें. अशा रीतीनें सगळ्या प्रभू खानोलकरांचे चिदानंदांचे वंशज बागलकर हे गुरु झाले. दाभोली मठांतील धार्मिक कामांची व्यवस्था त्यांच्याकडे होतीच. आतां निवतीमठाचेंहि पौरोहित्य त्यांच्याचकडे आलें. अशा रीतीनं निवती, दाभोली व बागलांची राई या तिन्ही मठांचे संबंध अकल्पित योगायोगानं बांधले गेले.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत श्रीभगवानगिरी निवतीच्या मठाचे अधिकारी झाले. निवतीच्या गिरीपरंपरेंतील हे सातवे गिरी होत. ते फार चाणाक्ष, कर्तव्यदक्ष आणि त्याकाळच्या मानानें राजकारणीही होते. निवतीव्हाळाच्या पलीकडच्या बाजूस केळूस गांवीं नागेंद्रगिरी म्हणून एक लहानसा मठ होता. तो त्यांनीं निवतीमठास जोडला. तसेंच तेंडोली येथें शंभुगिरी म्हणून मठ होता. तोहि जोडला. सावंतवाडींतील वेंगुर्ले महालाच्या सीमेवर असलेल्या वज्राट गांवीं उद्धवगिरी म्हणून असलेला एक गिरीमठहि भगवानगिरींनीं संपादन केला. अशा तऱ्हेनें खानोली, केळुस, तेंडोली व वज्राट या चार गांवांतील मठांच्या इतमामासाठीं सरकारांतून सुटलेलीं उत्पन्नें निवती मठाधिकाऱ्याला भोगूं लागलीं. निवतीमठ चांगला ऊर्जितावस्थेस आला. पण कालचक्र कांहीं थांबत नाहीं आणि जन्म पावलेल्याला शैशव, तारुण्य, जरा आणि मरण या अवस्थांतून जावेंच लागतें. भगवानगिरींचें वय होऊं लागलें. शारीरिक शक्ति सरूं लागली. स्वामी कांहीं मरणाला भीत होते असें नव्हे. परंतु त्यांचें मन चिंतेनें व्यग्र झालें होतें. गिरीपरंपरा चालण्यासाठीं मठाला अधिकारी मुलगा सांपडेना. हरिचरणगिरींपासून

---

१. स्वानंदलहरी ; गुरुगीतेवर प्राकृतांत पद्यमय टीका.

भगवानगिरींपर्यंत परंपरा नीट चालली. कुठें कांहीं अडचण पडली नाहीं. भगवानगिरींचा समाधिकाल अगदीं जवळ आला होता. तरी स्वामी निराश झाले नाहींत. त्यांनीं सर्व निवतकरांना जवळ बोलावून, 'अजूनहि एक मुलगा मठासाठीं माझ्या स्वाधीन करा. त्याला गिरीदीक्षा दिल्यावर माझा मार्ग मोकळा होईल,' असें कळवळून सांगितलें. मंडळींपैकीं एक गोरखे अने प्रभु, भोळे, भाविक होते. वय साठीच्या आसपास होतें. स्वामींची निर्वाणीची भाषा ऐकून त्यांना भडभडून आलें. भगवानगिरींच्या चरणावर माथें ठेवून त्यांनीं वचन दिलें, 'या पायाच्या प्रसादान आता झिल झालो तर मठाकच घालीन.' स्वामी महाराजांच्या पायाचा प्रसाद म्हणा किंवा योगायोग म्हणा, म्हाताऱ्या गोरखे प्रभूंना १८५० मध्यें दत्तात्रेय नांवाचा मुलगा झाला. त्यांनीं तो वचनाप्रमाणें मठाला अर्पण केला. भगवानगिरींनीं दत्तूचें लालनपालन केलें. परंतु शेवटीं १८५८ मध्यें दत्तूला गिरीदीक्षा न देतांच भगवानगिरी समाधिस्थ झाले!

निवती मठाधिपतींची परंपरा

(१) हरिचरणगिरी (संस्थापक)
(२) परशरामगिरी
(३) सोमगिरी
(४) गोविंदगिरी
(५) संतोषगिरी
(६) विश्वनाथगिरी
(७) भगवानगिरी
(८) दत्तगिरी

गोरखे अने प्रभू, खानोलकर, गांवकर

अनंत	गोविंद	विनायक	दत्तात्रेय (दत्तगिरी गोसावी)

पुष्प दुसरें

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

चरित्रनायकाचा जन्म व बालपण

हरिचरणगिरींपासून खानोलकरांच्या, विशेषतः निवतकरांच्या भरभराटीला सुरुवात झाली, ती सातव्या भगवानगिरींपर्यंत सारखी थोड्याफार चढउतारानें चालूच राहिली. सांपत्तिक स्थिति फारच अप्रतिम होती असें नव्हे. परंतु लोक खाऊनपिऊन सुखी होते. अल्पसंतोषी होते. गिरीमठाला भजत. समाधि-पुरुष त्यांचा संरक्षणकर्ता होता. त्याच्या कृपाछत्राखालीं निवतकर सदाचारानें कष्ट करून मिळवीत. त्याला स्मरून मिळवलेल्याचा विनियोग करीत. परंतु सदैव हें असेंच कसें चालणार! घराण्याचें काय, राज्याचें काय, किंवा स्थानाचें काय, माहात्म्य सदाकाल थोडेंच टिकतें! त्यांना उदयास्त असतात. शिवाजीमहाराजांनीं मराठेशाही किती भक्कम पायावर उभी केली! परंतु त्या महापुरुषाचें अवसान होतें न होतें तोंच ती डळमळूं लागली. औरंगजेबाच्या साम्राज्याला त्याच्या डोळ्यांदेखत तडे गेले. आणि तुमच्याआमच्या डोळ्यांदेखत ज्याच्यावर कधींही सूर्य मावळत नसे तें बलाढ्य ब्रिटिश साम्राज्य स्वतःच मावळलें! मग निवतीमठाची आणि निवतकरांची काय कथा! असें जरी असलें तरी हरिचरण-गिरींची पुण्याई मोठी. निवतकरांना अव्याहत ४०० वर्षें सुखासमाधानाचीं गेलीं.

सातव्या भगवानगिरींच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात स्थिति पालटली. काय

झालें कुणास ठाऊक, पण निवतकरांची बुद्धीच फिरली. गिरीमठ म्हणजे सोनें प्रसवणारी हंसी. परंतु त्या गिरीमठाबद्दलच निवतकरांच्या मनांत विकल्प आले. 'विनाशकाले विपरीत बुद्धि–' आधीं बुद्धि जाते मग वैभव जातें. निवतकरांची सुस्थिति होती. गुरेंढोरें होतीं. बेफाम होण्याइतपत संपत्ति नव्हती. पण दोन वेळांची ददातही नव्हती. श्रीभगवानगिरींनीं मठाची पुष्कळ भरभराट केली. मठांतील प्राथमिक शाळेंत अनेक निवतकर शिकूनसवरून पोटापाण्याला लागले. १८४० च्या सुमाराचा तो काळ अंदाधुंदीचा खरा. परंतु धाडसी माणसाला ती एक सुवर्णसंधीच. मुलांबाळांनीं शिकूनसवरून नशीब काढावें. निवतीच्या घोलांत राहून त्यांचा उदय कसा होणार? अशी स्वाभाविक भावना वाढूं लागली. भगवानगिरी आतां वृद्ध झाले होते. मठाला मुलगा देण्याचा प्रश्न उपस्थित झाला. पण जो तो कांकू करूं लागला. गिरीमठाची परंपरा बंद पडावी असें कोणास वाटत नव्हतें. परंतु ती चालू रहाण्यासाठीं स्वतःचा मुलगा कोणी द्यावा! स्वतःच्या हातानें पोटचा गोळा गिरी बनण्यासाठीं देण्यास कोणता व्यवहारी बाप तयार होईल! होतकरू मुलाचा त्याच्या विकासास वाव देण्यापूर्वींच अशा तऱ्हेनें निकाल लावावयाचा! कुणाला पसंत पडेल हें?

मनांतील श्रद्धा नाहींशी झाली कीं असले हे व्यवहारी विचार माणसाला पछाडतात. आणि मग त्याला स्वतःच्या शक्तीबद्दल फाजील गर्व चढतो. माझा भाग्योदय मीं केला! मीं घर बांधलें! मीं मंदिर उभारलें! अशा तऱ्हेनें मीपणा वाढीस लागला कीं मग अंतिम सुखाचा मार्ग जवळ असूनहि दिसत नाहीं. निवतकरांचें कांहींसें असेंच झालें. मठाला देण्यासारखे पांच-पंचवीस मुलगे होते. त्यांपैकीं एकाला गिरीदीक्षा देऊन गोसावी करावयाचा. अनेकांच्या इहपर कल्याणासाठीं, लोकशिक्षणासाठीं हा त्याग करणें आवश्यक होतें. आणि त्याबद्दल ४०० वर्षें निवतकरांना कधीं शंका आली नाहीं. परंतु या वेळेला तर्ककुतर्क सुरू झाले. कशासाठीं, कोणासाठीं, कशावरून, असे प्रश्न भेडसावूं लागले. त्याशिवाय गिरीपंथामध्यें मौंजीबंधनादि विधि होत नसल्यामुळें गिरी हे शूद्र होत अशी भावना वाढीस लागली होती. अशा स्थितींत ब्राह्मणकुलांत जन्म पावलेल्या मुलास स्वतःच्या हातानं शूद्रावस्थेंत लोटण्यास कोण तयार होईल! आणि कशासाठीं म्हणून हें असलें अधर्माचरण!

धर्माधर्माच्या काथ्याकुटांत कर्तव्यकर्माचा विसर पडला. श्रद्धा नाहींशी झाली.

धर्माचरण बाजूला राहिलें. मीपणा वाढला. त्यांतच निसर्गालाहि वेडाची लहर आली. पाऊस वेळीं पडेना. उभीं पिकें खार पडून जळूं लागलीं. उत्पात झाले. अर्थात् ४०० वर्षांत अशांतलें कांहीं घडलें नव्हतें असें नव्हे. परंतु त्या काळांत निसर्गाच्या उत्पातांची झळ निवतकरांना लागली नव्हती. मठाच्या कृपाछत्राखालीं निवतकर सुखरूप होते. आतां स्थिति वेगळी झाली. आपणहून, अहंकारानें बेफाम होऊन, ते त्या कृपाछत्रांतून मोकाट बाहेर पडले. मीपणें बाहेर पडले आणि निसर्गाच्या तांडवांत सांपडून रगडून निघाले. निसर्गहि मानवाला केव्हां केव्हां असे दणके देतो कीं त्याला त्रिभुवन आठवतें. निवतकरांनीं प्रयत्न पुष्कळ केले. परंतु बरकत कशी ती येईना. धान्य पिकेना. झाड धरेना. गाईम्हैशींना वीत होईना. जनावरांना नरड झाला. वानर घरांत शिरला. (अतिशय अशुभ चिन्ह.) अन्नान्नदशा झाली. मुलेंमाणसें मोड्यानें पडलीं. घरांचीं घरटाणें झालीं. निवतकरांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण बरकत कशी ती येईना. खानोलीचा भाग्यसूर्य मावळतीला लागला! ऱ्हासास सुरुवात झाली. आणि एकदां अशी सुरुवात झाली पुरे, मग तिचा वेग कोण थांबवूं शकेल? भगवान् श्रीकृष्णाच्या देखत यादवांच्या सत्यानाशास नाहीं का सुरुवात झाली? परंतु कालौघाला कोण बांध घालील?

भगवानगिरींच्या डोळ्यांदेखत निवतकरांचा अधःपात सुरू झाला. पण ते तरी काय करणार? निवतकरांना वांचवण्याचा जो रामबाण उपाय तोच त्यांना रुचेना. निवतकर मोठे चळवळे खरे. परंतु त्यांच्या चळवळीला यश येईना. समर्थ म्हणतात, 'सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें, परंतु तेथें भगवंताचें, अधिष्ठान पाहिजे.' मग करावें त्यांत अपयश आल्यामुळें, करावें त्यांत तडाखा बसल्यामुळें, मन भडकलें, भांबावून गेलें आणि शेवटीं भ्रष्ट झालें. नीतीनें कष्ट करून पोट भरेना म्हणून अनीति वाढली. चोरीमारीचें कांहीं वाटेनासें झालें. एकदां मनाचा नीतिबंध तुटला कीं माणसांत माणुसकी ती कशी राहणार? एकदां घसरटीला लागलें कीं हें असें होतें. आणि इतकें करूनहि पोटाची विवंचना दूर होईना. अठरा विश्वे दारिद्र्य अगदीं हात धुऊन पाठीस लागलें. आपत्ति यायला लागली कीं अशी ही चारीहि बाजूंनीं येते. खातेपिते निवतकर! खानोलीचे वतनदार मानकरी! फौजदारकी त्यांच्या घराण्याकडे. गिरीमठाचा अधिकारी स्वामी त्यांच्याच घराण्यापैकीं. गांवांत त्यांचा दबदबा फार. सरकार-

दरबारीं त्यांच्या शब्दास मान होता. जाणतेपणाचा मान त्यांना मिळत होता.

पण जाणत्यांनींच जाणतेपणा टाकला. दैववशात् त्यांच्याकडून गेला म्हणा पाहिजे तर. परंतु चंदनांतून सुगंध गेला तर मग बाकी काय राहिलें ? अगदीं तसेंच झालें. 'काप गेले आनि भोंकां रवलीं' ('कर्णालंकार नाहींसे झाले आणि त्यांच्यासाटीं पाडलेलीं भोंकें मात्र राहिलीं.') निवतकराचें हें अगदीं असें झालें. सगळीकडे निराशेचा अंधार. जीवनांतील जिवंतपणा हरपला. आणि हें सर्व भगवानगिरींसारख्या अधिकारी पुरुषाच्या देखत घडत होतें. स्वजनांचा क्षय पाहून त्या धीर पुरुषाचेंहि मन व्यग्र झालें. अशा बिकट प्रसंगीं त्यांना गुरूंची आठवण झाली. श्रीचिदानंदांचे वंशज बागलकर हे निवतीच्या गिरींना व सगळ्या खानोलकरांना गुरुस्थानीं होते. भगवानगिरींच्या वृद्धापकाळीं श्रीचिदानंदांचे पणतु सखाराम विष्णु तथा सकोबा नाना बागलकर बागलांची राई मठाचे अधिकारी होते. ते गृहस्थाश्रमी होते खरे. परंतु वृद्धपणीं त्यांनीं[1] संन्यास घेतला. श्रीचिदानंदांच्या मठाबाहेरील बाजूस सकोबानानांची समाधि आहे. भगवानगिरींनीं सकोबांना बोलावून आणून सर्व स्थिति निवेदन केली व त्यावर उपाय विचारला. नाना म्हणाले, "म्हापुर्सा, निवतकरांचां कपाळचां फुटलां आसात तर तेकां कोण काय करीत ? पण माका वाटता, सरतो इलाज म्हणान सगळ्यांक् बोलौन परत विचारूचां. न जाणा समाधिपुरुष मठाक झिल घालुची अजुनय कोणाकतरी बुद्धि देयत्."

भगवानगिरींना सुद्धां आशा वाटली कीं काय कोण जाणे, पण त्यांनीं सकोबांच्या म्हणण्याप्रमाणें सर्व निवतकरांना एकत्र बोलावून त्यांना मठाला गिरी देण्यांत सर्वांचें कसें कल्याण आहे तें समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरीच्या काळांत निवतकरांचा वंशक्षय झाला होता. तरीही मठाला देण्यालायक मुलगे नव्हते असें नाहीं. परंतु प्रत्येक व्यवहारी बापाला हा निव्वळ वेडेपणा वाटूं लागला. सगळेजण गांजलेले. सुबुद्धि कशी सुचणार ? कोणीही मुलगा देण्यास तयार होईना. गोरखे अने प्रभु असेच गांजलेल्या निवतकरांपैकीं एक होते. फारच गांजलेले होते. मोठे जमीनदार असूनहि घरांत अठराविश्वे दारिद्य. व्यवहाराच्या बाबतींत तुकारामाचा अवतार. एक प्रकारच्या तंद्रींतच असत.

१. सकोबानानांचें संप्रदायी नांव 'गोविंदानंदस्वामी' होतें.

पत्नीला मधूनमधून उन्मादाच्या लहरी येत. मुलें पुष्कळ झालीं. थोडीं अल्पायुषीही झालीं. वरील प्रसंगाचे वेळीं त्यांना अनंत, गोविंद व विनायक असे तीन प्रौढ मुलगे होते. परंतु त्यांचा मठाला देण्यासाठीं उपयोग नव्हता. गोरखेंना वाटूं लागलें, आपल्याला जर आज लहान मुलगा असता तर आपण तो खास भगवानगिरींच्या हवालीं केला असता. मठाचे पहिले सहा गिरी हे गोरखेंच्याच वकलांतील होते. फक्त सातवे भगवानगिरी सातव्या वकलांतील होते. गिरीपरंपरा चालवण्याची जबाबदारी स्वतःवरच आहे असें गोरखेंना तीव्रतेनें वाटूं लागलें. आणि अशा विचारांच्या तंद्रींतच आपलें वय किती, स्थिति काय वगैरे गोष्टी विसरून त्यांनीं धांवत जाऊन भगवानगिरींचे चरण धरले व एक प्रकारच्या आवेशानें बोलले, ' आतां जर मला मुलगा झाला तर मी त्याला मठालाच अर्पण करीन. '

गोरखेंची प्रतिज्ञा ऐकून बरीच मंडळी कुचेष्टेनें हंसली. परंतु भगवानगिरींच्या नेत्रांत आनंदाश्रू चमकले. समाधिपुरुषाला त्यांनीं मनोमन धन्यवाद दिले. गोरखेंच्या पोटीं निवतकरांचा उद्धारकर्ता खास जन्म घेणार! कारण सर्व गोष्टींचा अगदीं अतिरेक झाला होता. अंधार अगदीं शिगेला पोंचला होता. परंतु थॉमस हार्डी म्हणतो त्याप्रमाणें 'The darkest cloud has a silver lining.' निराशेचा काळोख कितीही घनदाट असला तरी कुठेंतरी आशेची जरीकाडी असतेच असते. तसें नसेल तर राहूकेतूंनीं जगाचा घांस केव्हांच गिळला असता. गोरखेप्रभूंचें वय ६० च्या वर. पत्नी अन्नपूर्णाबाई वर्ष दोन वर्षांनीं लहान. खरेंच काय इतक्या म्हातारपणीं ह्यांना मुलगा होईल? असे तर्कही सुरू झाले. लोकांना एक चेष्टेचा विषय झाला. परंतु स्थिरचराला व्यापून राहिलेल्या चित्‌शक्तीबद्दल आम्ही काय तर्क करणार? श्रीगुरूंनीं गाणगापुरीं साठी उलटून गेलेल्या वांझ बाईला पुत्रनिधान दिलें. कधींही वीत न झालेल्या म्हैशीचें दूध काढलें. जन्मांधाला दृष्टि दिली. मुक्याला वाचा फोडली. मग प्रभूची इच्छाच असेल तर गोरखेंना कां नाहीं मुलगा होणार? शिवाय भगवंताची तशी प्रतिज्ञा आहे. सज्जनांच्या संरक्षणासाठीं आणि दुष्टांच्या संहारासाठीं त्या नारायणाला काय काय सोंगें आणावीं लागलीं? धर्माला ग्लानि आली आणि अधर्माचा उदोउदो होऊं लागला कीं प्रभूला जन्म घ्यावा लागतो. मग तो कुठें कसा प्रगट होईल तें आम्ही पामरांनीं काय सांगावें?

भगवानगिरींना खात्री वाटली कीं गोरखेंना मुलगा होईलच होईल. आणि जो होईल तो प्रभूचा अवतारच होईल. कारण धर्मग्लानीची पराकाष्ठा झाली होती. श्रद्धा लोपली होती. देवाला, तूं देव कसा तें सिद्ध कर असें सांगण्याइतपत माणसाची बुद्धि भडकली होती. जें आमच्या डोळ्यांना दिसत नाहीं तें असेलच कसें, असा युक्तिवाद बोकाळला होता. आणि लोक तावातावानें वाद करीतच होते. इतक्यांत बातमी आली कीं, सौ. अन्नपूर्णाबाईना डोहाळे लागले. शके १७७१ च्या श्रावण महिन्यांत अन्नपूर्णाबाईना डोहाळे सुरू झाले. जगावेगळे डोहाळे सुरू झाले. तोंडानें सारखा दत्तनामाचा घोष. क्षेत्रावर जाऊन दत्तमहाराजांची सेवा करण्याचा बाईना ध्यास लागला. स्वतः गोरखे अप्पा सुद्धां एक प्रकारच्या तंद्रींतच असत, त्यांनाहि क्षेत्रावर जावेंसें वाटूं लागलें. मुलगे अनंत, गोविंद व विनायक आतां जाणते व कर्तेसवरते झाले होते. त्यांच्यावर प्रपंचाचा भार टाकून तीं दोघेंहि नवराबायको कृष्णाकांठीं श्रीक्षेत्र नरसोबाचे वाडीस प्राप्त झालीं. तेथील कै. श्री. बाबाजी नारायण पुजारे (बडवे) (सध्यांचे शंकर विष्णु पुजारे यांचे आजोबा) यांनीं त्या वृद्धांना स्वतःच्या माडीवर मोठ्या प्रेमानें ठेवून घेतलें. पतीपत्नींची दत्तसेवा चालू राहिली. नामस्मरण आणि भजन हीच सेवा. तिच्यांत भाव असला कीं देवाला पावते. श्रद्धेच्या पायावांचून उभारलेला भक्तीचा डोराला व्यर्थ जातो. गोरखेदंपतीची भक्ति प्रभूला पावली. माईच्या पोटीं प्रभूचा अंश वाढूं लागला. कृष्णातटाकीं वाढूं लागला. पूर्ण दिवसांनीं शके १७७२ (इ. स. १८५०) चैत्र शु. द्वादशीला माध्यान्ह उलटतांच सौ. अन्नपूर्णाबाईना मुलगा झाला. म्हातारीला मुलगा झाला. त्रास मुळींच झाला नाहीं. बाबाजी पुजाऱ्यांना मोठा चमत्कार वाटला. कसें शक्य झालें हें? आणि कसें तें आम्ही तरी काय सांगणार? स्वतःच्या माडीवर हा चमत्कार झाल्यामुळें बाबाजींना धन्य वाटलें.

गोरखे अप्पांना वृद्धपणीं श्रीगुरूंच्या कृपेनें मुलगा झाला. मुलाचा जन्म झाला तो सुद्धां श्री क्षेत्र नरसिंहवाडी येथें. पिवळ्याधमक नागासारखी अंगकांति. सुकुमार पण तेजस्वी मुखमंडल. अप्पांनीं त्याचें नांव दत्तात्रेय ठेवलें. माई-अप्पा दत्तूला घेऊन निवतीला घरीं आलीं. दत्तूनें दूध सांडतांच अप्पांनीं त्याला श्री भगवानगिरींच्या पदरांत घातलें. अशा तऱ्हेनें मठाचा भावी गिरी मठांतच वाढूं लागला. हसूंखेळूं लागला. भगवानगिरींनीं दत्तूचें लालनपालन केलें.

कोडकौतुक केलें. दत्तूला चांगलें शिक्षण मिळावें म्हणून त्याकाळचे नांवाजलेले[१] पंतोजी लाडकोबा वालावलकर यांना आणून मठांत नेमलें. मठाच्या भावी गिरीचें शिक्षण म्हणून लाडकोबांनींही विशेष मेहनत घेतली. दत्तूचा जन्मवृत्तांत त्यांनीं ऐकला होता. दत्तमहाराजांचा अंशावतार दत्तू प्रत्येक विषयांत गुरुजीवर ताण करील यांत काय संशय! म्हणून लाडकोबांनीं विशेष मेहनत घेतली. पण कुठें काय चुकलें कुणास ठाऊक. दत्तूची अभ्यासांत व्हावी तशी प्रगति होईना. विशेष प्रगति होईना. सर्वसाधारण मुलासारखाच किंबहुना शिक्षणाच्या बाबतींत दत्तू इतर समवयस्क मुलांपेक्षां थोडा मंदच वाटूं लागला. श्री भगवानगिरीही विचारांत पडले. त्यांना चिंता वाटूं लागली. आत्तांपर्यंत सर्व गोष्टी अपेक्षेप्रमाणें घडल्या, किंबहुना अपेक्षेबाहेर चांगल्या घडल्या. मग आतांच कुठें घोडें पेंड खाऊं लागलें? श्रीदत्त महाराजांचा अवतार असलेला दत्तू असा अगदींच मंद कसा निघाला? भगवानगिरींनीं लाडकोबांना निरोप दिला. ते वालावलीस परत गेले.

भगवानगिरींचा समाधिकाल आतां अगदीं थोड्या दिवसांवर येऊन ठेपला. दत्तू जवळजवळ ९ वर्षांचा होता. परंतु त्याला स्वत्वाची जाणीवच दिसेना. त्याला गिरीदीक्षा देण्यास भगवानगिरींचें मन होईना. त्यांनीं नाना बागलकरांना पुन्हां बोलावून आणलें व म्हणाले, "माझ्याकडून दत्तूला गिरीदीक्षा मिळावी अशी समाधिपुरुषाची इच्छा दिसत नाहीं. पुढेंमागें तो या अधिकारास योग्य झाला तर तुम्ही त्याला गिरीदीक्षा द्यावी." बागलकरांनीं मान्यता दिली. इतकी व्यवस्था केल्यावर श्रीभगवानगिरींनीं इ. स. १८५८ मध्यें समाधि घेतली. अशा तऱ्हेनें अनेक घडामोडींनीं युक्त अशी या कर्तबगार सातव्या भगवानगिरींची कारकीर्द पूर्ण झाली. भगवानगिरींच्या अवसानानंतर ४–५ वर्षांनीं नाना बागलकरांनीं दत्तूला गिरीदीक्षा दिली व दत्तो गोरखे प्रभु खानोलकर गांवकर निवतीमठाचे आठवे अधिकारी श्रीदत्तगिरी गोसावी झाले. परंतु अधिकार मिळाला म्हणून योग्यता येते असें थोडेंच आहे! चौदा-पंधरा वर्षांचें वय. भर तारुण्याचा काळ. दत्तगिरींची वाढ चांगली झाली होती. मध्यम उंचीचे होते. तरतरीत नाक, पाणीदार डोळे, केशकलाप राखलेला, ध्यान मोठें सुंदर दिसे. दत्तात्रेयाचा

१. धोंडू यशवंत गोसावी बागलकर, बागलांची राई. ता. २९–१२–३२

अवतार अशी लोकांमध्यें भावना. असें असून स्वत्वाला विसरले कसे ?

दत्तगिरी आणि इतर समवयस्क तरुण यांच्या वागणुकींत फरक तर नसेच. कित्येक वेळां दत्तगिरींची वागणूक फारच दोषास्पद होत असे. इतर तरुणांवर ताण करीत असत. धर्मग्लानि नाहींशी करण्यासाठीं ज्यांचा अवतार ते दत्तगिरी अशा तऱ्हेनें स्वतःच अंधारांत धडपडूं लागले. मग इतरेजनांना काय प्रकाश दाखविणार? वय वर्षें १८ पर्यंत दत्तगिरींचे हे असे थेर चालले. मग एके दिवशीं एक प्रसंग घडला आणि दत्तगिरींची धुंदी खर्रकन् उतरली. स्वत्वाची जाणीव झाली. पश्चात्तापाच्या झटक्यानें राख उडून गेली आणि आंत दडलेला खदिरांगार अमाप तेजानें तळपूं लागला. दत्तगिरी भानावर आले.

पुष्प तिसरें

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोधिकः ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥

दत्तगिरींची योगसाधना

श्रीहरिच्चरणगिरींनीं निवतींत मठ स्थापन केल्यापासून मठाच्या आवारांत झाडलोट करणें, तेलवात लावणें, मठाधिकाऱ्याला दैनंदिन कामांत मदत करणें वगैरे सेवेसाठीं दासी घालण्याची पद्धत होती. या मठदासींपासून झालेल्या संततीस मठकर म्हणत. मठकरांतील पुरुष मठाच्या ठिकाणांची व्यवस्था पहात. मठाची सेवाचाकरी करीत. संस्थानच्या उत्पन्नांतून त्यांना रोजगार मिळे. मठाच्याच आश्रयानें असत. दत्तगिरींचें वास्तव्य अगदीं लहानपणापासून मठांतच झालें. म्हणजे वस्तुतः तें मठकर मंडळींत झालें. मठकरांपैकीं समवयस्क अगर किंचित् वयानें मोठे मुलगे दत्तगिरींचे जिवलग सवंगडी, खेळगडी बनले. ते सवंगडी परंपरागत चालत आलेले त्यांना साजेसे खेळ खेळत. उत्सवाच्या दिवसांत जागरण करीत. जत्रेला जात. शिमग्याचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा होत असे. सोऱ्या (काजूची दारू) शिवाय शिमग्याच्या उत्सवाला रंग भरत नसे. दत्तगिरी सवंगड्यांबरोबर या धांगडधिंग्यामध्यें सामील होत असत. मठाचा अधिकारी गिरी आपल्यांत मिसळतो म्हणून दोस्तांना कोण आनंद होत असे! दत्तगिरींचा अवतार कोणत्या कार्यासाठीं होता त्याची खुद्द दत्तगिरींनाच जेथें जाणीव नव्हती ती इतर अश्राप जीवांना कोठून असणार?

दत्तगिरी १८ वर्षांचे झाले होते. शिमग्याचे दिवस असल्यामुळें तरुण मंडळी रोंबटें (मेळे) काढण्यांत दंग होती. तालमी सुरू झाल्या. नाचायचे दिवस आले. सोऱ्यावांचून शिमगा यथास्थित साजरा होत नसे. निवतीमठापासून अर्ध्यापाऊण मैलावर आवेरे (सध्यां या ठिकाणीं अनंत महादेव मठकर या गृहस्थाचें चहाचें दुकान आहे) येथें सोरा चांगला, स्वस्त व भरपूर मिळे. मठकरांपैकीं एकानें दत्तगिरींना खांद्यावर घेतलें आणि ते सर्वजण नाचत मिरवत वरील ठिकाणीं आले. इतरहि अनेक ग्राहक जमले होते. त्यांतच निवतीमठाचे गिरी सामील झाल्यामुळें समारंभाला अपूर्व रंग चढला. लोक आनंदानें आणि नशेनें बेहोष झाले. मग त्या ठिकाणीं आणखी काय काय प्रकार झाले हरि जाणे. परंतु ह्या सोहळ्याची बातमी हां हां म्हणतां पसरली. दत्तगिरींचा संबंध आल्यामुळें लोक जास्तच तिखटमीठ लावून वरील प्रकाराची चर्चा करूं लागले. भगवानगिरींच्या कारकीर्दीपासून मठाधिकाऱ्यांबद्दल निवतकरांच्या मनांत किंतु होताच. त्यांत दत्तगिरींची अशी वागणूक! मग काय? कुचेष्टेला अगदीं चेव चढला. सकोबा-नानांच्या कानावर ही गोष्ट जाण्यास वेळ लागला नाहीं. सरळमार्गी, एकमार्गी गृहस्थ ते. दत्तगिरींना त्यांनींच दीक्षा दिली होती. आणि दीक्षा मिळाल्यावर तरी दत्तगिरींचे ढंग कमी होऊन वळणार येतील असें वाटलें होतें. आणि आतां तर अगदीं डोक्यावरून पाणीच गेलें. हरिचरणगिरींच्या मठाचा अधिकारी गोसावी अन् गांवगुंडांना चर्चेचा, चेष्टेचा विषय होऊन बसला! नानांचा संताप अगदीं अनावर झाला. ते फारच करवादले. आतां ह्या दत्त्याला करावें तरी काय, असें वाटूं लागलें. भर दोनप्रहरीं तसेच उठले आणि निवतीला मठास आले. दत्तगिरी दृष्टीस पडतांच दुरूनच ओरडून म्हणाले, "रे दत्त्या, काय केलंस ह्यां...अरे तू हरिचरणगिरींच्या मठाचो अधिकारी!! अगदींच कसां रे विसारलंस! झिला, गोसावी आमी. आमका सोबणां नाय ह्यां!"

म्हाताऱ्या सकोबानानांचे शब्द दत्तगिरींच्या काळजाला चिरीत गेले. आणि असे झोंबले, असे झोंबले कीं त्यांच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. घामाच्या रूपानें उन्माद वितळून गेला. अगदीं अशक्त, गळल्यासारखें वाटूं लागलें. धुंदी मावळली. दृष्टि स्वच्छ झाली. स्वतःची ओळख पटूं लागली. मग जसजशी स्वस्थितीची जाणीव होऊं लागली तसतशी स्वतःची स्वतःलाच लाज वाटूं लागली. १८ वर्षेपर्यंत जी आठवण बुजली होती ती आज शब्दांचा अंकुश लागतांच

जाग्रत झाली. स्वाभिमानाचा ज्वालामुखी जागा झाला. दत्तमहाराजांचा अवतार म्हणून दत्तगिरींबद्दल किती आशा—अपेक्षा होत्या ! पण आजवर त्या बाबतींत सर्वांची निराशाच झाली होती. प्राप्त घडी आल्यावांचून कुठलीही गोष्ट घडत नाहीं हेंच खरें. सर्व गोष्टी प्रभूच्या इच्छेप्रमाणें ठरलेल्या वेळीं घडतात. निमित्त कांहीं तरी होतें. सकोबानानांचे शब्द हे केवळ मात्र निमित्त झाले. 'कावळो बसाक् आणि ढांक मोडाक्' (कावळा बसायला आणि डहाळी मोडायला) गांठ पडली. दत्तगिरी भानावर आले. अंतर्मुख झाले. आणि स्वतःच्या स्थितीकडे चिकित्सक बुद्धीनें पाहूं लागले. आणि जों जों पाहूं लागले तों तों स्वतःच्या आचारहीन, विचारहीन, ज्ञानहीन, गतिहीन जिण्याची त्यांना शरम वाटूं लागली. सकोबांचे शब्द दत्तगिरींना पुन्हां पुन्हां डिवचूं लागले. श्री हरिचरणगिरींच्या मठाचे अधिकारी स्वामी म्हणवून घेण्याची आपली पात्रता नाहीं अशी त्यांची मनोमन खात्री पटली. अशा ह्या बेकार जिण्याचा त्यांना अगदीं उबग आला. अगदीं वैताग आला. आणि एक प्रकारच्या तिरमिरीनें त्यांनीं एक निश्चय केला.

दत्तगिरी मठाच्या गाभाऱ्यांत गेले. कवाड आंतून बंद केलें आणि श्रीहरिचरणगिरींच्या समाधीपाशीं बसले. निश्चय करून बसले कीं, समाधिपुरुष स्वतः मार्ग दाखवीपर्यंत उठायचें नाहीं. अन्नपाणी नाहीं, निसर्गविधि नाहीं, कोणाचा संपर्क नाहीं. सामान्य माणसाला कसें शक्य होईल? दत्तगिरी सामान्य कोटींतील पुरुष नव्हते हें कळायला एवढी एकच गोष्ट पुरेशी होती. त्यांच्यांत अलौकिकत्व होतें. त्यांचा जन्मच मुळीं असाधारण परिस्थितींत झाला. मध्यंतरीच्या काळांत त्यांच्या अंगच्या गुणांवर काजळी धरली होती. राख जमली होती. ती पश्चात्तापाच्या झटक्यानें उडून गेली. तिच्या मागें दडलेला अंगार तळपूं लागला. परंतु जर अंगारच नसेल तर राख झाडली तरी तळपणार काय? अंगांतच नसलें तर कोपरीं कसें फाटणार? दत्तगिरींच्या अंगांत होतें. पूर्वकर्मानुसार थोडा काळ त्यावर विस्मृतीचें पटल चढलें होतें, इतकेंच. कांहीं कां निमित्तानें होईना, तें पटल दूर होतांच गुणांच्या विकासाला वाट मोकळी झाली आणि आतां त्याला निश्चयाचें बळ मिळालें. निश्चयाचें सामर्थ्यच अचाट असतें. त्यांतून दत्तगिरी तर अवतारी पुरुष, मग त्यांना अशक्य असें काय असणार?

सात दिवसपर्यंत दत्तगिरींचें हरिचरणगिरींच्या समाधीपाशीं अतिशय कठोर

आणि कठीण तपाचरण चालूं राहिलें. सातव्या रात्रीं समाधिपुरुषानें दृष्टांत दिला आणि दत्तगिरींना 'तूं अक्कलकोटास जा—तेथील स्वामीमहाराज तुला निश्चित मार्ग दाखवितील' असें सांगितलें. दत्तगिरींना फार संतोष वाटला. समाधिपुरुषास त्यांनीं शतशः धन्यवाद दिले. आणि दुसऱ्याच दिवशीं मोठ्या पहांटेस उठून त्यांनीं निसर्गविधी आटोपले आणि कोणालाहि नकळत पायीं अक्कलकोटची वाट धरली. इच्छित ठिकाणीं पोहोंचण्यापूर्वी दत्तगिरी पंढरपुरास गेले. इ. स. १८६९–७० चा सुमार होता. दत्तगिरी जवळजवळ १९ वर्षांचे होते. पंढरपुरीं दत्तगिरींचा व श्रीधरबुवा कान्हेरे तथा सुप्रसिद्ध मौनीबुवा यांचा परिचय झाला. असें सांगतात कीं १८५७ मध्यें कान्हेरे एक तरुण क्रांतिकारक देशभक्त होते. त्यांच्या देशकार्यांत त्यांना अपयश आलें. आपल्याकडून बातमी फुटून स्वतःपेक्षां दुसऱ्यांना दगा होऊं नये यासाठीं कान्हेरेंनीं मौन पाळलें. ते सतत १२ वर्षे बोललेच नाहींत. नकळत पोटांत गेलेल्या विषाचा परिणाम होतो हें सगळ्यांना माहीत आहे. मग नकळत सेवन केलेल्या दिव्यौषधींचाही परिणाम झाल्यावांचून कसा राहील ? कान्हेरेंचें तसेंच झालें. त्यांनीं मौन धरलें तें कांहीं सिद्धि प्राप्त होण्यासाठीं नव्हे. परंतु त्या कठोर आणि कडकडीत व्रतपालनाचा सुपरिणाम झालाच. कान्हेरेंचा कायापालट झाला. शरिरावर दिव्य तेज झळकूं लागलें. त्यांना वाक्सिद्धि प्राप्त झाली. लोक त्यांना मौनीबुवा असें संबोधूं लागले. मौनीबुवा एक परमयोगी पुरुष होऊन गेले. त्यांची श्रीक्षेत्र पंढरपुरीं समाधि आहे.

दत्तगिरींनीं स्वस्थिति मौनीबुवांना इत्थंभूत निवेदन केली आणि ते अनन्य भावानें मौनीबुवांना शरण गेले. दत्तगिरींनीं गिरीपंथाचा स्वीकार केल्यामुळें ब्राह्मणकुलांत जन्म होऊनहि त्यांचे मौंजीबंधनादि संस्कार झाले नव्हते. मौनीबुवांना दत्तगिरींची कींव आली. परंतु 'ब्राह्मणकुलांत जन्म होऊन ज्याचे मौंजीबंधनादि संस्कार झाले नसतील तो शूद्रवत् अमंगल जाणावा' अशी स्वतःची समजूत असल्याचें मौनीबुवा म्हणाले. त्यावर दत्तगिरी फारच खिन्न होऊन, प्राप्त परिस्थितींत उद्धाराचा मार्ग कोणता तो कृपया बुवांनीं सांगावा म्हणून तळमळीनें विनंती केली. तेव्हां मौनीबुवांनीं भगवंताच्या नामस्मरणानें सर्व कांहीं होऊं शकतें असें सांगून दत्तगिरींचें उपास्यदैवत दत्त असल्यामुळें 'दत्तगुरू जय दत्त' हा अष्टाक्षरी मंत्र सदा जपावा असें सांगितलें. बाह्यसंस्कार न झाल्यामुळें आलेली खिन्नता घालविण्यासाठीं मौनीबुवांनीं दत्तगिरींना एक विशेष संस्कारहि

सांगितला. आणि पुढें 'अक्कलकोटच्या स्वामी महाराजांना शरण जा. तेच तुझें पूर्ण कल्याण करतील,' असें सांगून आनंदानें निरोप दिला.

मौनीबुवांचा निरोप घेऊन दत्तगिरी निघाले. ते श्रीक्षेत्र नरसिंहवाडीस गेले. तेथें त्यांनीं मौनीबुवांनीं सांगितलेला संस्कार केला आणि नामसंकीर्तन सुरू ठेवलें. हळूं हळूं मनाला शांत वाटूं लागलें. मार्ग दिसूं लागला. त्यांनीं अक्कलकोटची वाट धरली. दत्तगिरी अक्कलकोटास पोहोंचले त्यावेळीं तेथील स्वामीमहाराज शिष्यांच्या मेळाव्यांत इष्ट गोष्टींची चर्चा करण्यांत मग्न होते. इतक्यांत झटक्यासरशीं उठून बाहेर गेले, तों दारांत दत्तगिरी उभे. स्वामींना पाहतांच दत्तगिरींनीं लोटांगण घातलें. स्वामींनीं दत्तगिरींना उठवून त्यांच्या मस्तकावर हात ठेविला. मौनीबुवांबरोबर झालेल्या सुखसंवादाची सर्व हकीकत दत्तगिरींनीं निवेदन केली. अर्थात् अक्कलकोट स्वामींनीं सर्व गोष्टी अंतर्ज्ञानानें तेव्हांच जाणल्या होत्या. तथापि दत्तगिरींचें निवेदन त्यांनीं लक्षपूर्वक ऐकून घेतलें व शेवटीं मौनीबुवांनीं सांगितलेला मार्ग योग्य असाच असल्याबद्दल ग्वाही दिली. कितीही अघोर पापी असो, तो पश्चात्तापानें दग्ध होऊन अनन्य भावानें प्रभूला शरण जाऊन नामसंकीर्तन करील तर त्याला निश्चित मुक्ति मिळेल अशी भगवंतांनींच अर्जुनाला ग्वाही दिलेली आहे.

अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक्...
साधुरेव स मन्तव्यः सम्यक् व्यवसितो हि सः ।
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥

दत्तगिरी अशा तऱ्हेनें 'दत्त' नामाचा अखंड जप करीत अक्कलकोट स्वामींचे सेवेंत राहिले. पूर्ण ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय तेथून हलायचें नाहीं असा निश्चय करून राहिले. स्वामींनींहि त्यांना मोठ्या आनंदानें ठेवून घेतलें व वेळोवेळीं मार्गदर्शन केलें. कुठलेंहि सामर्थ्य अंगांत येण्यास तपश्चर्या लागते. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे.' दत्तगिरींनीं बारा वर्षें लोखंडाचे चणे खाल्ले. अध्ययनांत चुका झाल्यामुळें वेळोवेळीं गुरुजींच्या हातचा भरपूर मार खाल्ला. एकदां तर रागाच्या भरांत गुरुजींनीं खडावा उचलून मारल्यामुळें दत्तगिरींच्या छातीवर मोठी जखम झाली. अशा प्रकारें जवळजवळ बारा वर्षें

दत्तगिरींनीं अक्कलकोट स्वामींच्या चरणापाशीं राहून खडतर तपाचरण केलें. तेव्हां त्यांची मनकामना पुरी झाली. अज्ञानामुळें अंतःकरणांत घर करून राहिलेलीं जळमटें पार जळून गेलीं. त्यांच्या जागीं दत्तनामाचा नंदादीप सुरू झाला. परमेश्वरप्राप्तीचा मार्ग खुला झाला. १२ वर्षांच्या काळांत अक्कलकोट स्वामींच्या मार्गदर्शनाखालीं दत्तगिरी अंतर्बाह्य घुसळून निघाले. तावूनसुलाखून निघाल्यामुळें अगदीं वेगळेच दिसू लागले. जणूं अगदीं दत्तमहाराजांचाच अवतार. स्वामी महाराजांनीं दत्तगिरींना पूर्ण अनुग्रह दिला, दत्तगिरींचा योगाभ्यास पूर्ण होऊन ते एक महाज्ञानी आणि महायोगी बनले.

अशा तऱ्हेनें पूर्ण ज्ञानी आणि परमयोगी बनल्यावर अक्कलकोट स्वामीमहाराजांनीं दत्तगिरींना स्वस्थळीं जाण्यास परवानगी दिली. निरोप देतेवेळीं अक्कलकोट स्वामींनीं दत्तगिरींना रुद्राक्षांची एक माळ दिली. ती त्यांनीं भक्ति आणि कृतज्ञतापूर्वक गळ्यांत धारण केली. तसेंच, स्वामींनीं दत्तगिरींना श्रीपादांच्या लाकडी पादुका सुद्धां दिल्या. स्वामींचा प्रसाद व आशीर्वाद घेऊन दत्तगिरी निघाले. कांहीं काळ त्यांनीं तीर्थक्षेत्रें पाहण्यांत व साधुसमागमांत घालविला. निरनिराळ्या समाजांचें निरीक्षण केलें. १८८०–८२ चा काळ होता तो. दत्तगिरी ३०–३२ वर्षांचे होते. विद्यार्जन, ज्ञानार्जन व योगसाधन पूर्ण झालें होतें. मायभूमीस आतां परत जाण्यास हरकत नव्हती. समाजांतील विषमता त्याकाळीं अतिशय तीव्र होती. दत्तगिरींचें कर्माचरण अजून राहिलेंच होतें. त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा अंधारांत धडपडणाऱ्या त्यांच्या बांधवांना अजून मिळाला नव्हता. १२ वर्षांपूर्वीं त्यांनीं खानोली सोडली त्यावेळची परिस्थिति समाधानकारक नव्हती. लोक पाखंडी आणि वाचाळ बनले होते. गिरींबद्दल वाटणारी श्रद्धा लोपली होती. ढोंगबाजी वाढली होती. दत्तगिरी एकाएकीं नाहींसे झाल्याबद्दलहि कोणालाहि फारशी खंत वाटली नव्हती. उलट मठांतून एक ब्याद गेली म्हणून भाऊबंदांना एकप्रकारें बरें वाटलें. भगवानगिरींपासून मठाचें उत्पन्न वाढलें होतें. मठाधिकाऱ्याच्या गैरहजेरींत मठसंस्थानची वहिवाट निवतकरांकडेच असे. मठाचें उत्पन्न हा आपल्या वतनापैकींच एक भाग असें त्यांना वाटे. आणि या बाबतींत श्रीभगवानगिरींबरोबर त्यांचे खटकेहि उडाले होते.

पण कसेंही असले तरी दत्तगिरी निवतीच्या मठाचे अधिकारी होते. तिकडे परत जाणें प्राप्त होतें. दत्तगिरी आतां एक मोठे योगी आणि अधिकारी पुरुष

बनले होते. नाममाहात्म्य त्यांनीं अनुभवानें ओळखलें होतें. ज्या मार्गानें स्वतःचा उद्धार झाला तो मार्ग स्वजनांना सांगितला पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें. तीर्थाटन आटोपल्यावर दत्तगिरी मायदेशीं येण्यास निघाले. परंतु ते सरळ खानोलीस आलेच नाहींत. बेळगांव जिल्ह्यांतील चन्दगड (पिशाच्चवाडी) येथें गोविंद नारायण सामंत यांचे घरीं त्यांचा पहिला मुक्काम झाला. पिशाच्चवाडीस दत्तगिरी जवळजवळ १ वर्षपर्यंत राहिले. तेथें त्यांनीं एक आश्रम बांधून श्री अक्कलकोटस्वामींनीं दिलेल्या लाकडी पादुका स्थापिल्या. हेंच त्यांचें अतिशय प्रिय स्थान बनलें. परंतु आतां खानोलीला परत जाणें प्राप्त होतें. मनांत एक विचार असाही आला कीं निवतीस परत कशासाठीं जायचें? दत्तगिरींची ज्ञानार्जनाची व योगसाधनाची जिज्ञासा पूर्ण झाली होती. परमेश्वरापाशीं पोंचविणारा मार्ग त्यांना अवगत झाला होता. नाममाहात्म्य त्यांना पटलें होतें. मग आतां निवतीस परत कशासाठीं जायचें? आणि जायचें त्या ठिकाणीं कोण त्यांची वाट पहात होतें? दत्तगिरी एकाएकीं मठांतून नाहींसे झाले तरी लोकांचीं मनें हललीं नाहींत. उलट वारसांना आनंद झाला. गेली एकदांची ब्याद मठांतून! आतां घाला धुडगुस वाटेल तसा!

ज्या वारसांनीं श्रीभगवानगिरींना 'त्राहि भगवान्' करून सोडलें होतें त्यांना दत्तगिरी परत आल्यानें आनंद होणार नव्हता. भगवानगिरींच्या कारकीर्दींत मठाचें उत्पन्न बऱ्यापैकीं होतें. त्याचा उपभोग आपणांला मिळावा, म्हणून कांहीं उपद्व्यापी निवतकरांनीं भगवानगिरींना वेडा ठरवून सावंतवाडीस कोठडीची हवा दाखविली. भगवानगिरींची त्यांतून सुटका झाली ही गोष्ट खरी. परंतु त्या सत्वशील पुरुषाचा संबंधित निवतकरांवर कोप झाला. निवतकरांचे भ्रष्टाचार वाढत गेले. भगवानगिरींनंतर गादीवर आलेल्या दत्तगिरींमध्यें तर मुळींच दम नव्हता. आणि ते एकाएकीं मठांतून निघून गेल्यामुळें भाऊबंदांना रान मोकळें झालें होतें. ह्या सर्व गोष्टी दत्तगिरी पूर्ण जाणून होते. ज्या ठिकाणीं जावयाचें तेथील स्वजन कृतघ्न आणि भ्रष्ट आहेत ही गोष्ट स्पष्ट होती. मग सिद्धि प्राप्त झालेल्या, पूर्ण ज्ञान प्राप्त झालेल्या, मोक्षाचें द्वार स्पष्ट दिसत असलेल्या दत्तगिरींनीं निवतीस कशासाठीं जावें?

यावेळीं दत्तगिरींना गिरीमठाच्या संस्थापकाची—हरिचरणगिरींची—आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं. त्या महात्म्यानें पन्नाशी उलटून गेल्यावरही

स्वजनांच्या उद्धारासाठीं, मार्गदर्शनासाठीं, घराची वाट धरली होती. स्वजन अपराधी असतील, अनंत अपराधी असतील, पण खरा संत त्याचा राग मानीत नाहीं. संतश्रेष्ठ तुकोबा म्हणतात, "तुका म्हणे तोचि संत, सोशि जगाचे आघात." अज्ञजनांनीं केलेल्या अपराधांचा ज्याला राग येतो तो संत कसला? आणि मग अशाकडून मार्गदर्शन तें कसलें होणार? येशू ख्रिस्त हा एक उच्च-कोटींतील संत होता. स्वतःला वधस्तंभाकडे नेणाऱ्या मारेकऱ्यांना उद्देशून येशू म्हणतो, "देवा, त्यांना क्षमा कर! आपण काय करीत आहोंत हें त्यांना समजत नाहीं." दत्तगिरींना येशू माहीत होता किंवा काय हा प्रश्न नाहीं. येशूला माहीत असलेलें महान् तत्त्व त्यांना निश्चित माहीत होतें. संतजनांचें तें मर्म आहे. ज्या ठिकाणीं अंधार जास्त, दोषास्पद वागणूक जास्त, वितंडवाद जास्त, हाणामाऱ्या जास्त, त्याच ठिकाणीं संतांची गरजही जास्त. निवतकर नीतिभ्रष्ट, कर्मभ्रष्ट आहेत ना, मग संतानें तेथें लवकर धांव घेतली पाहिजे. ज्ञानसंपन्न, सिद्धिसंपन्न, परमयोगी दत्तगिरी वयाच्या ३२ व्या वर्षीं मायभूमीस परत जाण्यास निघाले. मातृभूमीच्या सेवेसाठीं परत निघाले!

पुष्प चवथें

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।

मायभूमीच्या मार्गावर

दत्तगिरींनीं मातृभूमीला परत जाऊन लोकसेवा करण्याचें ठरविलें. त्यांच्या डोळ्यासमोर श्रीहरिचरणगिरींचा थोर आदर्श होता. मातृभूमीच्या सेवेंतच जन्म घेतल्याचें सार्थक असतें--असें अनेक विचारवंत आजवर मानीत आले आहेत. थोर महात्म्यांनीं मातृभूमीच्या सेवेंतच जन्मसाफल्य मानून देह झिजविल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. माता आणि मातृभूमि यांच्या सेवेंत मिळणाऱ्या आनंदाची बरोबरीच होऊं शकत नाहीं असें म्हणतात. प्रभु रामचंद्रानें घनघोर युद्ध करून लंकेचा रावण ठार केला. त्याचें चौदा चौकड्यांचें राज्य रामाच्या पायाशीं लोटांगण घेत आलें. त्याचा स्वीकार करून सीतामाईसह लंका नगरींत यथेच्छ विलासोपभोग घेण्यास हरकत नव्हती. अयोध्येला परतण्याची गरजच काय? माता कैकेयीच्याच तर दुराग्रहामुळें प्रभूवर एवढी आपत्ति कोसळली. वल्कलें धारण करून वनवास भोगावा लागला. परमप्रिय पित्याचें प्रणोत्क्रमण झालें. मग अशा त्या अनर्थनगरी अयोध्येस परत जाण्यापेक्षां सुवर्णनगरी लंका काय वाईट? परंतु रामचंद्राला असले विचार शिवते, तर तो प्रभु रामचंद्र कसला ! आम्हां सामान्य लोकांना हे असले विचार पछाडतात. बापजाद्यांच्या कमाईवर उच्च शिक्षणासाठीं परदेशीं गेल्यावर तिकडच्याच गुलगुलीत वातावरणांत गुंग होऊन मुळाला आणि मातृभूमीला विसरणारे लोक असतात. रामचंद्र हा सामान्य

माणसांपैकीं नव्हता. म्हणूनच आज ५००० वर्षें होऊन गेलीं तरी राममाहात्म्य अबाधित आहे.

मातृभूस परत जावें किंवा नको असा संदेह दत्तगिरींच्या मनाला चाटून गेला असल्यास तो केवळ क्षणभरच असेल. कारण कालिदास म्हणतो त्याप्रमाणें 'सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः।' त्यांच्या मनोदेवतेनें त्यांना मातृभूमीस परत जाण्याचा आदेश दिला. निःसंदेह होऊन दत्तगिरी खानोलीच्या वाटेस लागले. अज्ञानाचा काळोख सर्वत्र मी म्हणत होता. दिवाभीतांच्या अपशकुनी घूत्कारांनीं त्याची भीषणता वाढत होती. मार्गांत खांचखळगे आणि विंचूकांटे होते. काळोखाचा फायदा घेऊन भाबड्या वाटसरांवर घाला घालण्यासाठीं समाजकंटक टपून बसले होते. पण दत्तगिरींना भिण्याचें कारणच काय ? त्यांना सर्व कांहीं अगदीं स्पष्ट दिसत होतें. त्यांच्यापाशीं ज्ञानदीप होता. त्याच्या प्रकाशांत मार्गांतील खांचखळगे व विंचूकांटे त्यांना स्पष्ट दिसत होते. म्हणूनच दत्तगिरी कुठेंहि धडपडले नाहींत. त्यांना ठेंच लागली नाहीं. अथवा त्यांच्यावर अकस्मात् घाला आला नाहीं.

मायभूमीला परतण्यापूर्वीं दत्तगिरींचा मुक्काम पिशाचवाडी, चंदगड येथें होता. पिशाचवाडी नांव ऐकतांच जरा चमकल्यासारखें होतें. कसें पडलें कोण जाणे हें नांव या गांवाला! परंतु दत्तगिरींना हीच जागा आवडली. तेथेंच त्यांनीं श्रीस्वामी समर्थ, अक्कलकोट, यांनीं दिलेल्या श्रीपादांच्या लाकडी पादुका स्थापन केल्या. लहानसें मंदिर बांधून पादुकांची पूजाअर्चा होईल अशी व्यवस्था केली आणि अशा तऱ्हेनें पिशाचवाडींतील 'पिशाच' नाहींसें करून त्याची 'श्रीपाद-वाडी' केली. तेंच नांव आजतागायत चालू आहे. दत्तगिरींनीं बांधलेल्या त्या लहानशा मंदिराचा अलीकडे जीर्णोद्धार झाला आहे. श्रीदत्तजयंतीस (मार्ग. शु. १५) मोठा उत्सव होतो. श्रीपादवाडीच्या पंचक्रोशींतील बरीच मंडळी या उत्सवानिमित्त एकत्र जमते. दत्तगिरींची देहयष्टि मूळचीच आकर्षक. त्यांत आतां तपश्चर्येचें दिव्य तेज देहावर झळकत होतें. कितीहि पाखंडी माणूस असला तरी त्यांच्या दर्शनानें सत्प्रवृत्त होत असे. श्रीपादवाडीस दत्तगिरींभोंवतीं मंडळी जमूं लागली. पुष्कळ लोक भजनीं लागले. समाजांत सर्व तऱ्हेचे लोक असतात. सर्व तऱ्हेचे लोक दत्तगिरींभोंवतीं जमू लागले. दत्तगिरींना कोणत्याहि गोष्टीचें स्तोम माजविण्याचा कंटाळा असे. निवती मठाचे दत्तगिरी परमयोगसंपन्न होऊन श्रीपादवाडीस आले

आहेत ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. खानोलीसही बातमी गेली. कित्येकांना आनंद झाला. कित्येकांनीं दत्तगिरींचें पूर्ववृत्त आठवून कुचेष्टेनें नाकें मुरडलीं. दत्तगिरींनीं केशकलाप राखला होता. गळयांत अक्कलकोट स्वामींनीं दिलेली रुद्राक्षांची माळ होती. कांखेला झोळी, कमरेला भगवी छाटी, हातांत मडकुळ (त्रिशुळासारखी लांब काठी) व लांकडाचा कमंडलू. बहुधा अनवाणी असत. कधींकधीं पायांत फक्त अंगठा असलेलें जुतें असे.

दत्तगिरींची दिनचर्या अशी फारशी नसेच. त्रिकाळ स्नान आणि दत्तनामाचा अखंड घोष हाच तिचा मुख्य भाग. पांच घरीं भिक्षा मागून मिळालेल्या अन्नावर असायचे. परंतु अन्नग्रहण नियमित नसे. माळेंत पाहून आज्ञा झाली तरच अन्नसेवन करीत. त्याशिवाय कोणी सद्भावनेनें कांहीं ग्रहण करण्याची गळ घातल्यास चिठ्या घालण्याची पद्धत होती. तरी पण लोक जमूं लागले. लोकांना काय ? जरा कुठें वेगळी वर्तणूक पाहिली कीं जमतात. दत्तगिरींची वागणूक, चालचालणूक तर अगदींच वेगळी. सामान्य माणसासारखी नव्हती. त्यांचेकडे लोक आशेनें येऊं लागले. कोणी पुत्रप्राप्तीसाठीं तर कित्येक रोगमुक्त होण्यासाठीं ! पण दत्तगिरींकडे अशा गरजूंना देण्यासारखें काय होतें ? त्यांजपाशीं गंडे, दोरे, अंगारे, धुपारे थोडेच होते ? कांखेला झोळी होती. तोंडांत 'दत्त' होता. हातांत मडकुळ होती. मग आशेनें अंवतीभंवतीं घोटाळणाऱ्यांना ते काय देणार ? परंतु ह्या अज्ञजनांचा अव्हेर तर करायचा नाहीं. त्यांचा बुद्धिभेद तर कदापि करायचा नाहीं. त्यांना समजेल अशा भाषेंत शक्य तों मार्गदर्शन केलेंच पाहिजे. तेंच तर दत्तगिरींचें मुख्य अवतारकार्य होतें आणि कुठल्याहि संताचें तेंच खरें कार्य असतें. जमलेल्या मंडळींना दत्तगिरी म्हणत, "मजपाशीं तुम्हांला उचलून देण्यासारखें कांहीं नाहीं. स्वतःचा उद्योग सोडून आशेनें मजकडे व्यर्थ धावूं नका. तुम्हांला जमत असेल तर म्हणा 'दत्तगुरू जय दत्त.' दत्तगुरूंच्या कृपेनें तुम्हांला मार्ग दिसेल." मग लोक दत्तनामाचा गजर करीत. दत्तगिरी दत्तचरणीं तल्लीन होऊन नाचूं लागत. देहभान विसरून, ब्रह्मानंदीं तल्लीन होऊन नाचूं लागत. अशावेळीं पुष्कळसे लोक आपोआप काढता पाय घेत. फार थोडे थांबत असत. त्यांच्यापैकीं कांहीं दत्तगिरींच्या चरणावर मस्तक ठेवीत. मग दत्तगिरीही त्यांच्या चरणावर मस्तक ठेवीत असत. दत्तगिरींपाशीं ज्येष्ठकनिष्ठ भाव नव्हता.

दत्तगिरींचा[१] तत्त्वज्ञानादि विषयांचा अभ्यास दांडगा असावा असें दिसतें. ज्ञानेश्वरी, यथार्थदीपिका, मुक्तेश्वरी, विवेकसिंधू वगैरे ग्रंथ त्यांचे संग्रहीं होते. ते कोणत्याही विषयावर मोठें प्रभावशील प्रवचन करूं शकत. त्यांची प्रतिभा असामान्य होती. उत्स्फूर्त कवनें करून ते त्यांचा प्रवचनांत उपयोग करीत. परंतु दत्तगिरींनीं ग्रंथलेखन केल्याचें आढळत नाहीं. भजनामध्यें दत्तगिरी तल्लीन होऊन नाचत असत. कधीं कधीं एका पायावर तासन् तास नाचत. भजनामध्यें उत्स्फूर्त कवनेंही असत. भजनास सुरुवात करतेवेळीं ते मातापित्याचें स्मरण करीत. त्यांच्या नित्य भजनांतील एक अभंग पुढीलप्रमाणें आहेः—

गोरखे प्रभू ताता—अन्नपूर्णा ती माता
जन्मलों नेमस्त ब्रह्मकुळीं—जन्मलों नेमस्त कृष्णातिरीं ॥
बाळपणीं मठीं—करविला संन्यासी
म्हणे गिरीदत्त—बागलांचे राईत ॥

खानोलीस जाण्यासाठीं दत्तगिरी श्रीपादवाडीहून निघाले. ते स्वतःचा बेत कुणालाहि सांगत नसत. जेथें जावयाचें तेथें कोणालाहि नकळत जात. असें असूनहि जर कांहीं लोक त्यांच्याबरोबर चालूं लागले तर त्यांना ते हरकत घेत नसत. इ. स. १८८२ च्या माघ महिन्यांत दत्तगिरी कोंकणांत उतरण्यासाठीं आंबोली घाटाच्या माथ्यावर आले होते. तेथेंच आंबोलीचा बाजार भरतो. दत्तगिरींबरोबर श्रीपादवाडीहून चालत आलेले कांहीं लोक होते. दत्तगिरींचा वेश आणि विलक्षण तेज पाहिल्यावर बाजारांत गर्दी जमायला वेळ लागला नाहीं. त्याच गर्दीत कै. राजाराम रघुनाथ खानोलकर हे गृहस्थहि होते. ते मूळ खानोलीचे. परंतु सावंतवाडींतील साळगांव गांवीं स्थायिक झाले होते. ते बेळगांवास कामानिमित्त जात होते. गृहस्थ श्रद्धाळू, भाविक होते. त्यांनीं स्वामी महाराज कुठले, काय, वगैरे चौकशी केली तों त्यांना समजलें कीं, ते दुसरे-तिसरे कोणी नसून आपल्या खानोलींतील निवतीमठाचे स्वामी दत्तगिरी होत. राजारामांना दत्तगिरींची पूर्व ओळख नव्हती. त्यांना अत्यानंद झाला. आणि दत्तगिरींच्या चरणावर त्यांनीं प्रेमानें लोटांगण घातलें. दत्तगिरींनीं त्यांना उठवून

---

१. धोंडू यशवंत गोसावी बागलकर, बागलांची राई, २९–१२–३२.

प्रेमानें जवळ घेतलें व 'तूं कोण, कुठचा, कुठें जाणार' वगैरे चौकशी केली. खानोलकरांनीं सर्व हकिकत सांगितली. त्यावर दत्तगिरी 'तूं माझ्याबरोबर कोंकणांत चल' असें त्यांना म्हणाले. आज्ञा शिरसावंद्य मानून खानोलकर दत्तगिरींबरोबर परत मागें फिरले. आंबोली घाट उतरून दत्तगिरी सावंतवाडींत आले. तरीहि खानोलीची वाट न धरतां ते प्रथम साळगांवास जाण्यास निघाले. साळगांवचे राजाराम खानोलकर बरोबर होतेच. वाटेंत झारापी गांव लागलें. तेथें भाने विठे प्रभू ह्या विठ्ठलभक्ताचें घर होतें. त्यांच्या अंगणांत दत्तगिरींनीं एक रात्र मुक्काम केला. तेवढ्या वेळांत प्रभूंच्या अंगणाचें पंढरपूर झालें. अनेक लोक दत्तगिरींच्या दर्शनानें आनंदून परत गेले.

दुसरे दिवशीं दत्तगिरींनीं साळगांवांत प्रवेश केला. नशीब काढण्यासाठीं जे अनेक निवतकर देशांतरास गेले त्यांपैकीं बरेच साळगांवांत स्थायिक झाले होते. खाऊनपिऊन सुखी होते. त्यांच्या वंशजांपैकीं एक कै. आत्माराम झिले प्रभु खानोलकर हे दत्तगिरींचे जवळचे वारसदार होते. साळगांवास त्यांच्याकडे दत्तगिरी प्रथम गेले. त्यांच्या घरावर दत्तगिरींचा फार लोभ होता असें दिसतें. घरासमोरच औदुंबराचा पार होता. त्या पारावर दत्तगिरी स्थिरावले. ते सहसा कोणाच्या घरांत मुक्काम करीत नसत. साळगांवच्या या भागाला खेरवाडी म्हणत. खेरवाडींत नुसती जत्रा फुलली. एखाद्या तीर्थक्षेत्राचें स्वरूप आलें. जनसागर सारखा उचंबळत होता. सर्व तऱ्हेचा समाज होता. स्वयंस्फूर्तीनें लोकांनीं अख्खी रात्र गाजविली. ढोल, तासे, नगारे वाजले. दत्तनामभजनाचा पूर लोटला. दत्तगिरींचें दर्शन घेऊन अनेक लोक निघून गेले. पुष्कळसे घोटाळतहि राहिले. दत्तगिरी आपल्याला कांहींतरी प्रसाद देतील अशा भोळ्या आशेनें राहिले. दत्तगिरींजवळ देण्यासारखा एक 'दत्त' होता. तो त्यांनीं देऊं करतांच बरेचसे लोक आपोआप पांगत असत. त्यांतून कांहीं चिकाटीनें जवळ राहिलेच तर दत्तगिरी त्यांना स्वतःच्या आचरणानें स्वच्छतेचें, सदाचाराचें आणि समानतेचें महत्त्व पटवून देत. त्याकाळीं जातीयतेच्या भावना फार तीव्र होत्या. 'अस्पृश्यता नष्ट करा' असा कोरडा उपदेश दत्तगिरींनीं कधींही केला नाहीं. भजनाचे वेळीं महार लोक ढोल बरोबर वाजवीनात तेव्हां दत्तगिरींनीं स्वतः गळ्यांत ढोल घातला व तालबद्ध कसा वाजवावा तें दाखवून दिलें. ज्या ठिकाणीं घाण असेल, उकिरडा असेल अशाच जागीं बहुधा दत्तगिरी वस्तीला

राहण्याचा बेत करीत. मग खुटावऱ्यानें झाडण्यास लागत, मडकुळीनें उकिरडा उकरीत. मग आजूबाजूचे अनेक हात आपोआप त्या कामाला लागून निमिषार्धांत उकिरड्याचें नांवनिशाणहि नाहींसें होऊन जागा माणसाच्या निवासाला योग्य होई.

साळगांव सोडून दत्तगिरी अचानक निवतींत प्रगट झाले. १४ वर्षांपूर्वी जसे अचानक नाहींसे झाले तसे आतां अचानक परत आले. पण पूर्वीच्या दत्तगिरींत आणि आजच्या दत्तगिरींत जमीनअस्मानाचा फरक होता. आजचे दत्तगिरी सिद्धावस्थेस पोंचलेले, ज्ञानसंपन्न, परमयोगी पुरुष. मोक्षाचें द्वार दिसल्यावरहि मायभूमीच्या सेवेसाठीं परत आलेले एक थोर संत होते. त्यांचें दिव्य तेज पाहून सर्व विरोध जागच्या जागीं मावळले. लोकांना आनंद झाला. निवतीचा भाग्यशाली सत्पुत्र निवतींत परत आला. संतपरंपरा चालविण्यासाठीं परत आला. दत्तगिरींच्या सहवासानें निवतीला फारच उजाळा आला. लांबलांबवरून लोकांच्या झुंडीच्या झुंडी दत्तगिरींच्या दर्शनासाठीं निवतींत शिरूं लागल्या. निवतीचीं आगरें 'दत्तगुरू जय दत्त' निनादानें दुमदुमूं लागलीं. जनसागर अनावर होऊं लागला. लोक हट्टाला पेटले. कुठल्याहि गोष्टीचा कां असेना, उन्माद हा अनहितकारकच ठरतो. लोकांनीं दत्तगिरींना अगदीं गुदमरवून टाकलें. लोक आवरेनात म्हणून दत्तगिरी मठाजवळच असलेल्या एका गुहेंत जाऊन बसले. तीन दिवस समाधि लावून बसले तरीहि लोक पांगेनात. उलट जास्तच लोक जमले. मग दत्तगिरी गुहेंतून बाहेर आले व लोकांना म्हणाले, 'तुम्ही माझ्याकडून अनुग्रह मिळेल म्हणून आलांत ना ? मग म्हणा 'दत्त गुरू जयदत्त, आणि जाग्यावरून हलूं नका.' लोकांनीं तसें करण्यास सुरुवात केली. दत्तगिरी हातांत मडकुळ घेऊन देखरेख करीत राहिले. जनसमुदायांत हळूं हळूं चुळबुळ सुरू झाली. लोक कंटाळून उठूं लागले. पण दत्तगिरींनीं, उठला कीं हाण काठी, असा सपाटा चालविला. लोकांना पळतां भुई थोडी झाली. या वेळेला अनेकांनीं दत्तगिरींच्या काठीचा प्रसाद खाल्ला. वातावरण अगदीं स्वच्छ झालें.

दत्तगिरींचें प्राथमिक शिक्षण मठांत झालें होतें. तेथें त्यानीं आतां मुलांना स्वतः शिकविण्यास सुरुवात केली. धन्य तीं मुलें कीं ज्यांना दत्तगिरींसारखे मास्तर मिळाले ! दत्तगिरींपाशीं शिकावयाचे असेल तर मुलांना एक कसोटी असे. मुलांनीं दररोज आंघोळ केलीच पाहिजे. (शहरी जनांना आज ह्या दंडकाचें

कदाचित् आश्चर्य वाटेल. परंतु खेडोपाडीं आजहि महिनेच्या महिने अंगाला पाण्याचा स्पर्श न झालेलीं मुलें असतात.) आईवडिलांना नमस्कार केलाच पाहिजे. उठाबशा अथवा नमस्कार घातलेच पाहिजेत. व्यायाम हा अभ्यासाचाच एक भाग गणला जात असे. ही झाली मुलांच्या शिक्षणाची बाब. आतां मोठ्यांच्या शिक्षणाची बाब पाहूं. खरी पंचाईत इथेंच असते. मोठे स्वतःला जाणते समजतात. त्यांना शिकविण्याचें धाडस करणें म्हणजे विस्तवाशीं खेळ. दत्तगिरींना प्रयत्न करणें प्राप्त होतें. अर्थात् त्यांचा मार्ग उपदेशाचा नसून कृतीचा, उदाहरणाचा होता. दत्तगिरी एका जागीं फार वेळ ठरत नसत. सारखे फिरत असायचे. निवतीला परत आल्यावर ते मठांत असे फारसे रहात नसत. सगळीकडे संचार करीत असत. खानोली गांवाचा कोपरान् कोपरा त्यांनीं पायीं फिरून पाहिला होता.

खानोलींत ब्राह्मणेतर समाज जास्त. मच्छीमार मराठा समाजापैकीं अनेक जण दत्तगिरींचे निस्सीम भक्त बनले. दत्तगिरी त्यांच्या घरापाशीं जात. अंगणांत उमे रहात व म्हणत, 'तुळशीवांचून खळ्याक सोभा नाय!' (तुळशीशिवाय अंगणाला शोभा येत नाहीं.) थोड्याच दिवसांत प्रत्येकाच्या घरासमोर अंगणांत तुळसी-वृंदावन शोभूं लागलें. खानोली गांवांत दारांत तुळस नाहीं असें घर सांपडणार नाहीं. मच्छीमार लोक मासे पकडून, थकूनभागून आल्यावर स्वच्छ आंघोळ करून तुळशीला भक्तिपूर्वक पाणी घातल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नाहींत. दत्तगिरी ब्राह्मणांच्या घराजवळ जात, एकेरी नांवानें हांक मारून गोठ्यांत गोरूं आहे कीं काय त्याची चौकशी करीत. गांवांत ढोरें बहुतेक नव्हतींच. मध्यंतरींच्या काळांत माणसांनाच अन्न मिळण्याची पंचाईत पडली होती. मग जनावरांना काय घालणार? दत्तगिरी बामणांना म्हणत, "मेल्यानु, बामण कसले तुमी? तुमच्या गोठ्यांत गोरूं नाय!" यामुळें प्रत्येक बामणाचें घर गुरें पाळूं लागलें. हळू हळूं दूधदुभतें वाढलें. शेणखत वाढलें. आणि शेतीला अत्यंत जरूर असलेले बैलही गांवांतच निपजूं लागले. अर्थात् या सर्व गोष्टी वाडवडील करीत आले होते. परंतु मध्यंतरींच्या अवदसेच्या फेऱ्यानें सगळ्यावर अवकळा आली होती. दत्तगिरींनीं लोकांना उचलून कांहींही दिलें नाहीं. लोकांना स्वतःच्या उद्योगानें सुखसमाधान मिळविण्यास शिकविलें. सर्वसामान्य जनतेला याच गोष्टीची खरी गरज आहे. दुसऱ्यानें दिलेल्या डबोल्यावर मनुष्य फार काळ श्रीमंत राहूं शकत नाहीं. दत्तगिरींच्या संचारानें खानोली खडबडून जागी झाली. जो तो स्वतःच्या

घराची, परसाची, गोठ्याची काळजी घेऊं लागला. दत्तगिरी कधीं कुठें दत्त म्हणून उभे राहतील याचा नेम नव्हता. आणि मग त्या ठिकाणीं कांहीं वेडेंवांकडें सांपडल्यास होणारी फजिती टाळण्यासाठीं सगळेचजण उत्सुक झाले.

खानोलीच्या कायापालट झाला. मध्यंतरीं यादवीच्या जळमटानें व्यापलेलीं अंतःकरणें सदाचरणाच्या पाण्यानें धुऊन स्वच्छ झालीं. घरें स्वच्छ झालीं. अंगणें स्वच्छ झालीं. दारापुढें तुळस डोलूं लागली. गोठ्यांत गाय वासराला चाटूं लागली. शाळकरी मुलें मनःपूर्वक अभ्यास करूं लागलीं. वृद्ध भक्तीच्या प्रेमजळांत डुंबून शांत होऊं लागले. दत्तगिरींच्या सहवासानें हें सर्व घडलें. केवढा मोठा चमत्कार हा! दत्तगिरींकडून हा अलौकिक चमत्कार घडला. ह्या गोष्टींत त्या थोर महात्म्याचें वैशिष्ट्य दिसतें. यादवीमुळें भ्रष्ट आणि मृतवत् झालेल्या सबंध गांवाला नव-चैतन्य आणणें हें पराकाष्ठेचें कठीण काम आहे; दत्तगिरींकडून हें घडलें. हाच त्यांच्या जीवनकार्यांतील सर्वांत मोठा चमत्कार होय. मायभूमीला अशा तऱ्हेनें भक्कम पायावर सत्प्रवृत्त केल्यावर दत्तगिरींनीं इतरत्र संचाराला सुरुवात केली. श्रीपादवाडी आणि साळगांव ह्या दोन ठिकाणीं त्यांचा जास्त ओढा होताच त्याशिवाय दत्तगिरी कारवारमधील अंकोला, हल्याळ, गोकर्ण, तसेंच गोमंतक, वेळगांव, सावंतवाडी व वेंगुर्लें तालुक्यांतील सर्व गांवीं सारखा संचार करीत. जेथें जेथें दत्तगिरी जात तेथें तेथें कोणाला तरी मार्गदर्शन करण्याचा त्यांचा इरादा असे. सर्वसाधारण जनता कधीं खोल विचार करण्याच्या फंदांत पडत नाहीं. अशा वेळीं चमत्काराशिवाय नमस्कार घडत नाहीं. दत्तगिरींना अर्थात् कोणाच्याहि नमस्काराची अपेक्षा नव्हती. परंतु लोकांना भानावर आणण्यासाठीं प्रसंगोपात्त ज्यांना आपण 'चमत्कार' म्हणतों अशा गोष्टी त्यांच्याकडून घडल्या.

दत्तगिरींकडून घडलेल्या चमत्कृतिजन्य गोष्टींत दुष्टांना दंड आणि सज्जनांना मदत असाच प्रकार जास्त आढळतो. जेथें दुर्जनांकडून सत्प्रवृत्त माणसांची पिळणूक होत असे तेथें दत्तगिरी अनाहूत जात असत. परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। अशाच हेतूनें त्यांचा सर्वत्र संचार चालू असे. श्रीमद्दत्तगिरी गोसावी आतां बेळगांवपासून खालीं कारवारपर्यंत सर्वत्र माहिती झालेले होते. त्या भागांत कुठेंही त्यांचें अचानक आगमन होई. एकदां आजगांव जवळील तिरोडें गांवांत दत्तगिरी तीनसांजा माउलीच्या देवळांत येऊन दाखल झाले. दत्तगिरी आल्याची बातमी कशी पसरे कुणास ठाऊक!

पण दहापंधरा मिनिटांत देऊळ भजनकऱ्यांनीं भरून गेलें ! दत्तगिरी नेहमीं-प्रमाणें भजनकऱ्यांत मिसळून तल्लीन होऊन नाचूं लागले. माउलीच्या देवळाला दोन पडव्या होत्या. बाबली तिरोडकर व त्यांचा पुतण्या लक्ष्मण, तिरोड्याचे मातबर गांवकरी, देवळाचे वहिवाटदार होते. त्या चुलत्या पुतण्यांनीं षौकासाठीं दोन कलावंतिणी आणून देवळाच्या पडव्यांत ठेविल्या होत्या. दत्तगिरींच्या आगमनाचे वेळीं ते महाभाग तेथें नव्हते. जरा जास्त रात्र झाल्यावर ते आले आणि दत्तगिरींचें भजन पाहून फारच संतापून ओरडले, "अरे, ह्या गोसावड्याक् आणून काय ह्यां खूळ मांडलास् ?? दिवे काडा, भजन एकदम बंद करा. आमकां हंयसर कोणाची खट्‌खट् नको !" बाबली आणि लक्ष्मण तिरोडकर, गांवांतील बडीं बडीं धेंडें तीं ! गांवांतील श्रीमंत ते ! आणि या घटकेला तर विषयांध झालेले ! त्यांच्या दरडावणीनें लोकांची स्थिति मोठी केविलवाणी झाली. चुळबुळ पाहून दत्तगिरींनीं चौकशी केली तों त्यांना लोकांनीं भीतभीतच सारा प्रकार सांगितला. त्यावर दत्तगिरी शांतपणें म्हणाले, "आतां भजन नको. घराक् जौन् झोंपा. गांवकारांच्या कर्माचो घडो भरलो !"

इतक्यांत दत्तगिरी लोकांचा डोळा चुकवून निसटले ते दोन मैलांवरील मळेवाडींत आले. मळेवाडीच्या एका निर्जन भागांत दादे परब ह्या मराठा गृहस्थाचें शेत होतें. शेतांत राख वगैरे खतें सांठविण्यासाठीं एक खोप होती. त्या खोपींत दत्तगिरी भजन करीत बसले. मोठ्या पहांटे दादे परबाच्या दोन्ही बायका राखण करण्यासाठीं त्या खोपीकडे आल्या आणि दत्तगिरींना पाहून चपापल्या. तेवढ्यांत लोकही शोध काढीत तेथें आले. शेंपाचशें समुदाय जमला. आणि मग भजनाचा एकच कडाका उडाला. शेतांत नाचणा उभा होता. तो सर्व जनसागराच्या लाटेनें आडवा झाला ! तो प्रकार पाहून दत्तगिरी कासावीस झाले व दादेच्या बायकांना गहिंवरून म्हणाले, "बायांनो, आमच्या येण्यामुळें तुमच्या शेताची नुकसानी झाली ! आतां कसें करावें ?" त्यावर त्या भाविक अश्राप अबला उत्तर करतात, "म्हाराजानुं नुकसानी कसली म्हणतास ? म्हाराजाचे पाय ह्या जाग्याक् लागले ! म्हाराजाच्या कृपेन् आमकां उदंड गावात् !!" दत्तगिरींना त्या बायांचा भाव पाहून कौतुक वाटलें. त्यांनीं चौकशी केली तों त्यांना समजलें कीं स्वतः दादे परब व त्याचा कर्तासवरता मुलगा दैववशात् अनावर वेडे बनून त्या बायांना मारझोड करीत. घरांत ठरूं

देत नसत. त्या दोघी सवती खऱ्या, परंतु सख्ख्या बहिणींप्रमाणें वागत. पण घरांत हा त्रास! सर्व कांहीं असून नसल्यासारखें! कर्म मागें लागलेलें होतें. दत्तगिरींनीं त्यांच्याकडे दयार्द्र दृष्टीनें पाहून म्हटलें, "तुम्ही आतां घरीं जा. तुमचे घरकारी आणि मुलगा बरे झाले आहेत! आनंदानें रहा." बाया घरीं येऊन पहातात तों फरक जाणवला. दादेचें वेड ओसरलें होतें! मुलगा होता तो थोरल्या बायकोचा. आस्ते आस्ते त्याचेंही वेड कमी झालें. बापलेक कामधंदा पाहूं लागले. दादेच्या धाकलीस संतती नव्हती, ती झाली. हळुहळु घर भरलें. अभ्युदयाच्या मार्गाला लागलें. एक कुटुंब सुखी झालें!

दादे परबाची जशी उन्नति होत गेली त्यापेक्षां कितीतरी जलद बाबली आणि लक्ष्मण तिरोडकर ह्या जोडीचा अधःपात सुरू झाला! त्यांचा भला मोठा वाडा होता गांवांत. रंग करण्यासाठीं देवळाच्या पडव्यांत नायकिणी आणून ठेवल्या त्यांनीं. श्रीमंती होती. मान होता. रुबाब होता. बेफाम होऊन त्यांनीं सत्पुरुषाचा आणि भाविक जनतेचा उपमर्द केला! आणि त्याच घटकेपासून त्यांच्या घसरगुंडीला सुरुवात झाली. कंत्राटाचा धंदा होता त्यांचा. कमाई चांगली होत असे. नुकसान कसें तें माहीत नव्हतें! पण आतां अचानक अशी ठोकर बसली कीं एकदम होत्याचें नव्हतें झालें! जमीन गेली. वाडा गेला. घराचें घरटाण झालें! त्याच्यावर तिरडे रुजले! आणि ते दोघे गांवकरी, ज्या देवळाच्या पडवींत 'छुमछुम' मध्यें दंग होत असत त्याच पडवींत भणंगासारखें अन्न उकडून खाऊं लागले! अशा ह्या लाचार जिण्यापेक्षां नरकयातना त्या कितीशा वेगळ्या असणार!

वरील तिरोडकरांची व दादे परबांची हकिगत, श्रीमती[1] अन्नपूर्णाबाई नारायण नाईक यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली व स्वतः लिहून पाठविलेली आहे. अन्नपूर्णाबाईचें माहेर आजगांवीं. आत्माराम झिले प्रभू आजगांवकर यांची मुलगी. माहेरचें नांव सखू. ती चौदा वर्षांची होती. बाराव्या वर्षीं लग्न झालें. परंतु सासरीं कांहीं-तरी बिघडलें आणि तिला माहेरीं दवडली. आज दोन वर्षें ती अजाण पोर माहेरीं होती. दत्तगिरी आजगांवास वारंवार जात असत. निवतीच्या गिरींचे व सर्व खानोलकरांचे गुरु श्री चिदानंद स्वामी बागलकर यांचा जन्मगांव आजगांव हें

---

१. श्रीमती अन्नपूर्णाबाई नारायण नाईक. मालवण, ता. ११–१२–१९३१.

आपण मागें पाहिलेंच आहे. एके दिवशीं भर दोनप्रहरीं दत्तगिरी सखूचे घरीं गेले. मंडळींचीं जेवणें होऊन गेलीं होतीं. घरांत बाळंतीण होती. तिच्यासाठीं दोन घांस भात, आमटी व आंबील राखून ठेवली होती. दत्तगिरी सखूच्या चुलतभावास म्हणाले. "फार भूक लागली. जेवायला घाल." बाळंतिणीसाठीं राखलेलें घांस दोन घांस अन्न! तें या सत्पुरुषास कसें वाढावें! म्हणून संकोचून सखूची काकी कांकू करूं लागली. तेव्हां दत्तगिरी तिला म्हणाले, "असेल तें वाढ. नवीन अन्न शिजवूं नको." काकीनें भात वाढला. आमटी वाढली. होती तेवढी आंबील वाढली. दत्तगिरींनीं दुसऱ्यांदा आंबील मागून घेऊन भुरकली व तृप्ति झाल्यासारखा ढेकर दिला. इतक्यांत झोंपलेलें तान्हें मूल जागें होऊन रडूं लागलें. काकीला बाळंतिणीच्या जेवणाची आठवण होऊन काळजांत धस्स झालें. परंतु आंत जाऊन पहाते तों काय आश्चर्य! भात, आमटी, आंबील, भांड्यांत जशीच्या तशी! मुलाचें रडणें ऐकून दत्तगिरींनीं चौकशी केली. घरांर बाळंतीण होती. पण तिची मुलें महिनाभरसुद्धां जगतनसत. दत्तगिरींनीं सांगितलें, "या मुलाचें नांव दिगंबर ठेवा. हा जगेल." दत्तगिरींच्या सांगण्याप्रमाणें दिगंबर जगला वांचला. त्याला आणखी भावंडें झालीं. कुटुंबाची खालावलेली स्थिति आस्ते आस्ते खरी, पण चांगली सुधारली.

वरील घटनेनंतर आठपंधरा दिवसांनीं दत्तगिरी आजगांवांत परत आले. सायंकाळचा सुमार होता. सखूचे वडील आत्माराम झिले दर्शनासाठीं गेले होते. चिठ्ठया घातल्या. त्यांत आत्माराम झिलेकडेच रात्रौ प्रसाद घ्यावा म्हणून आज्ञा आली. फराळासाठीं हरभऱ्याची उसळ खावी असेंही ठरलें. निरोप सांगण्यासाठीं सखूचे वडील घरीं आले तों समजलें कीं बायको विटाळशी! सखू लहान, चौदा वर्षांची! सासऱ्यानें धमकावून माहेरीं पाठविली होती. सायंकाळचें जेवण उरकून केव्हांच निद्रादेवीच्या आधीन झाली होती! आणि नेमक्या ह्याच वेळीं दत्तगिरी प्रसादासाठीं येणार! मोठी पंचाईत झाली. वडिलांनीं सखूला जागें केलें. दत्तगिरींनीं हरभऱ्याची उसळ खाण्याची इच्छा दाखविली होती. पण उसळींत घालण्यासाठीं नारळ शिल्लक नसल्यास रात्रींच्या वेळीं झाडावरून काढूं नको म्हणूनहि बजावलें होतें. पहातात तों खरेंच नारळ काढलेला नव्हता. सखूनें नारळाशिवाय उसळ केली व वडिलांबरोबर दत्तगिरींच्या दर्शनासाठीं गेली. गर्दी बरीच असल्यामुळें सखू अंग चोरून दूर

उभी राहिली. दत्तगिरींनीं स्वतः तिला जवळ बोलावून घेतलें, व तिच्याकडून तिची सर्व हकिकत समजून घेतली. एक नारळ व केळीं त्यांनीं स्वहस्तें सखूच्या पदरांत घातलीं व तिच्या वडिलांस म्हणाले, "हिला उजाडतांच सासरीं पोंचती कर. न केल्यास मी स्वतः पैसे देऊन तिच्या नवऱ्यास दुसरें लग्न करण्यास सांगेन." सखूचे वडील म्हणाले, "कुटुंब विटाळशी. आंघोळ झाल्यावर दोन दिवशीं पोंचती करतों." त्यावर दत्तगिरी रागावून म्हणाले, "उद्यां पोंचती कर. सासरची कांहीं हरकत होणार नाहीं. तसें न केल्यास पुढचें मला सांगतां येत नाहीं." दत्तगिरींच्या आज्ञेप्रमाणें वडिलांनीं सखूला उजाडतांच सासरीं पावली. कांहीं विघ्न आलें नाहीं. सखू सासरीं नांदूं लागली. दत्तगिरींच्या आशीर्वादानें सखूच्या संसारांतील संकटें दूर होऊन तिचें घराणें सुखी झालें !

दत्तगिरींना वाक्‌सिद्धि प्राप्त झाली होती. त्यांना भविष्यांतील गोष्टी अगोदर समजत असत. प्रसंगोपात्त ते बोलत आणि त्याप्रमाणें गोष्टी घडत. सामान्य जनांना ह्याचाच चमत्कार वाटत असतो. एकदां दत्तगिरी साळगांवास 'आत्माराम दादा'–(आत्माराम झिले प्रभु खानोलकर) च्या घराकडे निघाले होते. तों दादांची पत्नी काळें लुगडें नेसून घराजवळील पिंपळास प्रदक्षणा घालीत असल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें. ते बाईला म्हणाले, "सफेत वस्त्र नेसून प्रदक्षणा घालुंची." त्यावर बाई बोलली, "म्हाराजांनुं, सवाशिणी सफेत नेसणंत नाय." दत्तगिरी शांतपणें म्हणाले, "नेसांचा लागात." (सफेत वस्त्र नेसावें लागेल.) दत्तगिरींच्या या बोलण्याचा अर्थ पुढें लवकरच लोकांच्या लक्षांत आला. दोन महिन्यांच्या आंत दादा परलोकवासी झाले. सोंवळी झाल्याबर बाई सफेत वस्त्र नेसून पिंपळाला प्रदक्षिणा घालूं लागली. दत्तगिरींची स्वारी एकदां आजगांवावरून आरलीस समुद्रकिनाऱ्यावर आली असतां पणजीहून मुंबईस जाणारी बोट दृष्टीस पडली. त्याबरोबर दत्तगिरी बरोबरच्या मंडळीस म्हणाले, "या बोटींतून मी मुंबईस जाणार." ताबडतोब सर्व मंडळी होडींत बसून वेंगुर्लें बंदरास जाण्यास निघाली. अर्थात् आरलीस दिसलेली बोट होडींतून निघालेल्या मंडळीस वेंगुर्ल्यास मिळणें अगदींच असंभवनीय. तथापि दत्तगिरींची होडी वेंगुर्ल्यास पोंहोंचली तेव्हां एक तास अगोदर आलेली बोट बंदरांतच उभी होती. तपासाअंतीं समजलें कीं बोटीचा पंखा नादुरुस्त झाल्यामुळें ती बंदरांत अडकून पडली होती. दत्तगिरी बोटीवर चढले त्यावेळेस पंखा दुरुस्त होऊन बोट चालूं झाली. दत्त-

गिरींनीं[१] यापूर्वीं मुंबई पाहिली नव्हती. किंवा अगोदर कोणास पत्रानें कळविलेंहि नव्हतें. बोट भाऊच्या धक्क्याला लागली. दत्तगिरी धक्क्यावर उतरले तोंच श्रीमंत रा. ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले कांहीं कामानिमित्त तेथें आले होते, त्यांनीं पाहिलें. टोपीवाल्यांनीं मोठ्या हर्षानें व सत्कारानें दत्तगिरींना बंगल्यावर नेलें आणि दत्तगिरींची पुढील सर्व व्यवस्था त्यांनीं चोख ठेवली.

वरील गोष्टीनंतर दोनचार वेळां दत्तगिरींचें मुंबईत आगमन झालें होतें. दत्तगिरींचे सर्वांत थोरले बंधू अनंत गोरखे प्रभू यांची मुलगी बापूदादा तेंडोलकर यांना दिली होती. त्यांचें बिऱ्हाड गिरगांवांत निकदवरी लेनमध्यें होतें. मुंबईत आल्यावेळीं दत्तगिरी तेथें जात असत. बापूंची पुतणी यमुना दत्तगिरींना पूजासाहित्य भक्तिपूर्वक जमवून देत असे. दत्तगिरींची तिच्यावर कृपा झाली. ते यमुनेला म्हणत, 'मुली, तुझें कल्याण होईल. तुला चांगलें घर मिळेल.' दत्तगिरींच्या आशीर्वादाप्रमाणें[२] यमुनेला चांगलेंच घर मिळालें. पांडुरंग भिकाजी (प्रो. तात्यासाहेब) नाईक यांजबरोबर तिचा विवाह झाला. सासरचें नांव रखुमा. रखुमाबाईचें सासर म्हणजे निवती गिरीमठापासून हांक दोन हांकांवर असलेलें आरा नाईकांचें घर. दत्तगिरींना रखुमाबाईच्या सासूचा (मावशेबाईचा) लहानपणापासून लळा होता. तिला दत्तगिरी 'आई' म्हणत. कधीं कधीं दत्तगिरी मावशेबाईना म्हणत 'आई, मी तुझ्या कुटुंबांत जन्मास येऊन तुझें ऋण फेडीन.' दत्तगिरींच्या निर्वाणानंतर कैक वर्षांनीं रखमाबाईना मुलगा झाला. त्याचें नांव सदानंद ठेविलें. सदानंदाच्या जिवाला प्रथमपासूनच बरें वाटेना. त्याच्याबद्दल चिंता वाटूं लागली. मुलगा जगूनवांचून नांवारूपाला येईल अशी शाश्वती वाटेना. मावशेबाईना दत्तगिरी नेहमीं म्हणत असत त्याचें एकाएकीं स्मरण झालें. त्याबरोबरोबर मावशेबाईनीं दत्तगिरींचें श्रद्धापूर्वक स्मरण केलें आणि सदानंदांचें पुन्हा विधिपूर्वक 'दत्तात्रय' असें नांव ठेविलें. काय असेल तें असो, त्या घटकेपासून दत्तूच्या जिवाला आराम पडूं लागला. श्रीयुत दत्तात्रय पांडुरंग नाईक हे आज एक यशस्वी, प्रकाशांतील व्यक्तींपैकीं आहेत.

मुंबईला आल्यावेळीं दत्तगिरींनीं, विरार, अरनाळा व वसई या भागांतही संचार

---

१. गोविंद नारायण सामंत, श्रीमठ दाभोली, ता. ३०–१–३०

२. रखमाबाई पांडुरंग नाईक. मंगळूर, १३–४–१९३२

केला होता. दत्तगिरींचे अनेक भक्तजन त्या भागांत होते. विशेषतः वसईला[१] भास्कर आळींतील लक्ष्मण राघोबा गव्हाणकर व केशव रामचंद्र गाळवणकर (बाळाशेट) दत्तगिरींचे मोठे चहाते होते. बाळाशेटच्या घरासमोरील उघड्या जागेंत औदुंबराचा एक वृक्ष होता. त्या ठिकाणीं एकदां मोठ्या पहांटेस दत्तगिरी अचानक प्रगट झाले व 'श्रीगुरुदेवदत्त' अशी मोठ्यानें आरोळी ठोकली. त्यासरशी गव्हाणकर, गाळवणकर वगैरे लहानथोर मंडळी जमा झाली. दत्तगिरींचें चांगलें स्वागत करून सत्कार करावा असें सर्वांना वाटत होतें. परंतु दत्तगिरींनीं तेथील औदुंबर वृक्षाखालीं बैठक मारून भजनास सुरुवात केली. जमलेले सर्वजण त्यांत सामील झाले. नामस्मरण आणि भजन यांशिवाय दुसरा कसलाही सोपस्कार त्यांना मान्य नव्हता.

पाखंडी आणि भ्रष्ट माणसांना ताळ्यावर आणण्यासाठीं दत्तगिरी फार कष्ट घेत असत. तसेंच भाऊबंदकी तोडून एक एक घर सुखी करण्याकडेहि त्यांचें लक्ष होतें. दत्तगिरींचा मुक्काम परुळ्यास धोंडी जनार्दन सामंत यांचेकडे होता. पाटगांवचे नारायण सदाशिव पाटील व लक्ष्मण सदाशिव पाटील हे दोघे सख्खे बंधू परुळ्यास स्थाईक झाले होते. परंतु ते हाडवैऱ्यासारखे वागत. भावाभावांच्या लाथाळींत घराण्याचा अस्त होण्याची वेळ आली. परंतु त्याहूनहि गंभीर परिणाम इतरेजनांवर होऊं लागला. त्यांच्यासारखीं गांवांतील मातबर माणसें अशीं कमरेचें सोडून डोक्याला गुंडाळून नाचूं लागलीं, तर इतर अज्ञ जनांनीं कसें करावें? दत्तगिरींनीं थोरल्यास बोलावून घेतलें आणि एखाद्या गैरमाहितगारा-प्रमाणें परंतु आस्थेनें चौकशी केली. नारायणानें सर्व हकिकत सांगितली. परंतु ती सांगतां सांगतांच तो खजील झाला. त्यानें सख्ख्या भावाच्या बाबतींत स्वतःच्या दुष्कृत्याचा पाढा सत्पुरुषासमोर वाचला. त्यानेंच त्याचें विकारांनीं पेटलेलें मन शांत झालें. दत्तगिरींच्या चरणीं लीन होत्साता त्यानें क्षमा मागितली. दत्तगिरींनीं लगेच दुसऱ्या भावाला बोलावून आणलें. त्यानेंहि अत्यंत खजील होऊन हकिकत सांगितली. आतां त्या दोघांना उपदेश करण्याची गरजच राहिली नव्हती. आणि नुसत्या उपदेशाला त्यांनीं वाटाण्याच्या अक्षताच लावल्या असत्या. धाकट्यानें दत्तगिरींच्या देखत थोरल्याच्या चरणावर मस्तक ठेवलें. थोरल्यानें प्रेमपूर्वक

१. सावित्रीबाई लक्ष्मण गव्हाणकर, भास्कर आळी, वसई. २७-१०-२९

आशीर्वाद देऊन धाकट्यास उठवलें. इतकेंहि करून दत्तगिरी थांबले नाहींत. थोरल्याच्या बायकोला बोलावून आणलें आणि ते बाईस उद्देशून बोलले, "बाई, हा तुझा मुलगा." व लक्ष्मणास म्हणाले, "ही तुझी आई." एवढें झाल्यावर दत्तगिरी निघून गेले. यानंतर सर्व द्वेषभावना विसरून यथाकाल तें पाटील-कुटुंब परुळ्यांत एक आदर्श घराणें म्हणून नांवाजलें.

दत्तगिरींचा मुक्काम हुमरमळ्यास (वालवल गांवची एक वाडी) मधूनमधून होत असे. [1] हुमरमळ्यांत दत्तात्रेय रामचंद्र देसाई नांवाचा एक मोठा नास्तिक, दुराग्रही व साधुसंतांबद्दल उद्धट अविश्वास बाळगणारा गृहस्थ होता. दत्तगिरींच्या सान्निध्यांत तो कधीं आला नव्हता. किंबहुना तो कटाक्षानें दूरच रहात असे. एकदां दत्तगिरींनीं मुद्दाम स्मरण केल्यासारखें करून जवळच्या मंडळींस दत्तोबा देसायास बोलावण्यास सांगितलें. मंडळी जरा कांकूं करूं लागली. दत्तोबाची कीर्ति त्यांच्या कानावर गेली होतीच. दत्तोबा असल्या निरोपानें येणार तर नाहींच, उलट दुरुत्तरें करील! आपल्याला वाटणारी भीति लोकांनीं दत्तगिरींच्या कानावर घातली. त्यावर दत्तगिरी मंडळींस शांतपणें म्हणतात, "अरे, आपलें काम करीत असावें. व्हायचें तें होईल!" पहिल्या खेपेस दत्तोबानें पार सर्वांना धुडकावून लावलें. दुसऱ्या खेपेस चिरडीला जाऊन म्हणाला, "तुम्ही काय करतां तें करा ?? माझा रस्ता वेगळा!" तिसऱ्या खेपेस "तूं नुसता येऊन बैस. त्यानें तुझें काय बिघडणार ?" असा युक्तिवाद करून मंडळींनीं दत्तोबास दत्तगिरींच्याकडे जनसमुदायांत आणून बसविला. दत्तगिरींनीं त्याच्याकडे पाहिलें सुद्धां नाहीं. परंतु प्रवचनाला असा विषय घेतला कीं त्याच्या ऊहापोहानें दत्तोबाच्या सर्व शंकाकुशंकांचें आपोआप निराकरण झालें! दत्तगिरींच्या केवळ वाणीनेंच निःसंदेह होऊन दत्तोबा एक सदाचरणी गृहस्थ म्हणून जगूं लागला!

दत्तगिरींकडे कसलीही ढोंगबाजी चालत नसे. जाणूनबुजून वेड पांघरणाऱ्यांच्या बाबतींत ते फारच कडकपणानें वागत. अपराधी माणूस कितीही बेडर वृत्तीचा असला तरी दत्तगिरींनीं सांगितलेल्या दंडशिक्षेचा अवमान करण्यास धजत नसे. १८८४ सालांत दत्तगिरींचा मुक्काम दोनतीन दिवस तेंडोलीस होता. तेवढ्या

---

१. स्वामी (वेंदोनारायण) श्रीमठ संस्था दाभोली ता. २५–१–३०

काळांत त्यांनीं शाळकरी मुलांकडून व गांवकऱ्यांकडून 'दत्त' भजन करविलें. नंतर नेरूर गांवास जाण्यास निघाले. थोडा रस्ता तोडल्यावर तेंडोलीच्या लोहाराचें घर लागलें. लोहाराच्या घरासमोर दत्तगिरींनीं तुळस लाविली व तेथेंच जरा विश्रांतीसाठीं बसले. इतक्यांत जवळच रहाणारा बापू जोशी, एक नारळ व हस्तलिखित पत्र घेऊन सामोरा आला. त्यानें दत्तागिरींना नमस्कार करून नारळ व पत्र त्यांच्या हातीं दिलें. पत्रांतील मजकूर असा. "दत्तगिरींनीं आज रोजीं जोश्यांच्या घरीं मुक्कामास रहावें अशी आज्ञा आहे. सही—वैकुंठवासी श्रीविष्णु." बापूचा खोडसाळ उपद्व्याप दत्तगिरींच्या तत्काळ लक्षांत आला. त्यांनीं बापूची खडसून तपासणी केली. बापूनें आपल्याला पत्र रस्त्यांत सांपडलें वगैरे खोटें सांगून स्वतःच्या बचावाचा प्रयत्न केला. परंतु शेवटीं स्वतःच चेष्टेनें तें पत्र लिहिल्याचें कबूल केलें. त्यावर ह्या अपराधाबद्दल बापूस दंड किती करावा, अशा चिठ्या घातल्या. दंड एक रुपया कीं अधिक, अशा चिठ्या टाकल्या आणि असें करतांकरतां जोश्याला पंधरा रुपये दंड कायम झाला.[१] दत्तगिरी बापूजवळ दंडाचे पंधरा रुपये मागूं लागले. पैसे जवळ नसल्यामुळें थोडा वेळ थांबल्यास आणून देतों असें बापू म्हणूं लागला. परंतु दत्तगिरी थांबण्यास तयार होईनात. तेवढ्यांत बापूची आई त्या ठिकाणीं आली होती, तिनें अंगावरचा दागिना काढून दिला. तो घेऊन दत्तगिरी नेरुरास निघून गेले. पुढें बापूनें पंधरा रुपये आणून दिले व दागिना सोडवून नेला. दत्तगिरींनीं ताबडतोब ते पंधरा रुपये खर्चून भंडारा केला व जमलेल्या सर्व मंडळीस जेवण घातलें.

बेळगांवचे नरहरी बाळकृष्ण पाटकर दत्तगिरींच्या भक्तजनांपैकीं एक होते. दत्तगिरींचा मुक्काम श्रीपादवाडीस असला कीं नरहरी नेहमीं त्यांच्याबरोबर असत. नरहरी पंधरासोळा वर्षांचे होते. इतर भक्तमंडळींमध्यें तेही होते. दत्तगिरी भोजन केल्यावर उरलेलें पान जपमाळेंत पाहून जवळच्या मंडळींपैकीं कोणाला तरी नांवानें हाकारीत व देत. श्रीपादवाडीवरील एका मुक्कामांत नरहरींना दोन्ही बाजूंना गालगुंडें झालीं होतीं. गालगुंडांच्या त्रासामुळें कांहींही ग्रहण करतां येत नसे. याचवेळीं प्रसाद घेण्यासाठीं म्हणून दत्तगिरींनीं

१. विष्णु नारायण प्रभू तेंडोलकर. ता. ३०–१२–२९

त्यांना पुकारलें. नरहरीला पाणीसुद्धां घोटण्याची मारामार. तेथें अन्न कसें खाणार? नरहरी तोंड चुकवूं लागला म्हणून दत्तगिरींनीं 'असें कां करतोस?' असें त्याला विचारलें. त्यावर नरहरींनीं गालगुंडानें विद्रूप झालेल्या तोंडानें स्वतःची दशा त्यांना दाखविली. त्यावर दत्तगिरी अधिकच संतापून ओरडले, "प्रसाद घेतोस, कीं एक भडकावूं?" आणि उत्तराची वाट न पाहातां एका गालफडांत त्यांनीं जोरानें लगावली. चुरचुरल्यामुळें नरहरीनें गाल चोळण्यासाठीं हात वर केला तों एक गालगुंड पार नाहींसें झाल्याचें समजलें. आश्चर्यचकित होऊन नरहरी तोंड वासून दत्तगिरींकडे बघूं लागला. त्यावर दत्तगिरी विशेष रागावले व त्यांनीं नरहरीच्या दुसऱ्याहि मुस्काडींत जोरानें ठेवून दिली. दुसरें गालगुंडहि तत्काळ नाहींसें झालें. नरहरीनें मोठ्या भक्तीनें प्रसाद ग्रहण केला. या घटनेच्या स्मरणानें नरहरी नेहमीं गहिंवरून जात असत.

श्री परशरामपंत लाड झारापीच्या जवळ कांबळी गांवीं धर्मशाळा बांधण्याच्या कामावर होते. दत्तगिरी जवळच साळगांवच्या आश्रमांत आले होते. परशरामपंत भाविक होते. त्यांना दत्तगिरींनीं पूजेसाठीं पादुका दिल्या होत्या. पादुकांची पूजा पंत मोठ्या आस्थेनें व भक्तीनें करीत असत. एकदां परशरामपंत कामानिमित्त बाहेरगांवीं गेले. परंतु जातेवेळीं धाकट्या बंधूला पादुकांच्या पूजेविषयीं बजावून गेले. बंधूनें कांहीं गोष्ट फारशी मनावर घेतली नाहीं. पूजा राहून गेली. दत्तगिरींनीं ही गोष्ट त्याचवेळीं जाणली. त्यांनीं ताबडतोब पालखी पाठवून पादुका साळगांवीं आणविल्या. परशरामपंत गांवाहून परतल्यावर पादुकांची हकिगत समजून फारच कष्टी झाले. लगेच साळगांवीं दत्तगिरी आले होते तेथें जाऊन अपराधाची क्षमा मागितली. दत्तगिरींनीं घडलेल्या अपराधाबद्दल दंड म्हणून दत्तमंदिरांत एक घंटा बांधण्यास सांगितली. परशरामपंतांनीं घंटा बांधली. परंतु पादुका कांहीं त्यांना परत मिळाल्या नाहींत.[१] पादुका असतांना परशरामपंत अतिशय सुखांत होते. पादुका परत गेल्यापासून त्यांच्या मनाची खिन्नता कांहीं केल्या जाईना.

परशरामपंत 'कॅसलरॉक'ला असतांना एकदां जवळच्याच 'गढई' या ठिकाणीं दत्तगिरी आले होते. त्या ठिकाणीं एक घुमटी असून आंत शंकराची पिंडी होती. घुमटीमध्यें दत्तगिरी समाधि लावून बसले. दर्शनासाठीं दूरवरची मंडळी येत

---

१. कृ. न. पाटकर. ठळकवाडी, ता. १८–१–२९

असे. परशरामपंतहि दर्शनास गेले होते. त्यावेळीं लोंढ्याजवळील हांसू गांवचे नारायण नार्वेकर व त्यांचे एक स्नेही मुकुंदराव हेही दर्शनासाठीं आले होते. नारायण नार्वेकरांना दत्तगिरींनीं लग्नासाठीं पैसे देऊन मदत केली होती. घुमटी-मध्यें दत्तगिरी समाधिस्थ होते. ते भानावर येण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. मंडळी बराच वेळ वाट पाहून थकली. शेवटीं सर्वांनीं दत्तगिरींना त्याच स्थितींत नमस्कार केला. नारायण नार्वेकर व मुकुंदराव परत केव्हांतरी येऊन दर्शन घेऊं, म्हणून जाण्यासाठीं निघाले. त्यांना जाऊन चारदोन मिनिटें होतात न होतात तोंच दत्तगिरींची समाधि उतरली. ते परशरामपंतांस म्हणाले, "अरे, ते मुकुंदराव व नारायण गेले काय रे? मला जरा झोंप लागली होती." दत्तगिरींचे ते शब्द ऐकून सर्वजण अगदीं स्तिमित झाले.

अशा तऱ्हेनें दत्तगिरींच्या मध्यें अलौकिक सामर्थ्य होतें याची प्रचीति अनेकवेळां आली. परंतु नुसतें सामर्थ्य असण्याला काय महत्त्व! दत्तगिरींनीं त्या सामर्थ्याचा लोकांना केवळ दिपविण्यासाठीं दुरुपयोग कधींहि केला नाहीं. किंवा 'अयं विशेषः' म्हणून ते लोकांचा तिरस्कार करून त्यांच्यापासून दूरहि गेले नाहींत. लोकांमध्यें राहून लौकिक आचारांवरच त्यांनीं जास्त भर दिला. संसृतीच्या उन्हाळ्यानें अनेकांच्या जीवनाचा सहारा होतो. अशा रंजलेल्या गांजलेल्या दुःखित जीवांच्या जीवनांत त्यांनीं ओलावा आणला. लोकांना सत्प्रवृत्त व उद्योगशील बनवून सर्वत्र जीवनाची उमेद पिकविली. अतिशय चंचल अशा मनाला आवरण्यासाठीं, ताळ्यावर आणण्यासाठीं, ज्याची ज्याची तयारी होती त्या प्रत्येकाच्या हातीं लगाम दिला—हरिनामाचा लगाम दिला!

पुष्प पांचवें

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न।

कर्तव्यपूर्ति व निर्वाण

दत्तगिरी परमयोगसंपन्न होऊन निवतीस परत आले तेव्हां ३१–३२ वर्षांचे होते. त्यानंतर आठदहा वर्षेंच काय तो त्यांचा अवतार राहिला. फारच थोडा काळ. परंतु त्या तेवढ्या अवधींत त्यांनीं बेळगांवपासून खालीं कारवारपर्यंत सर्वत्र सदाचाराचीं रोपटीं लावलीं. असंख्य कुटुंबें सुखी केलीं. त्या काळच्या एकेका कुटुंबांत २०–२५ माणसें असत. त्याशिवाय त्यांच्या आधारानें इतर श्रमजीवी लोक निर्वाह करीत असत. शिवाय ढोरें वासरें असायचींच. कुटुंब हें एक लहानसें राज्यच असे. अशा अनेक छोट्या राज्यांचें मिळून एक मोठें राज्य होतें. राज्य छोटें असो वा मोठें असो, त्यांना ग्रासणारे ग्रह सारखेच. या ग्रहांपासून सदुद्योगाच्या ढालीनें आपला बचाव कसा करावा हें दत्तगिरींनीं शिकविलें. त्यांनीं किती कुटुंबें सुखी केलीं याची कोणी मोजदाद केली नाहीं. आणि तसें करण्याची गरज तरी काय ? ज्या कामासाठीं दत्तगिरींचा अवतार होता तें काम कसलीहि अपेक्षा न करतां करीत रहाणें हेंच त्यांचें ध्येय असणार.

खानोली गांव तर दत्तगिरींची मातृभूमि. तीच त्यांची कर्मभूमीहि झाल्यामुळें तिला एखाद्या तपोभूमीचें स्वरूप प्राप्त झालें. आजकाल प्रत्येक वर्षीं झाडें लावण्याचे समारंभ होतात. त्याकाळीं असले समारंभ नव्हते. असते तरी त्यांनीं काय साध्य झालें असतें ? दत्तगिरी म्हणत कीं, जो झाड लावत नाहीं तो खेडूत नव्हे.

त्याला खेड्यांत राहण्याचा अधिकार काय? झाड लावायला स्वतःची जमीन नसेल तर सार्वजनिक वाटेवर पावसाच्या सुरुवातीस वडाचा डांब रोपावा. झाडें केवळ लावून भागत नसे. झाडांच्या संवर्धनावर दत्तगिरींचा फार कटाक्ष असे. आज खानोलीच्या सार्वजनिक वाटांवर पशुपक्ष्यांना आश्रयस्थान बनलेले जे वटवृक्ष दिसतात ते दत्तगिरींच्या पाऊणशें वर्षांपूर्वींच्या क्रियाशील वनमहोत्सवाचे निदर्शक आहेत.

वनस्पतींना संवेदना असतात ही गोष्ट दत्तगिरी पूर्ण जाणून होते. त्यांना जीवमात्राबद्दल फारच कळवळा होता. विनाकारण कोणी वेलीचें पान तोडलें तर त्यांना दुःख होत असे. शकुंतलेच्या प्रेमळ हृदयाचें वर्णन करतांना महाकवि कालिदास म्हणतो, 'नादत्ते प्रियमंडनापि भवतां स्नेहेन या पल्लवम्।' महात्मे जर प्रेममय नसतील तर ते महात्मे कसले? देवाला वहावयाचीं फुलें सुद्धां तोडून घेऊं नयेत असें दत्तगिरी म्हणत. ते स्वतः खालीं पडलेल्या फुलांनींच पूजा बांधीत असत.

स्वातंत्र्योत्तर काळांत आपल्याकडे सफाईसप्ताह होत असतात त्यांत प्रत्यक्ष सफाईपेक्षां गाजावाजा करण्याकडेच जास्त लक्ष दिलें जातें. दत्तगिरींनीं स्वच्छतेचें महत्त्व पूर्ण जाणलें होतें. पायरीपायरीनें सर्व आबालवृद्धांना त्यांनीं तें पटवून दिलें. अंतर्बाह्य स्वच्छ राहूं इच्छिणाऱ्यानें स्वतःचें घर प्रथमतः स्वच्छ ठेविलें पाहिजे. त्यानंतर अंगण, गोठा, आवार आणि मग घरासमोरील सार्वजनिक रस्ता. अशा तऱ्हेनें सदाचाराचा मार्ग उजळीत दत्तगिरी सर्वत्र फिरत असत. फिरल्याशिवाय नुसतें खुर्चीवर बसून निरीक्षण कसलें होणार? आणि फिरणें म्हणजे आम्ही चैनीसाठीं फिरतों तेंहि नव्हे. दत्तगिरी बहुतेक अनवाणी फिरत असत. ते स्वतः निरपेक्ष असल्यामुळें लोकांत त्यांचा दरारा फार होता. लोकांचीं मनें ते तत्काळ ओळखीत. ज्याचा जसा भाव तसें त्याला प्रत्यंतर येई. 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।' अशी त्यांची वागणूक होती. त्यांनीं उचलून कोणाला एक रुपया बक्षिस दिल्याचें ऐकिवांत नाहीं. परंतु संसारांत सुख मिळविण्यासाठीं सदुद्योगाची प्रेरणा आपल्याला दत्तगिरींच्या कृपेनें झाली असें कृतज्ञतापूर्वक सांगणारे अनेक आहेत. कपट धरून कोणी त्यांच्याकडे गेल्यास ते फसत नसत. उलट साध्याभोळ्या भाविक जनांचीं कामें ते आपण होऊन करीत. अथवा त्यांचीं कामें होतील असे योगायोग घडवून आणीत.

परमेश्वर सर्वसाक्षी, निराकार, निर्विकार असतांना त्याचें ध्यान करण्यास बाह्य साधनें कशाला, असें म्हणणारे प्रामाणिक लोक आहेत. त्यांच्या म्हणण्यांत तथ्यांशहि आहे. परंतु आम्हां सामान्य जनांची एक मोठी अडचण असते. निराकार, निर्विकार, सर्वव्यापी असा परमेश्वर आमच्या चर्मचक्षूंना कसा दिसावा! वायुवेगानें धांवणारें आमचें चंचल मन संसाराच्या प्रचंड गदारोळामध्यें स्थिर कसें राहावें? त्याला आवरण्यासाठीं आम्हांला बंधनें लागतात, साधनें लागतात. वारकऱ्यांना कटेवर हात घेऊन विटेवर उभा असणाऱ्या पांडुरंगाच्या दर्शनाशिवाय स्वस्थता लाभत नाहीं. रामदासांना धनुर्धारी, घनश्याम रामप्रभूची मूर्ति पाहिल्याशिवाय शांतता लाभत नाहीं. आम्हां सामान्यांना कांहींतरी भरीव, दृश्य साधनावांचून निव्वळ अवकाशामध्यें परमेश्वराचें स्वरूप पाहतांच येत नाहीं. म्हणूनच आम्हांला मूर्ति लागतात, मंदिरें लागतात, पादुका लागतात. किंवा दुसरें कांहीं तरी लागतें. तें मग कांहींही असो. शिखांप्रमाणें तो एक ग्रंथ असूं शकेल. ख्रिस्तबंधूंप्रमाणें क्रूसावर खिळ्यांनीं ठोकून मारलेल्या येशू ख्रिस्ताचें तें चित्र असूं शकेल. सामान्य जनांनीं सदाचारप्रवृत्त होण्यास अशीं भरीव साधनें लागतात ही गोष्ट दत्तगिरींनीं पूर्ण जाणली होती. विद्यार्जन पूर्ण झाल्यानंतर दत्तगिरी प्रथम चंदगडास आले. त्या ठिकाणीं त्यांनीं श्रीपादांच्या पादुका स्थापून एक मंदिर उभारलें ते केवळ एक लोकशिक्षणाचें साधन म्हणून. लोकांना सन्मार्गावर आणण्यास मदत म्हणून हा खटाटोप त्यांनीं केला. दत्तमय बनलेल्या दत्तगिरींना त्यांत दुसरें काय अभिप्रेत असणार?

जीवनांतील[१] प्रासंगिक घटनांना कलाटणी देऊन त्यांचा उपयोग लोकांना सत्प्रवृत्त बनविण्याकडे करण्याची विलक्षण हातोटी दत्तगिरींना साधली होती. १८८८–८९ सालांतली गोष्ट. दत्तगिरी कुडाळहून वेताळ बांबर्ड्यास जात होते. बांबर्ड्यांत श्री वेताळ देवालयाच्या जरा पुढें गेल्यावर, देवळाचे पुजारी श्रीधर आना पूजासाहित्यासकट समोरून येत होते. दत्तगिरींना समोर पाहून पुजाऱ्यांना काय वाटलें कुणास ठाऊक, त्यांनीं वेताळ देवाच्या पूजेसाठीं आणलेल्या पाण्यानें दत्तगिरींच्या चरणावर रस्त्यांतच अभिषेक केला! त्यावर दत्तगिरी उद्गारले कीं, हें पाणी फुकट गेलें. पुजारी फारच कष्टी झाले व त्या पाण्याची व्यर्थता काय

१. लक्ष्मण रघुनाथ आजगांवकर. २७–११–२५

केल्यानें दूर होईल म्हणून विनवूं लागले. दत्तगिरी म्हणाले, "या जागीं दोन दगड लाव. या स्थळाची रोज पूजा कर. या जागेचें नांव आजपासून 'सुस्थळ' असें राहील." एवढें बोलून दत्तगिरी निघून गेले. श्रीधर आनांनीं आज्ञेप्रमाणें केलें. 'सुस्थळाची' लहानशी इमारत उठली. श्रीधर आनांनीं हयातींत न चुकतां सुस्थळाची पूजाअर्चा केली. त्यांच्या पाश्चात्‌ही ती चालू आहे. श्री दत्तगिरींच्या प्रेरणेनें बनलेलें सुस्थळ लोकांना सत्प्रवृत्त करीत आजमितीस सुस्थितींत आहे.

सावंतवाडींतील साळगांव हें दत्तगिरींचें दुसरें आवडतें ठिकाण. त्यांतील खेरवाडी येथें आत्माराम झिले प्रभु खानोलकर यांच्याकडे दत्तगिरी प्रथम गेले. आत्माराम झिलेंच्या घरासमोर एक लहानसा मांगर होता. त्याचा दत्तगिरींचें वास्तव्य असलें म्हणजे लोक भजनासाठीं उपयोग करीत असत. याच मांगरांत दत्तगिरींनीं श्री दत्तांच्या पादुका स्थापन करून त्याला मंदिराचें स्वरूप दिलें. कांहीं दिवसांनीं लोकांकडून देणगी जमवून त्याच जागीं त्यांनीं पक्कें मंदिर बांधलें. सार्वजनिक पैशांतून मंदिर बांधल्यामुळें तें सार्वजनिक झालें. या देवस्थानची व्यवस्था ठेवण्यासाठीं दत्तगिरींनीं त्यांच्या भक्तमंडळींतून व्यवस्थापक नेमले. दत्तमंदिर झाल्यापासून खेरवाडीची दत्तवाडी झाली. त्या भागाला दत्तवाडी हेंच नांव आजतागायत चालू आहे. दत्तवाडींतील दत्तगिरींचा लवजमा पुढीलप्रमाणें होता.

नंबर	कामाचा हुद्दा	नांव
१	कारभारी	आत्मारा झिले प्रभु खानोलकर
२	चिटणीस	गोपाळ सखाराम प्रभु खानोलकर
३	छत्रधारी	विष्णु साळसकर (बांबर्डेकर)
४	महालदार	केशव रघुनाथ प्रभु खानोलकर
	महालदार	दादाजी अनंत प्रभु खानोलकर
५	गवई	आत्माराम भाने प्रभु खानोलकर
६	साथीदार	आत्माराम लाडे प्रभु खानोलकर
७	चवरीदार	रामचंद्र कान्होबा झारापकर
	,,	मुरारी रघुनाथ झारापकर

दत्तगिरींच्या भक्तमंडळींत गौड ब्राह्मण, सारस्वत, मराठे, कोळी, महार, चांभार, धनगर इ. सर्व समाजांचे लोक असत. त्या सर्वांना कसलाही भेदभाव न करतां इहलोकीं सुखशांति लाभावी म्हणून दत्तगिरींचे प्रयत्न चालू असत. प्रेमळ भक्ताच्या व्यथित अंतःकरणाचें स्पंदन त्यांना दुरूनच जाणवत असे. दत्तवाडींत श्रीमती अनसूयाबाई नांवाची पंचाहत्तर वर्षांची एक गरीब परंतु भाविक वृद्धा होती. दत्तगिरी वाडीवर असले म्हणजे ती वृद्धा त्यांचें दुरूनच दर्शन घेऊन धन्य होत असे. जवळ जावें, दत्तगिरींना डोळे भरून पहावें, असें तिला फार वाटे. परंतु पुन्हां वाटे, 'आपण गरीब, अजागळ, अपंग, आपण जवळ गेलों तर कोणाला काय वाटेल!' एकदां कोरांटीच्या फुलांचा हार करून महाराजांच्या गळ्यांत घालून त्यांना नमस्कार करावा अशी वृद्धेला फार प्रबळ इच्छा झाली. त्याप्रमाणें तिनें फुलें जमवून हार केला. परंतु पुढचा बेत अंमलांत आणण्याचे वेळीं तिचें धैर्य गळल्यासारखें झालें. तिनें हार आपल्या झोपड्यांत खुंट्याला लावला आणि अस्वस्थ चित्तानें स्वतःशींच म्हणते, "म्हाराज सगळयांकडे जातत. मी गरीब. माज्या मेलीच्या खोपींत कित्याक येतीत? त्येंका परसाकडे बसाकसुद्धां माझी खोप पसंत पडाची नाय!"

अशा तऱ्हेनें विचारचक्रांत सांपडल्यामुळें रात्रीचे दहा केव्हां वाजले ते सुद्धां म्हातारीच्या लक्षांत आलें नाहीं. फुलांचा हार खुंटीवर तसाच राहिला. नेहमींप्रमाणें दुरूनचें तरी दर्शन घ्यावें म्हणून वृद्धा घाईघाईनें झोंपडींतून बाहेर पडली. दत्तमंदिरांत यावेळीं भजनाचा कडाका चालू होता. भजन ऐन रंगांत आलें असतां दत्तगिरी अचानक उठले व आपणास जोरांत शौचाला लागली असें म्हणाले. जपमाळेंत पाहिल्यासारखें करून पुढें म्हणाले कीं आत्तां श्रीमती अनसूयाबाईच्या झोपडींत शौचास जाण्याची आज्ञा आहे. मंडळींना जरा चमत्कारिक वाटूं लागलें. म्हणून चिठ्या टाकण्यासाठीं चिटणिसास (गोपाळ सखाराम प्रभु) आज्ञा केली. तशाच अर्थाची चिठी आली. तेवढ्यांत अनसूयाबाई मंदिराच्या जवळपास आली होती. तिला ही शौचास जाण्याबद्दलची बातमी समजली. स्वतःच्या मनांत आलेले विचार दत्तगिरींना समजले म्हणून तिला विस्मय तर वाटलाच. परंतु आपले विचार अतिशय गलिच्छ होते हें आठवून ती फार खजील झाली. ती त्याच जागीं खिळून पडली. दत्तगिरी तेवढ्यांत तेथें आलेच. वृद्धेला स्वहस्तें उठवून ते तिच्याबरोबर तिच्या झोपडींत गेले. तिचा

भोळा भाव पाहून दत्तगिरींनीं कोरांटीच्या फुलांची माळा तिच्याकडून गळ्यांत धारण केली ! यःकश्चित् वृद्धा ती ! पिकलें पान झाली होती. आयुष्य थोडें बाकी होतें. तरीहि तिच्या आनंदासाठीं दत्तगिरी भर भजनांतून उठून गेले. बाईचें उर्वरित आयुष्य अत्यंत समाधानांत जाऊन ती सद्गतीस गेली.

दत्तगिरींच्या काळांत जातिभेद फार कसोशीनें पाळला जाई. सवर्ण हिंदू मंदिरांत जाऊन दत्तगिरींचें दर्शन घेत असत. परंतु महार, मांग इ० अस्पृष्टांना दुरूनच दर्शन घ्यावें लागे. दत्तवाडीपासून थोड्याच अंतरावर महारवाडा होता. शें–पन्नास घरें होतीं. दत्तगिरींबद्दल महारांना आदर वाटत असे. परंतु त्यांचा जवळून संबंध न आल्याकारणानें दत्तगिरींना त्यांच्यावर सुसंस्कार करण्यास संधीच मिळत नसे. सामाजिक विषमतेमुळें इतके लोक अज्ञानांत आणि घाणींत पशूपेक्षांहि हीन जिणें कंठतांना पाहून दत्तगिरींचें मन व्याकूळ झालें. अस्पृष्टांचे हाल वर्णन करण्याच्या कोटींतील नव्हत हें सर्व सुज्ञ जाणतात. परंतु अतिशय उद्वेगजनक गोष्ट म्हणजे मानवकोटींतील असूनहि आपण मानव आहोंत ही त्यांची जाणीवच मुळीं बुजली होती. महारवाड्यांत म्हारगिऱ्याची (महारांचा देव) देवळी होती. सवर्ण हिंदू तेथें जात नसतात. साळगांवच्या एका मुक्कामांत दत्तगिरी दत्तमंदिरांतून उठले ते थेट महारांच्या देवळींत जाऊन बसले. महारवाड्यांतील जवळजवळ सर्व मंडळी देवळीपाशीं जमली. ढोल, ताशे, नगारे वाजूं लागले. भजन सुरू झालें. सर्वांनीं 'दत्त गुरु जय दत्त' म्हणण्यास सुरुवात केली. भजन आटोपल्यावर सर्व महारांस स्वतःच्या दारासमोर तुळस लावण्यास सांगून दत्तगिरी दत्तवाडीवर परतले.

या गोष्टीस ८–१० दिवस झाल्यावर दत्तगिरी मृगाच्या दिवशीं[१] पुन्हां महारवाड्यास जाऊन पहातात तों एकाहि दारासमोर तुळस नव्हती. दत्तगिरींना त्याचें आश्चर्य वाटलें नाहीं. उलट अतिशय खेद झाला. हजारों वर्षें संस्कारहीन दशेंत गेलेल्या समाजाची उन्नति अशी चुटकीसरशी कशी होईल ? स्वतःचा उत्कर्ष कसा साधावा हें त्या अभागी जीवांना कळावेंच कसें ! म्हणूनच त्यांच्या उद्धाराचा मार्ग दत्तगिरींसारख्या संतजनांना आपणहून शोधावा लागतो. कधीं धाकदपटशा दाखवून, तर कधीं प्रेमानें, क्वचित् प्रसंगीं चमत्कृतीनें त्यांना

१. गोपाळ सखाराम प्रभू, खानोलकर, साळगांव. नोव्हेंबर १९२९.

सन्मार्गावर आणावें लागतें. दत्तगिरींनीं सर्व महारांना हाक मारली. हाकेसरशीं सर्व जमा झाले. मृगाचा पाऊस सुरू झाला होता. अत्यंत क्रुद्ध झालेले दत्तगिरी जणुं काय आग ओकीत आहेत असें महारांना भासलें. ते गर्जना करून म्हणाले, "म्हारांनु, तुमचो उन्मत्तपणा जाणा नाय. ह्या पावसांत तुमचो वाडो जळान् खाक जायत!" इतकें बोलल्यावर दत्तगिरी दत्तवाडीस मागें परतले. त्यांची पाठ फिरतांच एकाएकीं महारवाड्याला आग लागली. कशी लागली, कोणी लावली पांडुरंग जाणे. पाऊस थोडथोडा पडतच होता. परंतु करडानें शाकारलेलीं महारांचीं झोपडीं जळून जाण्यास फार वेळ लागला नाहीं. महारांची सर्व चीजवस्त जळून रक्षा झाली. पोरेंथोरें आतां या पाऊसकाळांत घरांशिवाय कसें होईल म्हणून रडून आकांत करूं लागलीं. भर पावसांत आग लागते काय आणि सबंध महारवाडा जळून अनर्थ होतो काय! फारच विलक्षण गोष्ट! दत्तवाडीवर या अनर्थाची बातमी कळण्याची शक्यताच नव्हती. दत्तगिरी वाडीवर परत येऊन त्यांनीं आगीची बातमी लोकांना सांगितली व लगेच पांडुरंग फकरे प्रभु खानोलकर यांना महारांच्या आपत्तीबद्दल अर्ज देऊन श्रीमंत सरकार बाबासाहेब सावंतवाडीकर यांजकडे पाठविलें. बाबासाहेबांनीं अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार केला व महारांना पक्कीं घरें बांधण्यासाठीं लागणारें लाकुडसामान साळगांवच्या सरकारी जंगलांतून मोफत नेण्याचा हुकूम केला. तसेंच गांवपुढाऱ्यांना बोलावून साळगांवच्या रयतेकडून पट्टी गोळा केली व त्या पैशांतून महारांच्या घरांना लागणारीं कौलें पुरविलीं गेलीं. अशा तऱ्हेनें महारांची गलिच्छ वस्ती नाहींशी होऊन त्यांच्या पूर्वीच्या चंद्रमौळी झोपड्यांच्या ऐवजी त्यांना मजबूत कौलारू घरें रहावयास दिलीं. आठ दिवसांत महारवाड्याचा असा हा कायापालट झाला. संस्थानच्या कारभारांत इतक्या झटपट झालेलें लोककल्याणाचें काम हें पहिलेंच असावें. साळगांवांतील इतर सवर्ण हिंदूंना महारांबद्दल आपुलकी वाटूं लागली व त्यांनीं महारांच्या उत्कर्षाला आनंदानें हातभार लावला.

योगविद्यासंपन्न होऊन दत्तगिरी कोंकणांत आले तेव्हां त्यांच्या ठिकाणीं प्रकट झालेलें दिव्य तेज पाहून व त्यांचें लोकोत्तर सामर्थ्य पाहून पुष्कळ लोक त्यांच्या भजनीं लागले हें आपण मागेंच पाहिलें. प्रत्यहीं त्यांच्याबद्दलचा आदर व श्रद्धा वाढत गेल्यामुळें अनेक ठिकाणीं भोजनादिकांचा अतिशय आग्रह होऊं लागला. भोजन घेण्याचे वेळीं दत्तगिरी जपमाळेंत पाहून अनुकूल किंवा प्रतिकूल उत्तर

देत. बहुधा प्रतिकूल उत्तर आल्यामुळें अनेक सद्भावी लोक नाराज होऊं लागले. अशा भाविक लोकांची खिन्नता पाहून दत्तगिरींना दुःख होऊं लागलें. त्यावर उपाय म्हणून त्यांनीं चिठ्या टाकण्याची पद्धत सुरू केली. त्यांत प्रत्यक्ष देवास चिठी घालून अनुकूल किंवा प्रतिकूल उत्तर येई त्याप्रमाणें ते वागत असत. कुठल्याही गोष्टीला दोन चिठ्या लागत. एका चिठ्ठींत अमुक गोष्ट करावी असें लिहीत. व दुसऱ्या चिठ्ठींत तीच गोष्ट तहकूब करावी असें लिहीत. श्रीपाद वाडींतील देवस्थानच्या कागदपत्रांत कांहीं प्रत्यक्ष काढलेल्या चिठ्या जपून ठेविलेल्या सांपडल्या. त्यांचे ठसे खालीं दिले आहेत :—

दत्तगिरींना अंतःप्रेरणेनें एखादी गोष्ट करावी किंवा करूं नये तें कळत असे. तथापि श्रद्धाळु लोकांची समजूत पटण्यास चिठीचा उपयोग चांगला होऊं लागला.

एकदां कै. श्री आत्माराम दाजी तथा भाऊ नाईक प्रभु खानोलकर झारापीला मावशीकडे गेले होते. ते घरीं आवेऱ्यास (खानोली) येण्यास निघाले असतां मावशीनें नारळाचीं दोन कापें कागदांत बांधून बरोबर दिलीं. कापांची पुरचुंडी उपरण्यांत गुंडाळून भाऊ वाटेला लागले तों कुठूनशी दत्तगिरींची स्वारी दत्त म्हणून समोर उभी! दत्तगिरी भाऊंना 'गुरु' म्हणत असत. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. दोनप्रहरचा वेळ होता. भाऊजवळ मावशीनें दिलेली कापांची पुडी होती. भाऊ दत्तगिरींना म्हणाले, "महाराज, आतां जरा फराळ करा." दत्तगिरी म्हणाले, "दत्ताची आज्ञा झाली तर करीन." ताबडतोब चिठ्या टाकल्या. फराळ करण्याबद्दल चिठ्ठी आली. भाऊंनीं पुडी दत्तगिरींच्या हातांत ठेवली. त्याबरोबर दत्तगिरींनीं पुरचुंडी सोडून कापें भसकण्यास सुरुवात केली. आपल्याला एखाद तरी तुकडा मिळेल म्हणून भाऊ दत्तगिरींच्या तोंडाकडे आशेनें बघत राहिले. परंतु दत्तगिरींनीं कागद अगदीं पुसून स्वच्छ केला. आणि शेवटीं त्या कागदाची पुरचुंडी करून ती भाऊंना देत म्हणाले, "गुरु, हा घे तुला. हा तुला, तुझ्या मुलांना, नातवांना पुरून उरेल." इतकें बोलून दत्तगिरी विरुद्ध दिशेला तोंड करून चालूं लागले सुद्धां. भाऊंनीं ती पुरचुंडी तशीच जपून घरीं आणली. त्यांत कांहीं नसणार याबद्दल खात्रीच होती. तरीपण त्यांनीं ती जपून उघडली. आंत कागदाला चिकटलेले थोडे कापाचे कण दृष्टीस पडले. भाऊंनीं ते कण वेंचून घरांतील मंडळींस देण्यास

सुरुवात केली. तों सर्वांना पुरतील इतके कण निघाले ! भाऊची मूळ स्थिति अगदीं अठरा विश्वें दारिद्र्याची होती. नंतर आस्तेआस्ते त्यांच्या घराण्याची भरभराट झाली. भाऊंच्या मुलांनातवंडांना दत्तगिरींच्या कृपाप्रसादानें चांगली बरकत आली.

दत्तगिरींना कधींकधीं दुसऱ्यांच्या कडेवर बसण्याची लहर येत असे. आत्माराम झिले प्रभु खानोलकर यांचा पुतण्या रामभाऊ १५--१६ वर्षांचा होता. दत्तगिरी ३५--३६ वर्षांचे होते.[1] रामभाऊंनीं अनेक वेळां दत्तगिरींना कडेवर घेतलें होतें. कडेवर घेतांना दत्तगिरी एखाद्या लहान बाळाप्रमाणें हलके लागत. परंतु कांहीं वेळानें कडेवरून खालीं ठेवल्यावर एखादें जड ओझें अंगावरून खालीं उतरावें तसें वाटे. रामभाऊंनीं आणखी पुष्कळ चमत्कार अनुभवले होते. एकदां दत्तगिरी साळगांवास होते. दत्तवाडीवर श्रीगुरुद्वादशीचा उत्सव प्राप्त झाला. समाराधनेच्या वेळीं जेमतेम ६०-७० मंडळीस पुरेल इतकें अन्न शिजवून तयार केलें होतें. नैवेद्य वगैरे विधि आटोपल्यावर भोजनास बसण्याच्या वेळीं दत्तगिरींनीं स्वतःची छाटी उदकाभिमंत्रित करून मंडळीकडे दिली व त्या सिद्ध झालेल्या अन्नावर टाकण्यास सांगितली. त्याप्रमाणें करण्यांत आलें व तेवढ्याच सिद्धान्नांत तीन चारशें मंडळी यथेच्छ जेवून तृप्त झाली. रामभाऊंच्या (रामचंद्र लक्ष्मण प्रभु खानोलकर) जीवनांत त्यांचेवर अनेक खडतर प्रसंग आले त्या सर्वांतून ते अब्रूनें बचावले. दत्तगिरींच्या कृपेनें रामभाऊंचीं मुलेंबाळें नांवारूपाला येऊन घराण्याची भरभराट झाली.

खानोली देवस्थानांत महाशिवरात्रीचा उत्सव दरवर्षी फार मोठ्या प्रमाणावर होत असतो. पोटापाण्यासाठीं दूरवर पसरलेले खानोलकर या शिवरात्रीच्या उत्सवाला उपस्थित राहण्यास आतुर असतात. जत्रा फार मोठी भरते. दत्तगिरी एकदां शिवरात्रीच्या उत्सवाला आले होते. प्रत्यक्ष उत्सवास सुरुवात होण्यापूर्वी जवळच्या आंबेसवाडींत कुळाच्या देवळींत नारळ ठेवून गाऱ्हाणें करण्याची प्रथा आहे. दत्तगिरी कुळाच्या देवळीकडे दर्शनासाठीं निघाले होते. आंबेसवाडींतील बरीच मंडळी त्यांच्या समवेत भजन करीत चालली होती. देवळीपासून थोड्याच अंतरावर श्री. रामकृष्ण रघुनाथ प्रभु खानोलकर यांचें घर

---

१. रामचंद्र लक्ष्मण प्रभु खानोलकर, खानोली. ता. २७–११–२९.

आहे.[1] त्यांची चुलत बहीण धोंडूबाई वायंगणकरीण सुमारें १७--१८ वर्षांची होती. तिनें पुढें जाऊन दत्तगिरींना कडेवर घेतलें. सुमारें १ फर्लांग अंतर धोंडूबाईनीं दत्तगिरींना कडेवरून घरापाशीं आणलें. रामकृष्णाचे चुलत बंधु रघुनाथ देवराव यांनीं दत्तगिरींना रात्रौ भोजन करण्याचा आग्रह केला. दत्तगिरींनीं माळेंत पाहून अनुकूलता दर्शविली व रघुनाथभाऊंस स्वतः भरविण्यास सांगितलें. भोजन आटोपल्यानंतर रात्रौ सर्व मंडळी देवळाकडे शिवरात्रीच्या जत्रेस गेली. परंतु दत्तगिरी कुठें गेले कोणास समजलें नाहीं. श्री रामकृष्ण खानोलकर व दत्तगिरींना भरविणारे रघुनाथ देवराव यांची पुढें चांगलीच भरभराट झाली. दत्तगिरींशीं संबंध आलेल्या निष्कपट जनांना अथवा त्यांच्या वंशजांना बरकत आली नाहीं असें एकहि उदाहरण आढळत नाहीं.

कोणावरहि अनुग्रह करण्यापूर्वी दत्तगिरी त्या माणसाची पूर्ण कसोटी पहात असत. श्री केशव व्यंकटेश पाटील पाटाच्या प्राथमिक सरकारी शाळेंत मास्तर होते. दत्तगिरींवर त्यांची फार श्रद्धा. शाळा माउलीच्या देवळाच्या माडीवर भरत असे. एकदां चैत्र महिन्यांत सकाळीं नऊच्या सुमारास दत्तगिरी माउलीच्या देवळाच्या मागचे बाजूस येऊन उभे राहिले. इतक्यांत एकीची (लघवी) सुटी झाल्यामुळें शाळेंतील मुलें इतस्ततः फिरूं लागलीं. त्यांना दत्तगिरींनीं "केसगो मास्तर साळेंत आसा काय रे ?" म्हणून विचारलें. मुलांनीं ती हकिकत जाऊन केशवमास्तरनां सांगितली. परंतु त्या वेळीं वेंगुर्ल्याचे मामलेदार व सावंतवाडी संस्थानचे कारभारी तेथें आले असल्यामुळें केशवमास्तरांना दत्तगिरींकडे लगेच्च जातां आलें नाहीं. दत्तगिरी थोडा वेळ देवळाच्या मागें थांबले. पण नंतर जवळच असलेल्या हरि रामचंद्र प्रभु मतकरी यांचे घराचे एका खोलींत दार बंद करून बसून राहिले. केशवमास्तर शाळेचें काम संपवून तेथें आले. तों दार बंद असल्यामुळें स्नान वगैरे आटोपून परत यावें म्हणून बिऱ्हाडीं आले. परत येतात तों दत्तगिरी कोचऱ्यास गेले होते. मास्तरांनीं दत्तगिरींना प्रार्थना करून बिऱ्हाडीं आणण्यासाठीं कोचऱ्यास इसम पाठविला. तो इसम कोचऱ्यास पोहोंचला त्यावेळीं दत्तगिरी केळसास गेले होते. तो केळसास जातो तर दत्तगिरी वेंगुर्ल्यास गेल्याचें समजलें. निरोप्या घाईघाईनें वेंगुर्ल्यास जातो तर त्याला दत्तगिरी बैलगाडी

१. रामकृष्ण रघुनाथ प्रभु खानोलकर, बेळगांव. ता. ६-११-३१.

करून वेळगांवास गेल्याचें समजलें. झाल्या प्रकारानें केशव पाटलांना फारच खिन्नता वाटली. त्यांनीं दत्तगिरींची मनोमन प्रार्थना केली. जाणूनबुजून त्यांनीं हयगय केली नव्हती. केशव पाटलांची अशी ही परीक्षा घेतल्यानंतर त्याच वर्षी आषाढ महिन्यांत दत्तगिरींनीं मास्तरांच्या बिऱ्हाडीं एक महिना मुक्काम केला. त्या अवधींत मास्तरांच्या सर्व शंकांचें निरसन होऊन [1] त्यांचें शिल्लक आयुष्य अतिशय सुखासमाधानांत गेलें.

साळगांवपासून कांहीं मैलांवर असलेल्या वेताळबांबर्डे या गांवीं दत्तगिरींनीं एकदां बराच काळपर्यंत मुक्काम केला होता. त्या वेळीं नाना बांबर्डेकर व घाटे मास्तर यांच्या पुरस्कारामुळें अनेक ठिकाणीं भजनसप्ताह झाले. घाटे मास्तरांच्या शाळेंतील मुलांकडून दत्तगिरींनीं भजनसप्ताह सुरू केला. शाळेच्या कामांत थोडा अडथळा आला. घाटे मास्तरांच्या वाइटावर असणारी कांहीं मंडळी होती. त्यांना आयती संधि मिळाली. दुष्टबुद्धीनें त्यांनीं वाडीसंस्थानचे शाळाअधिकारी रा. अनंत बाळकृष्ण कंटक यांजकडे घाटेमास्तरांच्या गैरवर्तनाबद्दल तिखटमीठ लावून तक्रारअर्ज केला व मास्तरांना ताबडतोब कडक शासन व्हावें म्हणून विनंती केली. घाटे मास्तरांची आतां भली खोड मोडेल म्हणून ती दावेदार मंडळी आनंदांत होती. परंतु कुठून कशी किल्ली फिरली कोण जाणे ! [2] अर्जाचा परिणाम अगदींच अनपेक्षित झाला. मास्तरांना शिक्षा करून भजनसप्ताह बंद पाडण्याऐवजीं कंटक साहेबांनीं त्या शाळेला ७ दिवस सुट्टी जाहीर केली आणि घाटे मास्तरांनीं स्वतः लक्ष घालून दत्तगिरींनीं सुरू केलेला भजनसप्ताह शेवटास न्यावा म्हणून आग्रहाची सूचना केली. या उलट्या प्रकारामुळें दावेदार हात चोळीत बसले !

श्रीपादवाडी (चंदगड) व दत्तवाडी (साळगांव) येथील मंदिरांखेरीज अंकोला (कारवार) येथें दत्तगिरींनीं एक लहानसें दत्तमंदिर स्थापन केलें होतें. कारवारच्या भागांत ते पुष्कळदां जात असत. विशेषतः हसु, हल्याळ, गोकर्णमहाबळेश्वर वगैरे ठिकाणीं त्यांचा संचार असे. प्रत्येक ठिकाणीं त्यांचे अनेक चहाते होते. दत्तगिरींना सूक्ष्म देह धारण करून अवकाशांतून गमन करतां येत असे. ते आतां इथें आहेत

---

१. केशव व्यंकटेश पाटील. पिंगुळी. ता. २६–११–२८

२. दत्तात्रय भानु सामंत बांबर्डेकर, वेताळ बांबर्डे. ता. १८–८–३०

तर दुसऱ्याच क्षणीं अनेक मैल दूर असलेल्या ठिकाणीं गेल्याचें दिसून येई. या ग्रंथाच्या प्रथम पुष्पांत कोंडुऱ्याच्या भुयाराचा उल्लेख आलेला आहे. भुयारापासून जवळच कोंडुऱ्याच्या वेळेवर (किनाऱ्यावर) श्रीहरिचरणगिरींनीं स्थापन केलेलें एक लहानसें[1] लिंगाचें देऊळ आहे. एकदां महाशिवरात्रीनिमित्त दत्तगिरी गोकर्णक्षेत्रीं गेले होते हें खानोलींतील सर्वांना माहीत होतें. शिवरात्रीच्या दिवशीं दोन प्रहरीं कांहीं मच्छिमार लोकांनीं दत्तगिरींना कोंडुऱ्याच्या लिंगाला प्रदक्षिणा घालीत असतांना पाहिलें व आश्चर्य वाटून दत्तगिरी गोकर्णाहून आले किंवा काय हें समजून घेण्यासाठीं त्यांनीं माहितगार माणसांकडे चौकशी केली. तों दत्तगिरी खानोलीस आले नसून गोकर्णासच होते याची सर्वांनीं खात्री करून घेतली.

दत्तगिरी सिद्धावस्थेस पोहोंचलेले परमहंस महायोगी होते. सामान्य माणसा-प्रमाणें नैसर्गिक गरजांचा त्यांच्यावर पगडा नव्हता. कधीं कधीं पद्मासन घालून अनेक दिवस कांहीं हालचाल न करतां ते समाधिसुखांत रंगून जात असत. त्या वेळीं क्षुधेचा, निद्रेचा किंवा शरीरताटस्थ्याचा त्यां यावर कांहींच परिणाम होत नसे. दत्तगिरींच्या भक्तांपैकीं एक कै.[2] श्री. रामचंद्र कान्होबा झारापकर यांना त्यांचा बराच सहवास लाभल्यामुळें त्यांनीं दत्तगिरींना समाधिअवस्थेंत अनेक वेळां पाहिलें होतें. त्या वेळीं झारापकर दत्तगिरी पुन्हां भानावर येतात कीं नाहीं असें वाटून भयभीत होत असत. सन १८८८ च्या अश्विन वद्य ११ ला श्री रामचंद्र झारापकर व रघुनाथ भिसाजी पोतकर (तेंडुलकर) बेळगांवला जाण्यासाठीं वेंगुर्ल्याहून बोटीनें गोव्यांतील मुरगांव बंदरावर उतरले. गांवांत कोठेंतरी मुक्काम करण्याच्या इराद्यानें चालूं लागले तों दत्तगिरींची स्वारी समोरून येतांना दिसली. सावंतवाडीचे रामचंद्र पुरुषोत्तम सबनीस मुरगांवला रेल्वेमध्यें हेड अकाउंटंट होते. ते व आणखी कांहीं रेल्वे कामगार दत्तगिरींबरोबर सहल करीत धक्क्याकडेच निघाले होते. झारापकर व पोतकर दोघेहि दत्तगिरींच्या प्रेमांतील होते. दत्त-गिरींनीं त्यांचें कुशल विचारलें. दोघांनींही दत्तगिरींच्या चरणांवर लोटांगण घातलें. सर्वजण आनंदित होत्साते सबनीसांच्या बिऱ्हाडीं पोंहोंचले. तेथेंच दत्तगिरींचा मुक्काम होता.

---

१. रघुनाथ देवराव प्रभु खानोलकर, खानोली ता. ९–१२–२८.

२. रामचंद्र कान्होबा प्रभु झारापकर, झारापी ता. ३–११–२९.

रामभाऊ सब्नीसांची विधवा आई फार सात्विक व भाविक बाई होती. तिनें सर्वांची भक्तिपूर्वक बोळवण केली. श्री गुरुद्वादशीच्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां दत्तगिरी पद्मासन घालून समाधिसुखांत रंगून गेले. व्याघ्रचर्मासनावर अर्धोन्मीलित खेचरी दृष्टीनें ब्रह्मसाम्राज्यांत दंग झालेली दत्तगिरींची सुहास्य मुद्रा अवलोकन करून सर्वांचें भान हरपलें. ज्ञानेश्वर महाराज त्या अवस्थेचें यथायोग्य वर्णन करतात. (वरचिलें पातीं न ढळती । तळींची तळीं पुंजाळती ॥ तेथ अर्धोन्मिलित स्थिती । उपजे तया ॥ दिठी राहोनि आतुले कडे । बाहेर पाउल घाली कोडें ॥ ते ठायीं ठावो पडे । नासाग्रपीठीं ॥) (ज्ञा. ६·२०४) याप्रमाणें समाधिसुखांत दत्तगिरी बावन्न तास राहिले. या कालांत रामभाऊंची साध्वी आई अनेक स्वादिष्ट पदार्थ तयार करून महाराज आतां भानावर येतील, थोड्या वेळानें येतील म्हणून वाट पहात बसली होती. तिनेंहि महाराजांनीं अन्न सेवन केल्याशिवाय आपण न करण्याचा निश्चय केला होता. केवळ पाणी पिऊन राहिली. नरकचतुर्दशीचे दिवशीं तरी महाराज पूर्ववत् होऊन पोह्यांचा फराळ करतील ह्या आशेनें फराळ तयार ठेवून ती वाट पाहूं लागली. शेवटीं त्या दिवशीं दुपारीं दोन वाजतां दत्तगिरींची समाधि उतरली. हा वेळपर्यंत कोणीही फराळ केला नव्हता. दत्तगिरींना फराळाचा आग्रह झाला तेव्हां चिठ्या टाकण्यांत आल्या. त्यांत तहकुबीची चिठी आली. नाइलाजानें इतर सर्व मंडळी फराळास बसली. फराळाच्या धांदलींत रामभाऊंच्या ध्यानांत येण्यापूर्वींच दत्तगिरी झारापकर व पोतकर यांच्यासह रेल्वेस्टेशनवर गेले. थोड्याच वेळांत रामभाऊ धापा टाकीत आले व दत्तगिरींना बिऱ्हाडीं चलण्याविषयीं प्रार्थना करूं लागले. परंतु आपणांस हुकूम नसल्यामुळें तसें करतां येत नाहीं व रामभाऊंनीं वाईट वाटून घेऊं नये असें सांगून दत्तगिरींनीं रामभाऊंची पुष्कळ समजूत घातली. रामभाऊंचा नाइलाज झाला. दत्तगिरी कोठें जाणार हें माहीत नसल्यामुळें त्यांना नरसोबाचे वाडीस जावयाचें असेल असें वाटून रामभाऊंनीं मिरजेच्या तीन तिकिटी काढून झारापकरांच्या स्वाधीन केल्या व दत्तगिरींना नमस्कार करून ते बिऱ्हाडीं परतले.

गाडी चालूं झाली. ती मडगांव स्टेशनांत शिरतांच दत्तगिरी अनुयायांसह खालीं उतरले. तेथें अनेक भाविक लोक जमले. भोजनादिकांचा आग्रह पुष्कळ झाला. परंतु तेथें न थांबतां दत्तगिरी तसेच पुढें गेले व रात्रौ ८-९ वाजतां

रायबंदरला पोहोंचले. तेथून होडींतून दुभीटला गेले. व नंतर रात्रौ दहाचे सुमारास म्हाडदोळ येथें जाऊन त्यांनीं म्हाळसादेवीचें दर्शन घेतलें. तेथून पुढें रात्रौ बाराचे सुमारास कवळे येथील श्री शांतादुर्गा देवीचे मंदिरांत पोहोंचले. देवालयाचा सभामंडप प्रशस्त असून मध्यभागीं मोठे खांब आहेत. महापूजा बांधलेल्या शांतादुर्गादेवीचें दर्शन घेतल्यावर दत्तगिरी सभामंडपांतील एका खांबाच्या मुळाशीं ध्यानस्थ बसले. पोतकरांनीं त्यांच्यावर छत्र धरलें व झारापकर चवरी ढाळूं लागले. दोघेहि 'दत्तगुरू जय दत्त' असा घोष करीत होते. इतक्यांत देवस्थानची कारभारी मंडळी तेथें आली. देवीच्या मंदिरांत बोलून चालून एका गोसावड्यावर छत्रचामर पाहून कारभाऱ्यांत कुजबुज सुरू झाली. त्यांच्या मनांत आलेला विकल्प दत्तगिरींनीं तत्काळ जाणला. कारभाऱ्यांना त्यांनीं खुणावून जवळ बोलाविलें व ज्या खांबाच्या मुळांत ते बसले होते त्याच्या वरच्या भागावर श्री दत्तमहाराजांचें कोरलेलें सुंदर व भव्य चित्र त्यांना पाहण्यास सांगितलें. कारभाऱ्यांना फार अचंबा वाटला. सभामंडपांतील खांबावर कसलेंच चित्र नसल्याचें त्यांना पूर्ण ठाऊक होतें आणि आतां तर छत्रचामर चित्रांतील दत्तमहाराजांवर दिसूं लागलें. चित्रांतील दत्तमहाराजांच्या पायाशीं कारभाऱ्यांना दत्तगिरींची छबी दिसूं लागली. दत्तगिरींच्या अलौकिकत्वाची कारभाऱ्यांना खात्री पटली. त्यांची खरी ओळख पटली. कारभाऱ्यांनीं दत्तगिरींसमोर लोटांगण घातलें व फराळ करण्याचा अनुग्रह करावा म्हणून त्यांनीं प्रार्थना केली. परंतु अनुकूल आज्ञा न मिळाल्यामुळें दत्तगिरी तसेच पुढें निघाले व रात्रौ दीडचे सुमारास मंगेशीला श्री मंगेश मंदिराकडे पोंहोंचले. मंदिराचे दरवाजे रात्रौ १२ पासून पहांटे चार वाजेपर्यंत बंद ठेवण्याचा प्रघात आहे. दत्तगिरी अनुयायांसह मंदिराच्या जवळ येतांच मुख्य दरवाजा उघडला गेला. आंत जाऊन सर्वांनीं श्री मंगेश महारुद्राचें दर्शन घेतलें. दत्तगिरींनीं देवापुढें कांहीं करुणाष्टकें म्हणून भजन केलें.

श्री मंगेश मंदिरांतून दत्तगिरी पहांटे तीनचे सुमारास निघून पांचचे सुमारास दुभीट येथें परत आले. तेथील देवालयांत त्यांनीं मुक्काम केला. त्या दिवशीं दोनप्रहरीं बरोबर ७२ तासांनीं दत्तगिरींनीं अन्न सेवन केलें. झारापकर व पोतकर यांनाहि दत्तगिरींच्या स्वारींत असतां तहान व भूक यांची बाधा झाली नाहीं. दुभीटहून मंडळी सावडर्यास गेली. तेथून रेल्वेनें लोंढ्यावरून जंगलबेटास गेले.

जंगलबेटास यावेळेस दत्तगिरींनीं तीन दिवस मुक्काम केला होता. पूर्वपरिचित अनेक लोक होते. कांहीं चमत्कारहि घडले. दत्तगिरींच्या अलौकिकत्वाची ओळख जास्त जास्त लोकांना पटूं लागली. जंगलबेटाहून दत्तगिरी बेळगांवास गेले. त्यांची परवानगी घेऊन झारापकर व पोतकर बेळगांवासच राहिले व दत्तगिरी स्वतः श्री नरसोबाचे वाडीस निघून गेले.

अक्कलकोटच्या श्रीस्वामीसमर्थ यांच्या सहवासांत बारा वर्षें विद्यार्जनांत घालविल्यानंतर मायभूमीला परतण्याचे पूर्वी दत्तगिरींनीं उत्तरेकडील काशी आदिकरून क्षेत्रें पायीं फिरून पाहिलीं. कोंकणांत परत आल्यावर त्यांनीं खालीं थेट रामेश्वरापर्यंत पायीं यात्रा केली. दत्तगिरींच्या दक्षिणयात्रेच्या वेळीं त्यांच्याबरोबर श्रीपादवाडीचे श्री वामन जयराम सामंत होते. दत्तगिरी बहुधा अनवाणी फिरत असत आणि चालतांना अतिशय वेगानें चालत. साधासुधा इसम त्यांच्याबरोबर टिकत नसे. एकाच जाग्यावर फार काळ रहात नसत. कुठें केव्हां प्रगट होतील याचाहि नेम नसे. त्यांच्यांतील अलौकिक सामर्थ्याचा प्रत्यय जसजसा येऊं लागला तसतसा लोकांचा जास्त त्रास सुरू झाला. दत्तगिरी काय किंवा कोणताहि संत काय, त्यांच्यापाशीं सुखाचें गाठोडें थोडेंच असतें! सुख ही वस्तु दुसऱ्यानें देऊन कशी मिळणार? सत्प्रयत्नानें तें स्वतःच मिळवावें लागतें. अशा प्रयत्नास लागणारी स्फूर्ति संतजनांकडून मिळूं शकते. दत्तगिरींनीं ती स्फूर्ति पेरण्याचा प्रयत्न केला. त्यांना स्वतःला कशाचीच अपेक्षा नव्हती. सर्व विकारांना जिंकून ते ब्रह्ममय झाले होते. समाधि लावून बसले म्हणजे अनेक दिवस तसेच बसत. श्रीपादवाडीवर असतां मंदिराच्या गाभाऱ्यांत दत्तगिरी ध्यानस्थ बसत असत. दत्तगिरी एकदां असेच ध्यानस्थ बसले होते तों कोणी चेष्टेखोर माणसानें बाहेरून कडी लावली. आणि कशी गंमत केली, म्हणून स्वतःच्याच कृतीवर खूष होऊन गेला. तोंच दत्तगिरींनीं मागून येऊन गृहस्थाच्या खांद्यावर थाप मारली व त्याचें कुशल विचारलें.[1] त्या प्रकारानें गृहस्थ असा विरघळला कीं पुन्हां असल्या फंदांत न पडण्याबद्दल त्यानें कानाला खडा लावला.

बाहेरून बंद केलेल्या खोलींतून दत्तगिरी निघून गेल्याचे प्रकार अनेकदां घडले. शहापुरांत (बेळगांव) सराफीचा धंदा करणारे श्री. हरी माणगे दत्तगिरींचे

---

१. कृ. न. पाटकर, ठळकवाडी, बेळगांव. ता. १८-१-२९.

चहाते होते. त्यांच्याकडे एकदां दत्तगिरींची स्वारी गेली. एकांतांत बसण्यासाठीं दत्तगिरींनीं माणग्यांकडून त्यांच्या घरांतील एक खोली मोकळी करून घेतली. समाधी लावून बसतेवेळीं आपणांस तीन दिवसपर्यंत कोणाचाहि संपर्क नको म्हणून दत्तगिरींनीं माणग्यांना खोलीचें दार बंद करून बाहेरून कुलूप लावण्यास सांगितलें. कांहीं झालें तरी तीन दिवस पूर्ण झाल्याशिवाय दार उघडूं नये असेंहि बजावलें होतें. त्या सद्गृहस्थानें दत्तगिरींची आज्ञा कसोशीनें पाळली व चौथ्या दिवशीं मोठ्या उत्सुकतेनें दार उघडून पाहतात तों दत्तगिरी खोलींत नव्हते.[1] माणग्यांना फारच आश्चर्य वाटलें व दत्तगिरींबद्दल त्यांना जास्तच आदर वाटूं लागला.

दत्तगिरींच्या ठायीं वसत असलेल्या अलौकिक तेजाचा परिणाम कोणावरहि होत असे. त्यांच्या केवळ दर्शनानेंसुद्धां परकी व अपरिचित लोक नम्र होऊन त्यांच्या दर्शनसुखानें आनंदित होत असत. एकदां दत्तगिरी बेळगांवांतील गोंधळी गल्लींतून बेळगांव–वेंगुर्ला रस्त्यानें कोंकणांत जाण्यास निघाले. बेळगांवांतील बरेच लोक त्यांना चार पावलें पोंचविण्यासाठीं म्हणून बरोबर निघाले. बायका, पुरुष व मुलांच्या त्या घोळक्यांत श्रीपादवाडीचे श्रीपाद नारायण सामंतहि होते. दत्तगिरींची स्वारी अरंगतळ्यापर्यंत (गांवापासून पाऊण मैलावर आहे.) आली तों समोरून २०० गोरे शिपाई आपल्या अधिकाऱ्यासह शिस्तीनें येत होते. लष्करचा शिपाई आणि तोसुद्धां गोरा शिपाई दृष्टीस पडणें म्हणजे त्या काळीं एक भयंकर गोष्ट होती. आणि आतां तर २०० च्या वर शिपाई आणि बरोबर गोरा साहेब अधिकारी! मग लोकांची त्रेधातिरपीट उडण्यास कितीसा वेळ! आतां काय होईल, कसें होईल म्हणून सर्वजण अंतर्यामीं घाबरले. दत्तगिरी मात्र सागरासारखे धीरगंभीर, मार्ग कापीतच होते. समोर कांहीं तरी विलक्षण आहे याची जणूं त्यांना जाणीवच नव्हती. तो गोरा अधिकारी दत्तगिरींच्या अगदीं जवळ आला. त्यांच्या त्या धीरगंभीर तेजस्वी छबीकडे पाहून त्या अधिकाऱ्यास काय वाटलें कोणास ठाऊक? त्यानें एकदम 'हॉल्ट' चा हुकूम केला. काय घडत आहे हें नीटसें समजण्यापूर्वीं जमिनीवर बुटांचा कडकडाट होऊन ती पलटण एकदम थांबली. अधिकाऱ्यानें शिपायांना दत्तगिरींना सलामी देण्यास फर्माविलें. त्यानंतर

---

१. लक्ष्मण रघुनाथ आजगांवकर. २७-११-२९.

दत्तगिरींना त्यानें सर्व लवाजम्यासह पुढें जाण्यासाठीं वाट करून दिली व त्यांची स्वारी पार होईपर्यंत ते सर्व शिपाई शिस्तीनें सलाम करून उभे होते.[1]

समाधिस्थ होण्याच्या अगोदर एकदोन वर्षें, दत्तगिरींचा मुक्काम एकदां हल्याळ गांवीं होता. एकाच जागीं फार वेळ वास्तव्य न करण्याची त्यांची वहिवाट होती. हल्याळाहून दत्तगिरी जवळच असलेल्या यल्लापूर गांवास जाण्यास निघाले. बरोबर नेहमीप्रमाणें दहापंधरा इसमांचा परिवार होताच. वाटेंत कांहीं खिश्चन व्यापारी दृष्टीस पडले. बैलांच्या पाठीवर सुपारीनें भरलेल्या गोणी लादून व्यापारी नेत होते. गोवा वगैरे भागांशीं त्यांचा सुपारीचा व्यापार होता. किरिस्तावांच्या त्या मालवाहू बैलांच्या तांड्यांत दत्तगिरींना एक गायही दिसली. गायीच्या पाठीवरही गोणी होत्या. दत्तगिरी पुढें होऊन व्यापाऱ्यांना म्हणाले, "गाईच्या पाठीवरील गोणी खालीं उतरा. मी ती गाय विकत घेतों." व्यापाऱ्यांपैकीं एकजण हंसून म्हणाला, "गोसावीबोआ, तुम्ही गाय विकत घ्याल, परंतु तिचा तुम्हांला उपयोग काय? ती वांझोटी आहे!" बोलण्यांत वेळ न दवडतां गाईची किंमत विचारून दत्तगिरींनी ताबडतोब व्यापाऱ्यांसमोर मोजली व ती वांझ गाय घेऊन ते यल्लापुरास आले.

दत्तगिरींच्या भक्तजनांपैकीं एक श्री. गोविंदराव खानोलकर यांचें यल्लापुरांत घर होतें. दत्तगिरींनीं गाय आणून खानोलकरांच्या गोठ्यांत बांधली आणि खानोलकरांच्या पत्नीला, गोदुताईला हांका मारून म्हणाले, "चटकन गोठ्यांत जा आणि गाईची धार काढ." गोदुताई जरा बुचकळ्यांत पडली. महाराजांनीं वांझ गाय आणल्याची तिला कुणकूण लागली होती. परंतु महाराजांचा शब्द मोडण्याचें धाडस तिच्याकडून होण्यासारखें नव्हतें. निमूटपणें घरांतून एक लहानसा लोटा घेऊन ती गोठ्याकडे निघाली. दत्तगिरीही तिच्या मागोमाग निघाले. त्यांनीं गायीच्या पाठीवरून प्रेमळ हात फिरविला आणि तिचें सर्वांग एकाग्र दृष्टीनें क्षणभर न्याहाळलें; व गोदुताईला म्हणाले, "चल आटप. दूध काढ."[2] एवढें बोलून दत्तगिरी मागें फिरले. गोदुताई पहाते तों खरोखरच गाईला पान्हा फुटला! कधींही वीत न झालेल्या गाईला पान्हा फुटला!

---

१. श्रीपाद नारायण सामंत, ठळकवाडी, बेळगांव. ६–११–३१

२. विष्णू गणेश फारेष्टर. हल्ल्याळ. २५–२–२९

गोदुताईंचा लहानसा लोटा धारेनें क्षणार्धांत भरला. दूध वाहूं लागलें! गोदुबाईंनीं धांवत जाऊन दुसरें भांडें आणलें. परंतु काय झालें कुणास ठाऊक, दूध नाहीं! या घटनेनंतर गोविंदरावांच्या घरीं त्या गाईचीं दोनचार वितें झालीं. प्रत्येक खेपेस दूध मात्र लोटाभरच मिळे!

अशा तऱ्हेनें दत्तगिरींकडून अनेक अलौकिक गोष्टी घडत गेल्या. ज्यावेळीं त्या घडल्या त्याच वेळीं कोणी संशोधक दृष्टीनें लिहून ठेवल्या नाहींत. म्हणून आज या चरित्रलेखनाच्या प्रयत्नांत क्वचित् विसंगति आढळणें संभवनीय आहे. महाराष्ट्रभाषाभूषण ज. र. आजगांवकर यांनीं १९४०च्या धनुर्धारीच्या दिवाळी अंकांत 'मी पाहिलेले संत' अशा मथळ्याचा लेख लिहिला आहे. त्यांतील दत्तगिरींसंबंधींचा भाग पुढीलप्रमाणें आहे.

"मी आठदहा वर्षांचा असतांना आमच्या आजगांव गांवीं दत्तगिरी या नांवाचे एक बालोन्मत्तपिशाचवृत्ती साधु आले होते......हे साधु ब्रह्मचारी असून मोठे तेजस्वी होते. त्यांना श्री दत्तात्रयाची उपासना असून लोक त्यांना दत्तावतार मानीत...परिणामकारक प्रवचन करण्यांत श्रीमद्दत्तगिरी यांचा हातखंडा असे. त्यांस आत्मसाक्षात्कार झाला होता. पद्मासन घालून कांहीं दिवस ते उन्मनावस्थेंत रहात असत. त्यांची शरीरकांति निरतिशय तेजस्वी होती...समानता व मानवता यांच्या प्रस्थापनेसाठीं ते अस्पृश्य समाजाशीं काया, वाचा, मनें करून समरस झाले होते. त्यांच्या मनांत द्वैतभाव मुळींच नसे. जीवजंतूना—झाडांनासुद्धां-त्रास देणें पाप आहे असें ते प्रतिपादीत. त्यांच्या हातून घडलेल्या अलौकिक चमत्काराच्या अनेक कथा त्यांच्या सान्निध्यांत असलेल्या लोकांच्या तोंडून मीं ऐकल्या होत्या. त्यांतल्या एक दोन कथा येथें सांगतों.

श्रीपादवाडी येथें दत्तगिरींचा मुक्काम असतां तेथून कांहीं कोसांवर असलेल्या एका उत्सवासाठीं गांवांतील मंडळी खटाऱ्यांतून बायकामुलांसह जाण्यास निघालीं. दत्तगिरी महाराजहि त्यांच्याबरोबर निघाले. ज्या गृहस्थांनीं मला ही गोष्ट सांगितली ते गृहस्थहि महाराजांबरोबर उत्सवाचे गांवीं जाण्यास निघाले. तेव्हां महाराज त्यांना म्हणाले, 'अरे, तूं पक्का संसारी. तुझें सगळें लक्ष संसाराकडे. यात्रा आणि देवधर्म तुला कशाला? तूं आपला घरींच रहा.' पण ते गृहस्थ महाराजांबरोबर उत्सवास जाण्याचा हट्टच धरून बसले. तेव्हां महाराज म्हणाले, 'ठीक आहे चल.' पुढें गाड्या चालू झाल्या. कांहीं अंतरावर एक नदी लागली. तिला

पावसामुळें मोठा पूर आला होता. नदीला पूर आलेला पाहतांच गाडीवाल्यांनीं गाड्या नदींत घालण्याचें नाकारलें व गाड्या उभ्या केल्या. महाराज व तो गृहस्थ मागून पायीं चालत येत होते. ते नदीवर येतांच तेथें सर्व गाड्या थबकलेल्या त्यांच्या दृष्टीस पडल्या. तेव्हां महाराजांनीं चौकशी केली. गाडीवाल्यांनीं सांगितलें, 'अपरात्रीचा वेळ–नदीला पूर आला आहे. अशा स्थितींत नदींत गाड्या घालण्याचें धैर्य आम्हांस होत नाहीं.' महाराज म्हणाले, 'मी येथें उभा रहातों. तुम्ही गाड्या खुशाल पलीकडे न्या. कोणाच्याहि जीवास काडीमात्र अपाय होणार नाहीं.' गाडीवाल्यांची महाराजांवर पूर्ण श्रद्धा होती; त्यांनीं त्यांच्या आज्ञेप्रमाणें गाडया नदींत घातल्या. इतक्यांत महाराजांबरोबरचा गृहस्थ त्यांना म्हणाला, 'महाराज, आपणहि एखाद्या गाडींत बसून पलीकडे जाऊं. गाडया गेल्यावर मग आपण नदींतून पलीकडे कसे जाणार?' महाराज म्हणाले, 'त्याची काळजी तुला नको. आपण मागाहून जाऊं.' इतकें बोलून महाराजांनीं त्या गृहस्थाचा हात पकडून त्याला घट्ट धरून ठेवलें व एकाग्र दृष्टीनें नदींतून पलीकडे जाणाऱ्या गाडयांकडे ते पहात राहिले. थोडया वेळांत सर्व गाडया पैलतीरास बिनधोकपणें जाऊन पोहोंचल्या. इतक्यांत महाराजांबरोबरचा गृहस्थ पाहतो तों महाराज आपल्या शेजारीं नाहींत! ते इतक्यांत कोठें गेले याचें आश्चर्य तो करीत आहे तोंच नदीपलीकडून महाराजांची हांक त्याला ऐकूं आली. महाराजांनीं नदीपलीकडून त्याला मोठ्यानें हांक मारून सांगितलें, 'अरे, तूं आतां घरीं जा आणि स्वस्थ नीज.' आपला हात धरून आपल्या शेजारीं उभे असलेले दत्तगिरी निमिषार्धांत पैलतीरीं केव्हां आणि कसे गेले याचें आश्चर्य करीत तो गृहस्थ निमूटपणें मागें फिरला आणि आपल्या घरीं गेला.

श्रीपादवाडी येथें असतांना दत्तगिरी एके दिवशीं एका खोलींत समाधि लावून बसले आणि त्यांनीं आपल्या शिष्यांस खोलीस बाहेरून कुलूप लावण्यास व दहा दिवसांनंतर खोली उघडण्यास सांगितलें. चार–पांच दिवसांनीं बेळगांवकडचा एक मनुष्य श्रीपादवाडीस आला. तो बोलतांना सहज म्हणाला, 'मला कालच शहापूर येथें महाराजांचें दर्शन झालें, मोठा आनंद झाला.' हें ऐकून शिष्य आश्चर्यचकित होऊन म्हणाले, 'महाराज तर या खोलींत समाधि धारण करून बसले आहेत. ते तुम्हांस शहापुरांत कसे दिसतील?' तो मनुष्य म्हणाला, 'मग मी काय खोटें बोलतों? मला खोटें बोलण्याचें काय प्रयोजन?

मीच नव्हे तर शहापुरांतील शेकडों लोकांनीं महाराजांस काल तेथें पाहिलें आहे. तुम्ही पत्र पाठवून खात्री करून घ्या.' शिष्य मोठ्या बुचकळ्यांत पडले. शेवटीं खोलीचें कुलूप उघडून पहाण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें ते खोली उघडून पाहतात तों महाराज आंत समाधि लावून बसले आहेत!"

याच लेखाच्या संदर्भांत आजगांवकरांनीं अनेक वर्षें दत्तगिरींच्या सान्निध्यांत असलेले कै. प्रो. पांडुरंग भिकाजी तथा तात्यासाहेब नाईक यांचे त्यांच्याबद्दलचे उद्गार दिले आहेत. ते असे.[1] 'एकंदरीनें महाराज अलौकिक सत्पुरुष, योगसंपन्न व अभेद वृत्तीनें राहणारे, अद्वितीय भगवद्भक्त होऊन गेले यांत शंका नाहीं व त्या काळीं त्या प्रांतीं नामभजनाची लोकांना त्यांनीं गोडी लाविली. त्यांचें अवर्णनीय तेजःपुंज स्वरूप व या काळीं क्वचितच दिसून येणारें विभूतिमत्व नुकतेंच अनुभवल्यासारखें आजहि डोळ्यासमोर वावरतें व सांगतांना एक प्रकारें आल्हाद वाटतो.'

दत्तगिरींनीं स्थापन केलेल्या श्रीपादवाडी, दत्तवाडी व अंकोला येथील दत्तमंदिरांची व्यवस्था उत्तम लागली. लोक स्वयंस्फूर्तीनें व श्रद्धेनें भजन आणि नामस्मरण करूं लागले. दत्तगिरींचें चौथें श्रद्धास्थान म्हणजे निवतीचा गिरीमठ. मठामध्यें वास्तव्य असतां एकांतांत बसण्याच्या दत्तगिरींच्या दोनचार आवडत्या जागा होत्या. मठाच्या वरच्या अंगास डोंगरांत असलेल्या गुंफेमध्यें ते अनेक वेळां ध्यानस्थ बसत असत. तसेंच, मठाच्या धर्मशाळेंतील एका अडगळीच्या खोलींत ते अनुष्ठान करीत. त्यांचें अनुष्ठान सुरू असलें म्हणजे एक मोठा भुजंग खोलीचे[2] दरवाजांत बसून सारखा डोलत राही. हरिचरणगिरींच्या समाधीवरील घुमटीच्या माथ्यावर अतिशय अडचणीच्या जागीं निवांत बसण्यासाठीं दत्तगिरींनीं एक जागा तयार केली होती. त्या ठिकाणीं ते कसे जात हें अद्याप एक गूढच आहे. कारण शिडीचा उपयोग केल्याशिवाय या जागीं पोंचतांच येत नाहीं. या जागेंत मात्र कोणत्याहि ऋतूंत अतिशय प्रसन्न वाटतें. केव्हां केव्हां दत्तगिरींना फारच एकांत हवा होई. मग ते मठामध्यें असलेल्या पेटींत स्वतःला कोंडून घेत व बाहेरून कुलूप लावण्यास सांगत. साधारण माणसाला अवघडून झोपतां येईल इतक्या लांबी, रुंदी, उंचीची ही पेटी मठामध्यें अद्याप जतन करून ठेविली आहे.

---

१. पांडुरंग भिकाजी नाईक, वांद्रें. ता. १९-२-३२

२. पांडुरंग भिकाजी नाईक, वांद्रें १९-२-३२.

श्रीहरिचरणगिरींच्या वाघाप्रमाणेंच दत्तगिरींच्या सहवासामुळें स्वाभाविक हिंस्र-पणा सोडून शांत बनलेला एक वाघ होता. दत्तगिरी मठासमोरील पिंपळवृक्षा-खालीं पुराण वाचूं लागले कीं हा वाघ तेथें न चुकतां येऊन बसे. एकदां दत्तगिरी असेंच पुराण वाचीत असतां वादळी वारा सुरू झाला. पिंपळाचीं पानें हालून सळसळ आवाज फार जोरांत होऊं लागला. दत्तगिरींनीं वाचन न थांबवितां हाताच्या खुणेनें पानांची सळसळ बंद केली. त्या घटकेपासून कितीहि जोराचा वारा असो, त्या पिंपळाचीं पानें हालतात परंतु सळसळ बंदच आहे. दत्तगिरींचा वाघ अद्याप जिवंत असून मठाच्या आवारांत कोणाच्या दृष्टीस न पडतां संचार करीत असतो असें सांगतात. कांहीं वर्षांपूर्वी मठाचा सेवेकरी श्री अनंत महादेव मठकर याला हा वाघ एकदां पिंपळवृक्षाखालीं व एकदां गुरांच्या गोठ्यांत दिसला होता. मठाच्या नित्यनैमित्तिक कामांत दत्तगिरींनीं लक्ष घालून पुष्कळ सुधारणा केल्या. आषाढ शु. १३ ला मठाचे संस्थापक श्रीहरिचरणगिरी यांची पुण्यतिथी साजरी होत असे. तसेंच, पौष महिन्यांत एक दिवस मळगांवकरांची पालखी मठांत थांबत असे. या दोन्ही वेळां मोठी समाराधना होत असे.

दत्तगिरींनीं आणखी उत्सव सुरू केले. पुराण, कीर्तन, गोंधळ वगैरे नवीन गोष्टी आणल्या. दर गुरुवारीं श्रीदत्ताच्या पालखीची मिरवणूक काढण्याची प्रथा पाडली. या मिरवणुकीला दत्तगिरी हजर असोत वा नसोत, खानोलीच्या कोना-कोपऱ्यांतून भाविक लोक आनंदानें येऊं लागले. प्रत्येक सप्ताहांत असा हा उत्सव सुरू झाल्याकारणानें गांवांतील उत्सवप्रिय लोकांची एक फार मोठी उणीव भरून निघाली. गांवदेवस्थानांत उत्सव होत असत. परंतु ते हंगामी आणि मोजके. त्यांनीं नेहमींची भूक कशी भागणार ? अशा तऱ्हेनें दत्तगिरींची मातृभूमि त्यांची कर्मभूमीही झाल्याकारणानें एक पुण्यभूमीच बनली. दत्तगिरींच्या सहवासानें निवती पावन झाली. खानोलकरांचें ऐश्वर्य वाढलें. दर्जा वाढला. सर्व तऱ्हेनें भरभराट झाली. आणि हें सर्व किती थोडक्या काळांत घडलें ! १८८० ते १८९० या दसकडींत काय तो सर्व व्यापार झाला.

दत्तगिरींच्या सामर्थ्याची जसजशी लोकांना जाणीव होऊं लागली तसतसे निरुद्योगी लोक स्वार्थापायीं त्यांना सतावूं लागले. दत्तगिरींनीं कोणालाही शिष्य केलें नव्हतें. ते स्वतः दत्तोपासक होते. भाविक लोक भेटल्यास ते त्यांच्या सहवासांत रहात असत. परंतु स्वतःचें शिष्यत्व त्यांनीं कोणालाहि बहाल केलें

नाहीं. मोठमोठ्या महात्म्यांचा त्यांच्या शिष्यांकडूनच सर्वांत मोठा पराभव होतो हें लक्षांत घेतां दत्तगिरींच्या सावधपणाचें कौतुक वाटतें. दत्तगिरींकडून शिष्यत्व मिळावें म्हणून अनेकजण प्रयत्न करीत होते. त्यांच्या भोंवतीं जमत होते. परंतु दत्तगिरी त्यांना टाळून दुसरीकडे जात असत. लोक शिष्य होण्यासाठीं इतके उत्सुक झाले होते तथापि मठास पुढचा गिरी देण्याची गोष्ट कोणीहि निवतकर बोलेना. दत्त-गिरींनींसुद्धां स्वतःहून कोणाहि निवतकरावर मठास गिरी देण्याबद्दल दडपण आणलें नाहीं. पुढें काय होणार हें जणूं त्यांना दिसलें असावें. दत्तगिरींकडून शक्य तों आपला लौकिक फायदा साधावा असें निवतकरांना वाटत होतें आणि तें स्वाभाविकहि होतें. परंतु मठाची परंपरा चालूं राहण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या त्यागासाठीं कोणीहि पुढें येईना. अर्थात् दत्तगिरींना त्या गोष्टी-बद्दल फारशी खंत वाटली नाहीं. त्यांची कर्तव्यपूर्ति झाली होती. आतां पुढें निवतकर आणि त्यांचें कर्म ! १८९० च्या श्रावणांत दत्तगिरींनीं निवती सोडली ती कायमची. आणि वेंगुर्ल्यास अय्या व्यापाऱ्याच्या वखारींत एका खोलींत दार बंद करून ध्यानस्थ बसले. अनेक दिवस तेथें दत्तगिरी समाधि-सुखांत दंग होते. अनेक लोक जमत असत. परंतु दत्तगिरींनीं जनसंपर्क अजिबात वर्ज्य केला होता. कांहीं दिवसांनीं कोणालाहि नकळत ते पायीं निघाले व भाद्रपद शुक्ल पक्षांत नरसोबाचे वाडीस पोहोंचले. तेथें बाबाजी पुजाऱ्यांच्या माडीवर सात दिवस ध्यानस्थ बसले. सातवे रात्रीं श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर यांस स्वप्न पडल्यावरून ते स्वतः नरसोबाच्या वाडीस दत्तगिरींपाशीं आले. तो दिवस अनंत चतुर्दशीचा होता. बाळासाहेबांना दत्तगिरींनीं स्वतःची शेवटची इच्छा सांगितली. त्याप्रमाणें बाळासाहेबांनीं व आणखी ५०–६० ब्राह्मणमंडळी मिळून दत्तगिरींना एका पाटावरून नेऊन श्रीसमर्थपादुकांसमोर[1] श्रीकृष्णाबाईंत जिवंत समाधि दिली. भाविक लोकांना पुष्कळ शोध करूनसुद्धां दत्तगिरींचा पार्थिव देह सांपडला नाहीं.

चैत्र शुद्ध द्वादशी १८५० मध्यें कृष्णेच्या काठीं बाबाजी पुजाऱ्यांच्या माडीवर दत्तगिरींचा जन्म झाला. ४० वर्षांनंतर भाद्रपद शु. चतुर्दशी १८९० मध्यें त्याच माडीवरून निघून समोरच्च श्रीकृष्णेस दत्तगिरींनीं आपला सजीव देह अर्पण केला ! झालें ! येथें चरित्र संपलें ! माणसाचें चरित्र मृत्यूनें संपतें. परंतु दत्त-

१. दत्तात्रय भानु सामंत बांबर्डेकर, वालावल. ता. १८–८–३०

गिरींचें चरित्र येथें कसें संपेल ! त्यांच्यासारख्या महापुरुषांचें खरें चरित्र त्यांच्या निर्वाणापासूनच सुरू होतें. लौकिक अर्थानें दत्तगिरी आमच्यांतून गेले. परंतु ते खरोखर गेले नसून त्यांच्याविषयीं आस्था असणाऱ्या सर्वांच्या अगदीं निकट आले. त्यांना समाधिस्थ होऊन ६८ च्या वर वर्षें लोटलीं तरी 'दत्तगिरी' या केवळ नामोच्चारानें शेकडों लोकांचीं अंतःकरणें उचंबळून येतात ! आणि विश्वास ठेवा अगर ठेवूं नका, दत्तगिरी निर्वाणानंतर पूर्वस्वरूपांत भेटले होते. कांहीं कांहींना दत्तगिरी समाधिस्थ झाल्यानंतर १ वर्षानें [1] श्री. लक्ष्मण रघुनाथ आजगांवकर यांना ते मिरज स्टेशनवर भेटले व त्यांजबरोबर पुष्कळ गोष्टीहि केल्या. शेडबाळ स्टेशन येतांच दत्तगिरी गाडींतून उतरून निघून गेले. ते गेल्यावर आजगांवकर भानावर आले व श्रीमद्दत्तगिरी वर्षापूर्वीच समाधिस्थ झाले ही गोष्ट आपण पार विसरून कशी गेलों याचें आश्चर्य करूं लागले. समाधिस्थ झाल्यानंतर दत्तगिरींनीं स्वप्नांत येऊन दृष्टांत दिल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. विस्तारभयास्तव त्यांपैकीं एकाददुसरेंच देत आहोंत.

चतुर्थ पुष्पांत उल्लेख झालेल्या अन्नपूर्णाबाई नारायण नाईक यांच्या यजमानांनीं मालवणचे श्री. परशराम झांट्ये यांजकडून कांहीं कर्जाऊ रक्कम घेतली होती. व्याज वगैरे हप्ते न भरतां आल्याकारणानें रक्कम आवांक्याबाहेर वाढली. त्या चिंतेनें पतिपत्नी हैराण होऊन त्यांची निद्रा गेली. दत्तगिरींना समाधिस्थ होऊन कांहीं काळ लोटला होता. एके रात्रीं अन्नपूर्णाबाईच्या समोर झोळींत हात घालून दत्तगिरी उभे राहिले. ते पाहून बाईनें आपले हात पसरले. त्यांत त्यांनीं पीठ घातलें. थोड्याच दिवसांनीं झाट्यांनीं रकमेमध्यें अपेक्षेबाहेर सूट देऊन त्या नाईक कुटुंबाची चिंता दूर केली. बाबाजी नारायणांचे नातू श्री शंकर विष्णु पुजारे यांचा जन्म दत्तगिरींच्या निर्वाणानंतर नऊ वर्षांनीं झाला.

जाणते झाल्यानंतरहि बरींच वर्षेंपर्यंत शंकर विष्णूंना दत्तगिरींबद्दल फारशी माहिती नव्हती. विष्णु पुजाऱ्यांनीं नरसिंहवाडींतील मुख्य मंदिराच्या मागें असलेल्या औदुंबरवृक्षाखालीं दत्तगिरींच्या पादुका त्यांच्या निर्वाणानंतर कांहीं वर्षांनीं स्थापन केल्या. तसेंच पुजाऱ्यांच्या घराजवळ औदुंबराचा एक रोपटा वाढत होता. त्या रोपट्याशीं दत्तगिरींचा कांहींतरी संबंध असल्याचें शंकर

१. लक्ष्मण रघुनाथ आजगांवकर, ता. २७–११–२९

पुजाऱ्यांचे आईवडील बोलत असत. परंतु या बाबतींत विशेष लक्ष देण्यासारखें तें काय होतें! १९५० सालीं (दत्तगिरींच्या जन्मानंतर बरोबर एक शतकानें) शंकर पुजाऱ्यांची पत्नी एकाएकीं कॉलऱ्यानें आजारी पडली. पुजाऱ्यांवर अशा तऱ्हेचा बिकट प्रसंग पहिलाच होता. त्यांची पांचावर धारण बसली. कुटुंब वांचण्याची त्यांनीं आशा सोडली. दिवे लागण्याची वेळ. बाईचा प्राण आतां जातो कां घटकेनें जातो, अशी स्थिति! आतां प्रपंचाचा कारभार आटोपला म्हणून पुजारी अतिशय व्यथित झाले. कपाळाला हात लावून तंद्रींत बसले होते तों एक दाढी, केस राखलेला बैरागी त्यांना सामोरा आला. बैरागी शंकर विष्णूंना म्हणाला, "मी त्या औदुंबराच्या रोपट्याखालीं येऊन राहणार आहें.' पुजाऱ्यांची तंद्री चटकन उतरली. आपल्याला कांहींतरी भास झाला असें त्यांना वाटलें. परंतु त्या घटकेपासून पत्नीच्या आजारास उतार पडूं लागला. पुजाऱ्यांचें संकट दूर झालें.

झालेल्या प्रकारानें शंकर विष्णु फारच बुचकळ्यांत पडले. त्यांना कसलाच नीटसा बोध होईना. एक बैरागी दिसतो काय आणि मरणोन्मुख झालेली पत्नी वांचते काय! योगायोग म्हटला तरी जरा विलक्षणच. परंतु फार दिवस त्यांना ह्या संदेहांत काढावे लागले नाहींत. तिसरे दिवशीं दत्तगिरींच्या भक्तजनांपैकीं एक म्हापणगांवचे श्रीयुत काका ठाकूर शंकर पुजाऱ्यांकडे आले. ज्या रात्रीं शंकर विष्णूंना बैरागी दिसला त्याच रात्रीं काका ठाकूरांना दत्तगिरींनीं दृष्टान्त देऊन सांगितलें कीं आपण शंकर पुजाऱ्याच्या औदुंबराखालीं जाऊन राहतों. पुजाऱ्यांची खात्री झाली कीं त्यांना दिसलेला बैरागी दुसरातिसरा कोणी नसून, त्यांच्या माडीवर शंभर वर्षांपूर्वीं ज्यांचा जन्म झाला ते दत्तगिरीमहाराज होत. काका ठाकूरनीं बराच खर्च करून त्या औदुंबराचा पार बांधला व त्यावर दत्तगिरींच्या पादुकांची विधिपूर्वक स्थापना केली. श्रीमद्दत्तगिरींच्या या पादुका शंकर विष्णूंचें एक श्रद्धास्थान व नित्य पूजास्थान होऊन बसलें आहे.

दत्तगिरींना समाधिस्थ होऊन ६८ च्या वर वर्षें लोटलीं. लहानपणीं कां होईना, दत्तगिरींना ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें अशा दोनचारच व्यक्ति आज हयात असतील. त्यांपैकीं एक श्रीयुत सखाराम सिताराम तथा भाऊसाहेब नाईक, इंजिनिअर, वांद्रें, यांनीं शारीरिक अस्वास्थ्य असतांही मोठ्या भक्तीनें आणि कळकळीनें श्रीमद्दत्तगिरींबद्दल मजकूर लिहून दिला, तो पुढीलप्रमाणें आहे :

"खानोली गांवांत निवतीवाडींतील नाईकवाड्यांत आमचें वडिलार्जित घर वेंगुर्लें शहरापासून चार मैलांवर आहे. आमचे आजोबा कै. भिकाजी बाळ नाईक हे आपा नाईक या नांवानें प्रसिद्ध होते. सन १८९६ मध्यें १०१ वर्षांचे होऊन कैलासवासी झाले. साधारण शेतकरी असतांही सर्वांवर दयामाया ठेवणारे व परोपकार करणारे म्हणून ते गांवांतच नव्हे तर आजूबाजूच्या टापूंत प्रसिद्ध होते. स्वतःच्या खर्चानें तात्यापंतोजी ठेवून सर्वांसाठीं आपल्या मांगरांत प्राथमिक शाळा त्यांनीं पन्नास वर्षें चालविली. माझे वडील, चुलते डॉ. हरि भिकाजी, प्रो. पांडुरंग भिकाजी (तात्यासाहेब नाईक), बाळकृष्ण भिकाजी, मी व माझे सर्व भाऊ याच शाळेंत शिकलों.

आमचें घर दत्तगिरीमठापासून अगदीं जवळ, एक ते दीड फर्लांगावर आहे. सन १८८२ ते १८९० पर्यंत मी येथेंच होतों व नंतर दर एप्रिल–मे महिन्याच्या रजेंत तेथेंच जात असें. त्यावेळची प. पूज्य दत्तगिरी बोवांची आठवण आजही डोळ्यांपुढें उभी राहाते. दत्तजयंतीनंतर मेअखेरपर्यंत ६ महिन्यांत दत्तगिरी दोनतीन वेळ सकाळीं आमच्या घरीं येऊन बाहेर खळ्यांत तुळस होती तेथें उभें राहून "श्रीगुरु देव दत्त" असें मोठ्यानें म्हणत. आमचे आजोबा त्यावेळीं वृद्धपणामुळें क्वचितच बाहेर जात असत. ते पाट घेऊन येत व व बोवांस बसण्यास सांगत व त्यांस नमस्कार करण्याचा प्रयत्न करीत. पण बोवा तो साध्य होऊं न देतां आपणच त्यांस नमस्कार करीत व सांगत कीं आपणाकडून नमस्कार घेण्याची माझी लायकी नाहीं. मींच तुम्हांस नमस्कार केला पाहिजे. बोवा खालीं बसले कीं मी व माझा धाकटा भाऊ शंकर तेथें हजर असूं. आम्हांस मांडीवर घेऊन, डोक्यावरून व सर्वांगावरून अत्यंत प्रेमानें हात फिरवून बोवा सांगत, बघा बाळांनो, आपल्या आजोबांचें दया, क्षमा व परोपरकार यांचें व्रत सदैव पुढें चालवा. त्यांतच तुमचें कल्याण होईल. आज सत्तर वर्षांनंतर हें लिहितांना तो प्रेमळ हात डोक्यावर व अंगावर फिरत आहे अशी भावना होत आहे, इतके बोवा प्रेमळ होते. मी देवळांत वगैरे क्वचितच जातों. परंतु घरीं असतांना दर गुरुवारीं मठामध्यें श्रीदत्तगुरूंच्या पालखीस जाण्याचें कधींच चुकविलें नाहीं. सन १८९८ सालानंतर कॉलेजच्या रजेंत घरीं आल्यानंतर पालखीची पुढची बाजू खांद्यावर घेऊन तीन प्रदक्षिणा करणें, सातआठ अष्टकें म्हणणें हा माझा हक्क बजावण्याचें

मीं कधींच सोडलें नाहीं. त्यावेळीं पालखीसाठीं बराच मोठा जनसमूह हजर रहात असे. दोनतीन मैलांवरून वायंगणीहून गजानन नाईक, मामा नाईक व कधींकधीं गजानन नाईकांचे वृद्ध वडील आत्माराम नाईक हेही येत असत.

या परमपूज्य दत्तगिरीबोवांची स्मृति त्यांच्यांशीं संबंध असणाऱ्या प्रत्येकाच्या अंतःकरणांत आजवरही जागृत राहिली आहे, असा त्यांचा प्रभाव होता. नरसोबाच्या वाडींतील बोवांच्या पादुकांचें दर्शन घेण्याचें पुण्य मला तीनचार वेळां लाभलें हेंही माझें मी महत् भाग्यच समजतों."

सखाराम सिताराम नाईक
वांद्रें. १०.८.५८

श्रीयुत भाऊसाहेब नाईकांप्रमाणें दत्तगिरींबद्दल नितांत आदर बाळगणारे व त्यांचें चरित्र प्रसिद्ध व्हावें असें मनापासून वाटणारे आज अनेक आहेत. त्यांच्या कळकळींतूनच या चरित्रलेखनाचा प्रयत्न होत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतक्या वर्षांनंतर श्रीमद्दत्तगिरी चरित्ररूपानें जनतेसमोर यावेत हा त्यांच्याच माहात्म्याचा एक भाग आहे. अनेकांचा विसांवा, अनेकांचें स्फूर्तिस्थान, अनेकांचें श्रद्धास्थान अशा दत्तगिरींनीं कृष्णाबाईत देह टाकला! दुष्टांना दंड, आणि सज्जनांना साहाय्य हें त्यांचें आवडतें कार्य त्यांच्या निर्वाणानंतर कसें चालू रहावें! भाबड्या, अश्राप जीवांचें समाधान कसें व्हावें! कै. कवि श्रीकृष्ण कान्होबा झारापकर म्हणतात :

जन्मास ये जो कृष्णेतटाकीं देहासि जो या कृष्णेंत टाकी
कृष्णापरी वारित कृष्णकर्मा वर्णीं तया सोडुनि कृष्ण कर्मा ॥१॥
कथा गिरीची श्रुत कान याचा करी तरे संशय कां न याचा
हा मार्ग वाटो रसिकां नयाचा श्रीकृष्ण इच्छी सुत कानयाचा ॥ २ ॥

वरील श्लोकांत व्यक्त झालेल्या कवि श्रीकृष्णांच्या इच्छेशीं सर्व सज्जन सहमत होतील यांत काय संशय!

— समाप्त —

कै. श्रीकृष्ण कान्होबा झारापकरकृत

श्रीमद्दत्तगिरी स्तोत्र

जन्मास ये जो कृष्णेतटाकीं देहासि जो या कृष्णेंत टाकी
कृष्णापरी वारित कृष्णकर्मा वर्णी तया सोडुनि कृष्ण कर्मा ॥१॥

कथा गिरीची श्रुत कान याचा करी तरे संशय कां न याचा
हा मार्ग वाटो रसिकां नयाचा श्रीकृष्ण इच्छी सुत कानयाचा ॥२॥

श्रीमत् दत्तगिरीच्या, सहवासें पुण्यभूमि ती निवती ॥
गोऽश्वत्थव्याघ्रादी, बोधें मानव तसे किती निवती ॥१॥

माताहि अन्नपूर्णा, रक्षिति गोरक्ष बाप तनयाला ॥
तेजःपुंज विलोकुनि, म्हणती जन तें नसे पतन याला ॥२॥

कुलरीति आश्रमालयिं, दिव्य जितेंद्रिय महंत हा केला ॥
झाला विरक्त साधू, देवा दत्तास देत हाकेला ॥३॥

व्याघ्रमुखीं कर घाली, अचलासन मांडितो कधीं रानीं ॥
धेनू वांझ दुभविली, केलें सानंद तोक धीरांनीं ॥४॥

उच्चार तीन वेळां, करिती साष्टांग तीन देवास ॥
वारंवार प्रभूला, दुर्मतिचा सांगती न दे वास ॥५॥

माला करांत नित्यचि, सत्यकरी दत्त घोष तीहि तरे ॥
तन्मतिला गति दे ती, जैसी पतीला सती कथीं हितरे ॥६॥

त्रैमूर्तिकीर्ति वर्णित, फिरती वृत्ती दिसे मनोहर ती ॥
ऐशा सिद्ध विभूती, गंगेपरि पातकां जणो हरती ॥७॥

जन्म शके सतराशें, चौऱ्याहत्तर समाधि शक तो हा ॥
अष्टादशबारावा, पाहूं अधिकार कोण शकतो हा ॥८॥

पूजीति साळगांवीं, श्रीपादीं चरणपादुका तरती ॥
गातां दत्तगिरीच्या स्तवना, व्याधी समग्र कातरती ॥९॥

अभिमान पूर्ण धरुनी, सदनीं मूर्ती सदैव ही ठेवा ॥
नित्य पहा उल्हासें, पाहे लोभी जसा वही ठेवा ॥१०॥